**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५८८
निर्णय दिनांकः ०१-०२-२०१०

१. सौ. सुरेखा चंपतराव पाटील, नांदेड :अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगाव, जि.नांदेड :प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव,जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : मे. उत्तम वसंत कवटीकवार, मे.माधव सिताराम मेडेवार,श्री.वाहेद रहेमतुल्ला, मे.साईबाबा ट्रेडिंग कं., श्री. राम पंढरीनाथ चिद्रावार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती देण्यासाठी विलंब होत असल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे,नायगाव तालुक्यातील मे.उत्तम कवटीकवार व इतर चार अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांना शासनाकडून मिळणाऱ्या रॉकेलचे के.एल. प्रमाण, त्यांच्या स्टॉक रजिस्टर व इतर रजिस्टरची सत्यप्रत, त्यांना वाटप केलेल्या वाटप नोंदवहीची सत्यप्रत, त्यांना मिळणाऱ्या रॉकेल नियतनाच्या दरमहाच्या सत्यप्रती व पुरवठा निरीक्षक यांनी तपासणी केलेल्या तपासणी अहवालाच्या सत्यप्रती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. २०.१२.२००८ रोजीपर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि यानंतरही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी दि. २४.०१.२०१० रोजी त्यांना विनामूल्य हस्तांतरित केली आहे व यासंदर्भात अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली. तसेच याच वेळी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २४.०१.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये, अपिलार्थीने त्यांना या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे आणि प्राप्त माहितीने त्या समाधानी झाल्या असल्याने त्यांचे अपील क्र. ५८८/०९ हे निकाली काढावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे, असे आढळून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील बरीचशी माहिती त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध होती. त्रयस्थ पक्षाने व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता त्यांच्या अपेक्षेप्रमाणे संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुरेखा चंपतराव पाटील, जिल्हाध्यक्षा, म.न.से.महिला आघाडी, रा.संभाजीनगर, तरोडा (बु), नांदेड-५

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, नायगाव,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६३
निर्णय दिनांक: ०१-०२-२०१०

१. सौ. सुरेखा चंपतराव पाटील (आरसुळे), नांदेड :अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड, जि.नांदेड :प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड,जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. अ.गणी अ.वली

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागवूनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यास विलंब व टाळाटाळ होत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये नांदेड

तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. अ.गणी अ.वली परवाना क्र. २३/९८ यांना शासनाकडून मिळणाऱ्या रॉकेलच्या के.एल.प्रमाणे स्टॉक रजिस्टर व इतर अनुषंगीक व्यापक व्याप्तीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दि. ३१ मार्च, २००५ ते २००७ असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३६,०००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या प्रकरणी शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले होते. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने तहसीलदार, नांदेड यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील केले. यानंतर दि. ०१.१२.२००८ रोजी त्यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ, अपिलार्थीची माहिती मिळाल्याची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाल्याचा निष्कर्ष काढण्यास कोणतीही हरकत नाही.

त्रयस्थ पक्ष श्री. अ. गणी अ.वली यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, संबंधित अपिलार्थी सौ. सुरेखा चंपतराव पाटील या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा रॉकेल

पुरवठाधारकांना धाक दाखवून, त्यांच्याकडे वारंवार पैशांची मागणी करीत असतात व पैसे न दिल्यास पुढील कार्यवाही करण्याची धमकी देतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०९.२००८ रोजी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे योग्य तो प्रतिसाद दिला आहे. तथापि अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीने त्यांचे माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे कर्तव्य या प्रकरणी पार पाडलेले नाही. एवढे असूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०१.१२.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली आहे व ही माहिती मिळाल्याची पोचपावती अपिलार्थीने एका पत्राद्वारे दिली आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २१६३/०८, दि. ०३.१२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुरेखा चंपतराव पाटील (आरसुळे), जिल्हाध्यक्षा, म.न.से.महिला आघाडी, रा.संभाजीनगर, तरोडा (बु), नांदेड-५

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६४
निर्णय दिनांक: ०१-०२-२०१०

१. सौ. सुरेखा चंपतराव पाटील (आरसुळे), नांदेड :अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड, जि.नांदेड :प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड,जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : १)श्री. गफार खॉ सादीक खॉ २) श्री.अलिमोद्दीन खमरोद्दीन

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागवूनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यास विलंब व टाळाटाळ होत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये नांदेड तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. गफारखॉ सादीक खॉ व श्री. अलिमोद्दीन खमरोद्दीन यांना शासनाकडून मिळणाऱ्या रॉकेलच्या वितरणासंबंधी व इतर अनुषंगीक मुद्यांवर व्यापक व्याप्तीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दि. ३१ मार्च, २००५ ते २००७ असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३६,०००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि याप्रमाणे शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी व संबंधित त्रयस्थ पक्ष आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले होते. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने तहसीलदार, नांदेड यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील केले. यानंतर दि. ०१.१२.२००८ रोजी त्यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ,अपिलार्थीची माहिती मिळाल्याची पोचसही आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाल्याचा निष्कर्ष काढण्यास कोणतीही हरकत नाही.

दोनही त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, संबंधित अपिलार्थी सौ. सुरेखा चंपतराव पाटील या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा धाक दाखवून त्यांच्याकडे नेहमी पैशांची मागणी करीत असतात व पैसे न दिल्यास त्यांच्याविरुध्द तक्रार करण्याची त्यांना वारंवार धमकी देत असतात. अपिलार्थीच्या या त्रासास नांदेड तालुक्यातील सर्व धान्य पुरवठादार व रॉकेल विक्रेते कंटाळले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०९.२००८ रोजी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे योग्य तो प्रतिसाद दिला आहे. तथापि अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीने त्यांचे कर्तव्य या प्रकरणी पार पाडलेले नाही. एवढे असूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०१.१२.२००८ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे पत्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना देऊन, त्यांना माहिती मिळाल्याची पोचपावती या पत्राद्वारे दिली आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. २१६४/०८, दि. ०३.१२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुरेखा चंपतराव पाटील (आरसुळे), जिल्हाध्यक्षा, म.न.से.महिला आघाडी, रा.संभाजीनगर, तरोडा (बु), नांदेड-५

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६५
निर्णय दिनांक: ०१-०२-२०१०

१. श्री. प्रमोद राधाकिशन काकाणी, :अपिलार्थी
रा.गंगाखेड, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तहसील कार्यालय, गंगाखेड,
जि.परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, गंगाखेड,जि.परभणी

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०७.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना तहसीलदार,गंगाखेड यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे व त्रयस्थ पक्ष,"अष्टविनायक केबल"या केबलचालकाकडून भ्रष्टाचार होत असल्याची त्यांना शंका असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी प्रथमत: अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष,"अष्टविनायक केबल" या केबलचालक संस्थेविषयीची व या केबल चालकाने अपिलार्थीच्या

घरातील केबल टी.व्ही.प्रक्षेपणाची जोडणी खंडीत करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण चार मुद्यांद्वारे सन २००६ या वर्षाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने आणि अष्टविनायक केबल चालकाकडून भ्रष्टाचार होत असल्याची शंका असल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दि.०४.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीपैकी कोणती माहिती त्यांना खोटी व दिशाभूल करणारी वाटत आहे, याची माहिती घेऊन अपिलार्थीस अचूक माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३१.०५.२००८ रोजी माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाचा पंचनामा करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या घराच्या दरवाज्यावर चिकटवली. तथापि ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन आणि अष्टविनायक केबल चालकाकडून भ्रष्टाचार होत असल्याची त्यांना शंका वाटल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः उपस्थित राहिले नाहीत.

त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने सदर माहिती न वाचता ती स्वीकारण्याचे नाकारले. त्यामुळे त्यांनी दि. ३१.०५.२००८ रोजी पंचनामा करुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची कागदपत्रे त्यांच्या घराच्या दारावर चिकटवली. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की,अष्टविनायक केबल या कंपनीने अपिलार्थीने त्यांच्याकडे केबल जोडणीचे नियमित शुल्क न भरल्यामुळे अपिलार्थीची केबल जोडणी खंडीत केली होती. अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष यांच्यामध्ये वैयक्तिक वाद असल्याचे त्यांना आढळून आले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी बराचसा भाग हा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात विचारला आहे व या मुद्याद्वारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण व त्यांचे वैयक्तिक अभिप्राय अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थीच्या शंकांना उत्तर देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील कोणत्याही तरतुदींमध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मधील अपिलार्थीने दि. २०.०३.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर झालेली कार्यवाही, त्रयस्थ पक्ष अष्टविनायक नेटवर्क, या केबलचालक संस्थेचे किती वेळा सर्वेक्षण झाले व तहसीलदार यांनी अवैध केबल जोडणीबाबत स्वत: केलेल्या चौकशीवर झालेली कार्यवाही, ही माहिती वगळता

अपिलार्थीस उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३१.०५.२००८ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती बरोबर दिली आहे, असे आयोगास आढळून येत आहे.तसेच जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीचे व केबल कंपनीचे जर काही वैयक्तिक वाद असतील तर त्यांनी योग्य त्या सक्षम प्राधिकरणाकडून त्याबाबत दाद मागावी, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केबल नेटवर्क कंपनीवर कारवाई करण्याचे अधिकार अथवा त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेश देण्याचे अधिकार आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाहीत. त्यामुळे, केवळ अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष हा भ्रष्टाचार करीत असल्याची शंका आहे, या मुद्यावर आयोगाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे. तथापि या संदर्भात युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देऊ करुनही अपिलार्थीने ही माहिती स्वीकारली नाही, यावरुन कोणतीही माहिती प्राप्त करुन न घेता अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे कोणताही आधार नसलेले निरर्थक अभिप्राय त्यांनी आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जात केले आहेत, हे सिध्द होत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळविण्यामध्ये फारसे स्वारस्य आहे, असे त्यांच्या आजच्या सुनावणीसाठीच्या अनुपस्थितीवरुन आयोगास वाटत नाही. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३१.०५.२००८ रोजी दिलेली माहिती ही, वस्तुस्थितीशी सुसंगत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रमोद राधाकिशन काकाणी,रा.जुना मोंढा,गंगाखेड, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७१७
निर्णय दिनांक ०१/०२/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. वसंत माधवराव खरे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गृहपाल,<br>शासकीय मुलांचे वस्तीगृह, अंबड, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष समाज कल्याण अधिकारी,<br>जालना | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. वसंत माधवराव खरे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २७.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १९.१०.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १२.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.२७.११.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ४५५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंत माधवराव खरे, समतानगर, घर क्र.५-१७-३३, क्रांती चौक पोलीस कॉलनी, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२८
निर्णय दिनांक ०१/०२/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुभाष त्र्यंबकरावजी पाटील,<br>रा. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | | |

**निर्णय**

श्री. सुभाष त्र्यंबकरावजी पाटील यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २५.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०१.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०१/०२/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष त्र्यंबकरावजी पाटील, स्वामी क्लिनीक, मारवाडी गल्ली, काद्राबाद, जालना, ता.जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७४०
निर्णय दिनांक ०१/०२/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महंमद मजहर अहेमद पि. महंमद इब्राहिम,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (प्रा.),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्रा.),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. महंमद मजहर अहमद पि.महंमद इब्राहिम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०८.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २१.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महंमद मजहर अहेमद पि. महंमद इब्राहिम, खवी बिल्डींग, नगरेश्वर मंदिर रोड, नांदेड, ता.जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७४२
निर्णय दिनांक ०१/०२/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गायकवाड लक्ष्मण पांडुरंग,<br>रा. लोहारा, जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय, लोहारा, ता.लोहारा,<br>जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, लोहारा, जि.उस्मानाबाद | | |

**निर्णय**

श्री. लक्ष्मण पांडुरंग गायकवाड यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २५.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०६.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.०७.११.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा १८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मण पांडुरंग गायकवाड, मु.पो. लोहारा बु., ता. लोहारा बु., जि.उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२००
निर्णय दिनांक ०१/०२/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दौलतराव माधवराव गायकवाड,<br>रा.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>महात्मा गांधी मिशनस्, मेडिकल कॉलेज, सिडको,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>महात्मा गांधी मिशनस्, मेडिकल कॉलेज, सिडको,<br>औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री. दौलतराव माधवराव गायकवाड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २४.०४.२००८ रोजी केलेले दि.३०.०४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०६.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २१.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दौलतराव माधवराव गायकवाड, २५४ ब, प्रकाशपूर हौसिंग सोसायटी, प्रकाशपूर, सावेडी, दूरदर्शन केंद्र मार्ग, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७३
निर्णय दिनांक ०१/०२/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा,<br>रा.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जि.प.बांधकाम विभाग, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५.०४.२००७ रोजी केलेले दि. १८.०४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०८.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३०.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.२८.११.२००६ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ३७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा, रा. श्री.तुळजाभवानी जिल्हा स्टेडिअमजवळ, उस्मानाबाद, ता.जि. उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५८४

निर्णय दिनांक ०१-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीपत मोतीराम राठोड,<br>मु. हिरानगर, पो. हातराळ, ता. मुखेड, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०७-२००८ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक २४-०७-२००८ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे सचिव, जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळ, वंडगीर तांडा, तालुका मुखेड यांच्या अंतर्गत मक्काजी नाईक प्राथमिक शाळा, देगलूर या संस्थेने जन माहिती अधिकारी यांना दिनांक १०-०६-२००३ रोजी त्यांच्या शाळेत शिक्षक भरण्यासाठी परवानगी मिळण्याबाबतचे पत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडील कोणत्या शाखेस पाठविण्यात आले ते पत्र प्रमाणित करुन मिळणेबाबत माहिती

मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संस्थेच्या दिनांक १०-०६-२००३ रोजीच्या पत्राबाबत माहिती हवी आहे, असेही त्यांनी या अर्जामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०९-२००८ रोजी या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील केले होते. तथापि शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, अपिलार्थीने आयोगाकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी द्वितीय अपील करेपर्यंत सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील श्री. रविंद्र निर्मळ हे उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली आहे ती माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीचे अपरिमीत असे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यांनी वेळोवेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २४-११-२००८, २७-१०-२००८ व ०८-०१-२००९ रोजी सुनावणी प्रस्तावित केली होती. तथापि त्या दिवशी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण विनाकार्यवाही तसेच प्रलंबीत ठेवले. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे समर्थन करण्यासाठी संबंधित

जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळातर्फे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १०-०६-२००३ रोजीच्या पत्राची प्रमाणीत प्रत व ते पत्र कोणत्या शाखेला पाठविले आहे, याची माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. संबंधित संस्थेच्या सचिवांचे दिनांक १०-०६-२००३ रोजीचे पत्र माहिती व सुविधा केंद्र, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १०-०६-२००३ रोजी सादर केल्याचे दिसून येत आहे. तथापि या पत्राची प्रमाणीत प्रत जिल्हा परिषद शिक्षण विभाकाकडून अपिलार्थीस प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप इतके मर्यादित आहे की, अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी कोणत्याही जन माहिती अधिकारी यांना दोन दिवसापेक्षा जास्त कालावधी लागला नसता. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही सकारात्मक कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी याचे वर्तन देखिल संशयास्पद असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २७-१०-२००८, २४-११-२००८ व ०८-०१-२००९ रोजी अशा तीन वेळा सुनावणी ठेवून, या संदर्भात आपले कोणतेही आदेश पारित केले नाहीत. तसेच या संदर्भात आयोगाकडे युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. यावरुन अपिलार्थीचा, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याचा आक्षेप, आयोग मान्य करीत आहे. ज्याअर्थी, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तीन वेळा सुनावणी ठेवली होती त्याअर्थी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी

केलेल्या माहितीचे स्वरुप ज्ञात असणार हे उघड आहे. तथापि जर अपिलार्थीचे त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भीय पत्र त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाले नव्हते तर तसे त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कळविण्यास कोणतीही हरकत नव्हती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने त्यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये माहिती देण्यासंदर्भात सकारात्मक अथवा नकारात्मक प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. या प्रकरणी त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना या प्रकरणी एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

याच बरोबर संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन

स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदार वृतीची व कर्तव्यपरायणतेच्या अभावाची यथायोग्य नोंद शिक्षण संचालक, पुणे यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्रीपत मोतीराम राठोड, मु. हिरानगर, पो. हातराळ, ता. मुखेड, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक (प्राथमिक व माध्यमिक) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटलजवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ५८५/२००९, ५८६/२००९ व ५८७/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ५८५, ५८६ व ५८७

निर्णय दिनांक ०१-०२-२०१०

१ श्री. लक्ष्मण पिराजी कांबळे, : अपिलार्थी
रा. क्रांतीनगर, गणेशनगर कॉर्नर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
आयुक्त , नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी नोंदविलेली ५८५/२००९, ५८६/२००९ व ५८७/२००९ या क्रमांकाची तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे, त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. या विचाराधीन अपील अर्जांशी संबंधित माहितीसाठीचे सर्व मूळ अर्ज दिनांक ०५-०१-२००९ रोजी व त्यावरील सर्व प्रथम अपील अर्ज दिनांक ०६-०२-२००९ रोजी व तसेच त्यावरील सर्व द्वितीय अपिले अपिलार्थीने दिनांक २५-०२-२००९ रोजी सादर केली

असल्यामुळे, या तीनही अपिलांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०१-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, विचाराधीन प्रकरणाशी संबंधित तीनही मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विविध प्रकरणाशी संबंधित माहिती मागविली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६-०२-२००९ रोजी केलेल्या तीनही प्रथम अपील अर्जावर, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपले आदेश देणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब आयुक्त अथवा संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या तीनही प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

अपिलार्थीचे जर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या या निर्णयांनी समाधान झाले नाही तर अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे स्वतंत्रपणे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन तीनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ५८५/२००९, ५८६/२००९ व ५८७/२००९ निकाली काढण्यात येत आहेत.

२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अथवा या प्रकरणांशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या तीनही प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले अपिलनिहाय स्वतंत्र आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मण पिराजी कांबळे, रा. क्रांतीनगर, गणेशनगर कॉर्नर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५१३
निर्णय दिनांक: ०२-०२-२०१०

१. श्री. नारायणराव अंबादास जाधव, : अपिलार्थी
रा. परंडा,जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, परंडा, जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांना माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहेत व तसेच अपिलार्थीच्या दि. १०.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे ते विनाकारण, त्यांना अत्यंत आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या मिळकतीसंदर्भात एकूण चार मुद्यांद्वारे सन १९५० ते २००६ या कालावधीतील विविध कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये वरील कालावधीत घर क्र.१३१, २१२,२१३, ३/८३ या घर क्रमांकाच्या रिव्हिजनच्या छायाप्रती, रिव्हिजन करणारे अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार, संस्था यांच्याबाबतची माहिती व त्या अनुषंगाने इतर माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, भीषण पाणी टंचाईच्या व निवडणूकीच्या कामामुळे त्यांनी मागणी केलेली माहिती एक महिन्याच्या आत देता येणे शक्य नाही, असे कळविले व दि. ३०.०९.२००८ पर्यंत त्यांना माहिती देण्याचे आश्वासित केले. तथापि दि. ३०.०९.२००८ पर्यंत देखील अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीकरिता ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार उपस्थित राहूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उध्दट उत्तरे दिली. परंतु माहिती मात्र कोणतीही दिलेली नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन देणे त्यांना भाग आहे. अपिलार्थीच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाण्याच्या भीषण टंचाईचे व निवडणूकीचे कारण दर्शवून अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. तदनंतर परत दि. ०६.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती शोधण्याचे काम त्यांच्या कार्यालयात चालू असल्याचे व संबंधित अभिलेखे अप्राप्त असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देता येणे शक्य नाही,असे कळविले. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती नाकारण्याची कारणे कोणत्याही परिस्थितीमध्ये स्वीकारहार्य नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागविली आहे ती माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी निश्चितपणे किती आहे, हे आज रोजी आयोगास कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा त्यांच्या अभिलेख्यामध्ये कसोशीने शोध घेऊन त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांना त्यांच्या अभिलेख कक्षात आढळून आले नाहीत तर सदर कागदपत्रे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी याच कालावधीमध्ये फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी व संबंधित पोलीस स्टेशनकडे केलेल्या तक्रारीची प्रत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने दि. १३.०८.२००८ रोजी माहिती मागवूनही अपिलार्थीस सतत नकारात्मक प्रतिसाद देऊन संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले व अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव स्पष्ट करुन त्याद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संचालक, नगरपालिका प्रशासन यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा त्यांच्या अभिलेख्यामध्ये कसोशीने शोध घेऊन त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. संचालक (न.प.प्र) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित

सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण अंबादास जाधव, रा. ३/८३ मंडई विभाग, टेलिफोन ऑफिसजवळ मु.पो.ता.परंडा, जि.उस्मानाबाद-४१३ ५०२.

२. जन माहिती अधिकारी,नगर परिषद, परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परंडा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक,नगर परिषद संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस,वरळी,मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५१४
निर्णय दिनांक: ०२-०२-२०१०

१. श्री. विष्णूपंत शंकरराव धाबेकर, रा.उस्मानाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचा निर्णय मान्य नाही. त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या छायाप्रती त्यांना पुरविल्या गेल्या असत्या तर दि.०१ एप्रिल, २००७ ते ३१ मार्च,२००८ या कालावधीतील ३०५४ नॉनप्लॅन गट अ व ब या योजनेअंतर्गत झालेला कामाचा गैरप्रकार, अनियमितता उघड झाली असती, असे होऊ नये, म्हणून संबंधितांनी या कागदपत्रांच्या छायाप्रती पुरविलेल्या नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"वरील कालावधीमध्ये ३०५४ नॉन प्लॅन गट 'अ' व 'ब' या योजनेअंतर्गत एम.डी.आर. ग्रामीण मार्ग, इतर ग्रामीण मार्ग आदी सर्व प्रकारच्या रस्त्यावरील केलेल्या पॅचवर्कस् व अन्य सर्व कामाच्या एम.बी.रेकॉर्डस्च्या व त्या अनुषंगाने अदा केलेल्या चेकस्च्या छायांकित प्रती."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नसल्यामुळे त्यांनी दि. १७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत, ही माहिती त्यांच्या प्राधिकरणाच्या ज्या भागाकडे उपलब्ध आहे त्या प्राधिकरणाकडे म्हणजेच जिल्हा परिषद, वित्त विभाग, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व तालुका स्तरावरील जिल्हा परिषद, बांधकाम उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा,भूम व कळंब या उपविभागाच्या उपअभियंत्यांकडे, अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यांच्यापैकी कोणत्याही विभागाकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नाही. मध्यंतरीच्या कालावधीत मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याने कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाकडे त्यांनी वित्त विभागास पाठविलेल्या पत्रासंदर्भात काही पूरक माहिती त्यांच्याकडील दि. ३०.०७.२००८ च्या पत्राद्वारे विचारली. या पत्रास जन माहिती अधिकारी यांनी नेमका कशाप्रकारे प्रतिसाद दिला, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन कळून येत नाही. यासंदर्भात वित्त विभागाने परत दि.११.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे स्मरण दिले.

मध्यंतरीच्या कालावधीत उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, उपविभाग, भूम यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.११.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या एकूण १०७ पृष्ठांच्या माहितीकरिता शुल्क भरण्याचे सूचित केले. आयोगास अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्यात आलेल्या या दि. ११.०८.२००८ रोजीच्या पत्राची प्रत अत्यंत अस्पष्ट असल्यामुळे या पत्राद्वारे संबंधित उपअभियंता,भूम यांनी अपिलार्थीस निश्चितपणे किती शुल्क आकारले, हे कळणे शक्य होत नाही. तसेच यासंदर्भात आयोगासमोर उपस्थित असलेले कार्यकारी अभियंता हे देखील आयोगास कोणतीही कागदपत्रे सादर करु शकले नाहीत. अशाप्रकारे अपिलार्थीस कार्यकारी अभियंता यांच्या सर्व उपविभागाकडून (भूम उपविभाग वगळता) नकारात्मक प्रतिसाद प्राप्त झाल्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दि. १६.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर त्यांनी दि. १७.१२.२००८ रोजी निर्णय देऊन कार्यकारी अभियंता यांची या प्रकरणातील कृती बरोबर असल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती न देण्याचे कारण आयोगास सांगता आले नाही. त्यांनी आयोगास असे अवगत केले की,अपिलार्थीने अर्ज करतेवेळी श्री. मेंगडे नावाचे कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत होते. त्यांची आता पदोन्नतीवर नागपूर येथे बदली झालेली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे या प्रकरणी मागणी केलेली संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी

केलेली माहिती तत्कालीन उपअभियंता,जि.प.बांधकाम उपविभाग,उस्मानाबाद, श्री. जिलानी (सध्या सा.बां.वि.अंबड,जि.जालना येथे कार्यरत), उपअभियंता,जि.प.बांधकाम उपविभाग,भूम, श्री. नैमुद्दीन, उपअभियंता,जि.प.बांधकाम उपविभाग,कळंब, श्री. वाघमारे, उपअभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग,उमरगा, श्री. मोमले व उपअभियंता,जि.प.बांधकाम उपविभाग,तुळजापूर, श्री. सुळ यांच्याकडे उपलब्ध होती. त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विभागास न पुरविल्यामुळे अंतिमतः अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि. १५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कार्यकारी अभियंता यांच्या बांधकाम विभागाचे भाग असलेल्या वेगवेगळया उपविभागांकडे उपलब्ध होती. कार्यकारी अभियंता यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक)च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित सर्व उपअभियंता आणि उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडे पाठविली होती. तथापि या प्रकरणी उपविभागीय अभियंता, भूम यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही अभियंत्याने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये माहिती देण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणाऱ्या त्यांच्या इतर सहायक कर्मचारी/अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. ही तरतुद पाहता, या प्रकरणी तत्कालीन उपअभियंता, श्री. जिलानी, उपअभियंता,जि.प.बांधकाम उपविभाग,उस्मानाबाद (सध्या सा.बां.वि. अंबड, जि. जालना येथे कार्यरत), श्री. वाघमारे, उपअभियंता,जि.प.बांधकाम उपविभाग,कळंब, श्री. मोमले, उपअभियंता,जि.प.बांधकाम उपविभाग,उमरगा व श्री. सुळ, उपअभियंता,जि.प.बांधकाम उपविभाग,तुळजापूर व वित्त

विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचारी हे सर्वजण अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त न होण्यासाठी निःसंशयपणे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे, सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना या प्रकरणाशी संबंधित जि.प.बांधकाम उपविभाग, भूम,जि.उस्मानाबाद मधील अधिकारी/कर्मचारी वगळता या प्रकरणाशी संबंधित उर्वरित सर्व उपअभियंत्यांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या प्रकरणाशी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित कनिष्ठ अभियंता, वित्त विभागातील अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांच्या अधिनस्त संबंधित सर्व उपविभागीय अभियंत्यांकडून (भूम वगळता)व जिल्हा परिषदेतील वित्त विभागाकडून हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत उपलब्ध करुन घेऊन ती जन माहिती अधिकाऱ्यामार्फत त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवावी. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या भागापैकी जिल्हा परिषद वित्त विभागाशी संबंधित माहिती कार्यकारी अभियंत्यास हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत संबंधितांकडून उपलब्ध होईल, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने मागणी केलेली वित्त विभागाशी संबंधित माहिती, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या अधिनस्त तालुकास्तरीय सर्व संबंधित जिल्हा परिषद,बांधकाम उपविभागाकडून संकलीत करुन एकत्रित माहिती, अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित जन माहिती अधिकाऱ्यासह त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, (भूम वगळता) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना जिल्हा परिषद वित्त विभागातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या आस्थापनेवरील सर्व संबंधित कर्मचारी/अधिकाऱ्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०२-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विष्णूपंत शंकरराव धाबेकर, रा.तांबरी विभाग,विद्यानगर, उस्मानाबाद -४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (सार्वजनिक बांधकाम),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५१५
निर्णय दिनांकः ०२-०२-२०१०

१. श्री. शेख इकबाल खलील बागवान, : अपिलार्थी
रा.परंडा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष भूसंपादन अधिकारी,
(ल.सिं.का.), मुख्यालय परंडा, जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विशेष भूसंपादन अधिकारी (ल.सिं.का.),उस्मानाबाद.
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती.

(अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे)

"डोंजा येथील गट क्रमांक ८८३ संपादीत जमीनीचा मावेजा आरोपी नं. १,२ ला मनाई हुकम अस्ताना ५/८/०८ चेक कसा दिला व १३/८/०८ ला ॲडव्हाईस कसा दिला, त्याच गट नंबर मध्ये मला १४/८/०८ ला चेक दिला परंतु मला का ॲडवाईस दिला नाही हयाचा खुलासाचे माहिती देणे, तसेच होणाऱ्या विलंबास माझ्या नुकसान ला जिम्मेदार कोण?"

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचे प्रकरण न्यायालयात चालू असल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या गट नंबरचा ॲडव्हाईस तूर्त देता येणे शक्य नसल्याचे कळविले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्याकडे दि. ३०.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीचा सदर अपील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय होऊ शकला नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या भूसंपादित जमिनीसंदर्भात दिवाणी न्यायालयात वाद चालू होता, त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या संपादित जमिनीच्या मावेजाची रक्कम रु.१,३६,८५०/- इतकी त्यांना दि. १४.०८.२००८ रोजीच्या धनादेशाद्वारे अदा करण्यात आली होती, तथापि न्यायालयाचा मनाई हुकूम असल्यामुळे नंतर या धनादेशाची अदायगी थांबविण्यात आली होती व अंतिमतः

न्यायालयाच्या निर्णयानंतर दि. १३.०७.२००९ रोजी अपिलार्थीस हा मावेजा अदा करण्यात आला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या हेतूसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २४.१०.२००८ रोजी मूळ अर्ज केला होता, तो त्यांचा हेतूच आता साध्य झाला आहे. त्याबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निर्णयाबाबतची अथवा कृतीबाबतची कारणे, स्पष्टीकरणे मागणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे खुलासे अर्जदारास करणे अशाप्रकारच्या प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींमध्ये अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मूळ माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या पार्श्वभूमीवर अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख इकबाल शेख खलील बागवान, मंडई पेठ,परंडा,ता.परंडा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी,(ल.सिं.का.),उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५१६
निर्णय दिनांक: ०२-०२-२०१०

१. श्री. रामचंद्र मारुती कांबळे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
उपविभाग तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,
उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग,तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट बुध्दीने त्यांना माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयीन कामकाजाविषयी व तुळजापूर तालुक्यातील त्यांच्याकडील सर्व कामांविषयी सन २००० ते दि. ०६.१०.२००८ या अंदाजे नऊ वर्षांच्या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"१. मोटार रोजवहीची प्रती, उपविभाग व विभाग २) तुळजापूर कार्यालयीन कर्मचारीवर्ग किती त्यांचे पदनाम व मुख्यालयाशी राहतात का, राहत आसल्यास पुरावा सादर करावे, ३) दौरा व इतर कामी पेट्रोल/डिझेल खर्च किती, दरमहा खर्चाचा तपशिल दयावा व दौरा रजिस्ट्रीच्या प्रती व पेट्रोल/डिझेल नोंदवहीच्या प्रती, ४) तुळजापूर तालुक्यातील सर्व कामाचे आजपर्यंतचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम किती, ५) तालुक्यातील एकूण कामे किती याची गाववाईज माहिती द्यावी, ६) तालुक्यातील सर्व कामाचे, इस्टीमेंट,एम.बी.सी.सी.कॉलटी रिपोर्ट व वर्क ऑर्डरच्या नक्कल प्रती दयावे, ७) टेंडर नोटिस (निविदा) प्रती ८) बिल देयक प्रती, ९) ज्यांनी कामे केलेली आहेत, त्याची रजिस्टेशन सर्टीफिकेट नोंदणी प्रमाणपत्र किंवा संस्थेचे नोंदणी प्रती."

अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली असून या अर्जामध्ये त्यांनी, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संदिग्ध स्वरुपात असल्याचे स्पष्ट करुन त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने तसे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. ०६.०१.२००९ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असून त्यांना दिलेल्या माहितीपैकी बऱ्याच मुद्यांवर माहिती शोधण्याचे काम चालू आहे, असे कळविले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या कामांचा दर्जा निष्कृष्ट आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याकरिता त्यांनी एकूण ३४८ पृष्ठांची माहिती तयार करुन ठेवली आहे. त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची तपासणी त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात येऊन ही माहिती तपासल्याचे दाखवून, ती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे तोंडी अभिप्राय व्यक्त केले व ते कार्यालयातून निघून गेले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती ही प्रचंड आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तयार करुन ठेवली आहे. परंतु ही माहिती दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो ज्या-ज्या मुद्यांवर माहिती शोधण्याचे काम चालू आहे, असे कळविले आहे, त्या मुद्यांवरील त्यांच्याकडील उपलब्ध माहिती, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी पूर्वी तयार करुन ठेवलेली माहिती व या आदेशाद्वारे अपिलार्थीस

द्यावयाची माहिती ही सर्व माहिती एकत्रित करुन, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या कामाच्या दर्जाविषयी आक्षेप घेतले आहेत. यासंदर्भात त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या कामाच्या दर्जाबाबतच्या आक्षेपाचे निराकरण जलसंपदा विभागातील सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन ठेवलेली माहिती त्यांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०२-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामचंद्र मारुती कांबळे, वेताळनगर,तुळजापूर,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)उपविभाग तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७१३
निर्णय दिनांक ०२/०२/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अन्सारी तौहिद कमरुद्दीन,<br>रा.मालेगांव, जि. नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष,<br>जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक विभाग,<br>नाशिक | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष,<br>जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक विभाग,<br>नाशिक | | |

**निर्णय**

श्री. अन्सारी तौहिद कमरुद्दीन यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १३.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ३०.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २५.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :    ०२/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.  अन्सारी तौहिद कमरुद्दीन, स.नं.२१, प्लॉट नं. ३२, मिर्झा गालिब रोड, जुने फरान हॉस्पिटल जवळ, बडी मक्का जस्जिद समोर, इस्लामपूरा वॉर्ड, मालेगांव, जि.नाशिक ४२३ २०३.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७१४
निर्णय दिनांक ०२/०२/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. साबळे अरुण दौलत,<br>रा.ढोरजळगांव शे, ता.शेवगांव, जि. अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, नेवासा, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, अहमदनगर | | |

**निर्णय**

श्री. अरुण दौलत साबळे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०८.२००९ रोजी केलेले दि. २०.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १२.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.०८.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २२० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण दौलत साबळे, रा.मु.पो.ढोरजळगांव शे, ता.शेवगांव, जि.अहमदनगर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८५
निर्णय दिनांक ०२/०२/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शकील अकबरखान पठाण,<br>रा.श्रीरामपूर, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, श्रीरामपूर, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>श्रीरामपूर, जि. अहमदनगर | | |

**निर्णय**

श्री. शकील अकबरखान पठाण यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०३.०८.२००७ रोजी केलेले दि.०७.०८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १९.१२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २९.०१.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२/०२/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शकील अकबरखान पठाण, H-२६, फातेमा हौसिंग सोसायटी, A/P/T, श्रीरामपूर, जि. अहमदनगर ४१३ ७०९.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ५०५
निर्णय दिनांक ०२-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेश रमेश पाटील,<br>जी - १/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर,<br>उस्मानपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, विभागीय उपसंचालक<br>कार्यालय, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, विभागीय उपसंचालक<br>कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : | जन माहिती अधिकारी | : | शिक्षण उपनिरीक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद |
| | | जन अपिलीय अधिकारी | : | विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०२-०२-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक ५०५/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ५०५/२००९, दिनांक २४-०२-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महेश रमेश पाटील, जी - १/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक

कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५०६

निर्णय दिनांक ०२-०२-२०१०

१ श्री. नरेश निळकंठ धाबर्डे, : अपिलार्थी
रा. नारळीबाग, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
फुलंब्री, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
पदमपुरा, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती प्राप्त झाली आहे त्यामध्ये मुद्दा क्रमांक १ मधील हॅण्डरिसीप्ट व ॲवार्ड यांच्या छायांकित प्रती, मुद्दा क्रमांक २, ३, ५ व ६ च्या संदर्भात कोणतीही माहिती दिली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे गाडेजळगांव ते सटाना चौक, दुधड ते सटाना चौक या रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या कामाच्या संदर्भात, काम सुरु झाल्यापासून ते अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज केल्याच्या दिनांकापर्यंत काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तथापि माहिती देण्यासाठी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेली मुदत व्यपगत होण्यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्चितपणे केव्हा माहिती पुरविली हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र प्राप्त माहितीतील वरील परिच्छेदात नमूद केलेल्या त्रुटी दर्शवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे नमूद केलेल्या अपूर्ण माहितीच्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यापैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये "या कामावर कोणी तक्रार केली होती काय? " या मुद्यावर अपिलार्थीस जन

माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. परिणामी ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. बाकी उर्वरित संपूर्ण माहिती ही अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, देय होत आहे. अपिलार्थीस आता देणे बाकी असलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाच्या राहिलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ मधील वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेला मुद्दा वगळता, उर्वरित मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी वरील कालावधीमध्ये पुर्वनियोजीत वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील व त्यांना देय असलेली उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वतः विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित देय माहिती त्यांना,

हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नरेश निळकंठ धाबर्डे, रा. नारळीबाग, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५०७

निर्णय दिनांक ०२-०२-२०१०

१ श्री. चावरे राष्ट्रपाल दत्ता, : अपिलार्थी

मु. पो. काटकळंबा, ता. कंधार, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

गट विकास अधिकारी, पंचायत समिती कंधार, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांना मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो मिळाली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९७५ ते १९८५ या कालावधीमध्ये मौजे काटकळंबा, तालुका कंधार येथील पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात एकूण ३ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौजे काटकळंबा येथे पाणी पुरवठ्यासाठी या

कालावधीमध्ये खोदण्यात आलेल्या विहिरीची संख्या, विहिरी कोणत्या निधी अंतर्गत खोदण्यात आल्या होत्या त्याची माहिती व त्यांच्या इन्स्ट्रमेंटच्या सत्यप्रती आणि विहिरी मंजुरीसाठी ग्रामपंचायत कार्यालय काटकळंबा यांनी मंजुरीसाठी पाठविलेल्या ठरावाची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०१-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दिनांक १२-०२-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना त्यांच्या निर्णयाचे स्मरण देऊन अद्यापपावेतो त्यांना माहिती प्राप्त न झाल्याचे अवगत केले होते. यानंतरही अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती न दिल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ मध्ये "त्यांच्या इन्स्ट्रमेंटच्या सत्यप्रती देणे " हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या "इंन्स्ट्रमेंटच्या सत्यप्रती " या शब्दावरुन अपिलार्थीस नेमके काय म्हणावयाचे आहे याचा अर्थबोध आयोगास होत नाही. त्यामुळे ही माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीने दिनांक २५-११-२००८ रोजी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कंधार यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०२-२००९ पर्यंत दिली नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती कंधार (दिनांक २५-११-२००८ ते २४-१२-२००९ या कालावधीमध्ये कार्यरत असलेले गट विकास अधिकारी) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित "इंन्स्ट्रमेंटच्या सत्यप्रती" हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी (दिनांक २५-११-२००८ ते २४-१२-२००९ या कालावधीमध्ये कार्यरत असलेले गट विकास अधिकारी) यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चावरे राष्ट्रपाल दत्ता, मु. पो. काटकळंबा, ता. कंधार, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५०८

निर्णय दिनांक ०२-०२-२०१०

१ श्री. भारत छोटूलाल चव्हाण, : अपिलार्थी
द्वारा, कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम
विभाग, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०१-१०-२००८ रोजी पाठविलेली माहिती ही अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या दिनांक ११-०६-२००८ च्या निर्णयाच्या अनुषंगाने नाही आणि कार्यकारी अभियंता यांच्या म्हणण्यानुसार ७/१२ वरील रकाना क्रमांक १५ मध्ये सामाईक क्षेत्र अशी नोंद नाही, त्यामुळे ही माहिती त्यांच्या मूळ अर्जाच्या विनंतीच्या अनुषंगाने नाही म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक ३०-१२-२००८ रोजीचे

आदेश रद्दबात्तल करण्याची आणि " उस्मानाबाद गट क्रमांक ६१४ मंजुर शेततळे प्रकल्प (लाभार्थी सौ. मेघमाला रावसाहेब जाधव) हे सामाईक क्षेत्रात असल्याबाबत गावनमुना ७/१२ च्या सत्यप्रती, रजिस्टर्ड पास्टाने पुरविणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेश द्यावेत, अशी विनंती त्यांनी आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " उस्मानाबाद गट क्रमांक ६१४ - मंजुर शेततळे प्रकल्प (लाभार्थी - सौ. मेघमाला रावसाहेब जाधव) हे सामाईक क्षेत्रात असल्याबाबत गावनमुना ७/१२ च्या सत्यप्रती रजिस्टर्ड पोस्टाने मिळणे बाबत, " अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार उपअभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद उपविभाग, उस्मानाबाद यांच्याकडे पाठविला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर संबंधित उप अभियंत्याने अपिलार्थीस या माहितीसाठी त्यांच्या कार्यालयात एकूण रु. २७ /- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २६-०९-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ०१-१०-२००८ रोजी संबंधित उप अभियंत्याने रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपिलार्थीस माहिती पाठविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०८-१०-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-१२-२००८ रोजी निर्णय देऊन, उप अभियंत्याने या प्रकरणी केलेली कार्यवाही बरोबर असल्याचा निष्कर्ष काढून

अपिलार्थीचे अपील निकाली काढले. परंतु या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे उस्मानाबाद गट क्रमांक ६१४ च्या ७/१२ च्या उताऱ्याची सत्यप्रत मागितली होती. त्याप्रमाणे त्यांनी या गट क्रमांकाच्या ७/१२ ची सत्यप्रत अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, " उस्मानाबाद येथील गट क्रमांक ६१४ च्या ७/१२ च्या उताऱ्यावरील १५ क्रमांकाच्या स्तंभामध्ये जमीन करणाऱ्यांचे नाव त्यामध्ये "सर्वजण खुद्द" अशी नोंद झालेली आहे. तथापि अपिलार्थीस ही नोंद "सामाईक क्षेत्रात" अशी अपेक्षित असल्याचे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील त्यांच्या विनंतीवरुन दिसून येत आहे. या ठिकाणी असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने ज्या जमिनीच्या ७/१२ च्या उताऱ्याची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, त्यांनी ती प्रत जशीच्या तशी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पाठविलेली आहे. अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना जर या ७/१२ च्या उताऱ्यामधील १५ क्रमांकाच्या रकान्यामध्ये बदल करुन हवा असेल तर त्यांनी

महसूल विभागाच्या अथवा अन्य सक्षम प्राधिकरणाशी संपर्क साधून आपल्या गाऱ्हाण्याची तड लावावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या दिनांक ११-०६-२००८ रोजीच्या आदेशाच्या अहवालावरुन त्यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे या संदर्भातील प्रत त्यांना हवी असल्याचे नमूद केले आहे. तथापि याच निर्णयामध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने गट क्रमांक ६१४ मधील सर्व मालकी हक्क असणाऱ्या शेतकऱ्यांनी संयुक्त मोजणीसाठी अर्ज सादर करुन मोजणी करुन आपापली हद्द निश्चित करुन घ्यावी, असे सूचित केले आहे. ही सूचना करण्याच्या मागे त्यांचा हेतू असा आहे की, संदर्भीत शेततळयाचे काम नेमके कोणाच्या क्षेत्रात झाले आहे हे या मोजणीनंतर स्पष्ट होईल, या मुद्यावर गट क्रमांक ६१४ मध्ये मालकी असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी काय कार्यवाही केली, याची आयोगास कल्पना नाही. तसेच अशाप्रकारच्या प्रशासकीय बाबीमध्ये निर्णय देण्याचे अधिकार आयोगास नसल्यामुळे, अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे उपस्थित केलेल्या द्वितीय अपील अर्जातील सर्व मुद्दे अशाप्रकारे निकाली निघत असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भारत छोटूलाल चव्हाण, द्वारा, कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५०९

निर्णय दिनांक ०२-०२-२०१०

१ श्री. सिद्दिकी रियाज अहेमद अब्दुल हफीज, : अपिलार्थी
चौफाळा पोस्ट ऑफिसजवळ,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा
(मुलांचे), लालवाडा, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेतील दिनांक ०१-०२-२००७ ते ३०-११-२००७, दिनांक ३०-०६-२००८ ते ३१-०८-२००८ आणि दिनांक ०१-०९-२००८ ते ०६-१२-२००८ या कालावधीशी संबंधित शिक्षक व कर्मचारी यांच्या हजेरीपटावरील पान क्रमांक ०१ आणि शेवटच्या दोन पानांची

छायांकीत प्रत व सन २००७-०८ ची सेवाज्येष्ठता यादी व संयुक्त सेवाज्येष्ठता यादी, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. परिणामी अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते असून त्यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार असल्याचे त्यांना समजल्यावरुन त्यांनी दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जान्वये माहिती अधिकाराच्या तरतुदीअंतर्गत ही माहिती संबंधित शाळेकडून मागविली होती. या शाळेत ही माहिती घेण्यासाठी ते ५ ते ६ वेळा उपस्थित राहूनही त्यांना संबंधित मुख्याध्यापकाने कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु त्यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाकडे पूर्ण दुर्लक्ष करुन अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवले. त्यामुळे या सर्व संबंधितांवर २५००० रुपये शास्ती लावावी व त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर तात्पुरते कार्यभार सांभाळत असून त्यांच्या पूर्वीच्या मुख्याध्यापकाकडून त्यांना पूर्ण पदभार मिळालेला नाही. त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांच्या शाळेतील लिपीक श्री. महंमद खलीलोद्दीन पिता जैनोद्दीन यांना सूचित केले असता, त्यांच्या लेखी सूचनाचे पत्र घेण्याचे संबंधित लिपिकाने नाकारले. त्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही. आता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांनी बरोबर आणली असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत होती, त्यामुळे ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसाच्या आत, अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळवून त्यांना देणे, अशा प्रकारची कार्यवाही त्यांच्याकडून अभिप्रेत होती. मात्र उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये दिनांक ०१-०२-२००७ आणि ३०-११-२००७ या कालावधीशी संबंधित माहितीचा समावेश नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या सेवाज्येष्ठता यादीवर अपिलार्थीचे समाधान झालेले नाही. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना या संस्थेच्या सर्व शाळांमधील शिक्षकांची एकत्रित सेवाज्येष्ठता यादी अपेक्षित आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या प्रकरणी माहितीसाठीच्या अर्जातील मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा (मुलांचे), नांदेड यांनी त्यांच्या शाळेतील शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेची यादी आता त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य देऊ केली आहे. या संस्थेच्या उर्वरित शाळा या माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज)

च्या तरतुदीप्रमाणे स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहेत त्यामुळे उर्वरित शाळांच्या शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेसाठी त्यांनी संबंधित शाळांकडे वेगळ्याने अर्ज करणे इष्ट राहील.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती देण्याकरिता मुख्याध्यापकाचे सहायक श्री. महंमद खलीलोद्दीन पिता जैनोद्दीन, लिपीक यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचे पत्र घेण्याचे नाकारले अशा प्रकारचा युक्तिवाद जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केला आहे. यावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या प्रक्रियेमध्ये अडथळा आणला असल्याचे सिध्द होत आहे. सबब ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब श्री. महंमद खलीलोद्दीन पिता जैनोद्दीन, लिपीक, मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा (मुलांची), नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठीच्या प्रक्रियेमध्ये अडथळा आणल्याबद्दल त्यांचेवर एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या प्रक्रियेमध्ये अडथळा आणल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. उर्वरित माहिती गहाळ झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले तर त्यांनी ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या व्यक्तीवर होती त्यांच्यावर फौजदारी गुन्हा नोंदवावा व त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावी.

प्रसंगावशात् आयोगास असे आढळून आले आहे की, नांदेड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद हे त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दाखल होणा-या अपील अर्जांवर एखादा अपवाद वगळता कधीही सुनावणी घेत नाहीत व अशा प्रकारे आपली जबाबदारी टाळत असतात. त्यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची योग्य दखल सचिव (शालेय शिक्षण) यांनी त्यांच्या स्तरावर घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. श्री. महंमद खलीलोद्दीन पिता जैनोद्दीन, लिपीक, मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा (मुलांची), लालवाडा, नांदेड यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठीच्या प्रक्रियेमध्ये अडथळा आणल्याबद्दल एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झ ाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सिद्दिकी रियाज अहेमद अब्दुल हफीज, चौफाळा पोस्ट ऑफिसजवळ, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा (मुलांची), लालवाडा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. महंमद खलीलोद्दीन पिता जैनोद्दीन, लिपीक, मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा (मुलांची), लालवाडा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५१०

निर्णय दिनांक ०२-०२-२०१०

१ श्री. एम. ए. खदीर पिता एम. ए. करीम, : अपिलार्थी

ओरिऐंटल मेकॅनिकल वर्कशॉप, मध्यवर्ती जकात

नाक्याजवळ, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड

त्रयस्थ पक्ष : १) श्री. जे. बी. धावडे, २) श्री. एस. आर. पवार, ३) श्री. एस. जी. राठोड, ४) श्री. जी. एम. कंधारे, ५) श्री. कदम, श्री. ६) एन. एम. शिंदे, ७) श्री. जे. बी. काबरा

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी १९ दिवसाच्या विलंबाने अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. जे. बी. धावडे, कनिष्ठ लिपीक व इतर सहा कर्मचा-यांच्या आस्थापनाविषयक बाबी संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०१-०४-२००७ ते ०५-०८-२००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षांची सध्याची पोस्टींग व कार्यकाळ, त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या आदेशाच्या सत्यप्रती, तसेच ॲटेन्डन्स सर्टिफिकेट व वर्कशीटची सत्यप्रत, मुख्य अभियंता यांचे परिपत्रक क्रमांक ५७५ ची सत्यप्रत व त्यावर अनुपालन करण्यात आलेल्या अहवालाची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही भाग अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने माहिती अधिका-याने अपिलार्थीच्या दिनांक ०५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्याकडील दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयास पाठविली व त्याची प्रत अपिलार्थीस देऊन अपिलार्थीस यानंतर दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या त्यांच्या कार्यालयातील माहितीपोटीचे शुल्क रुपये २२ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित करण्यात आले. नंतर अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयातर्फे दिनांक ०२-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३६४ इतके बँकेत चलनाव्दारे किंवा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक

बांधकाम उपविभाग नांदेड यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित करण्यात आले. तथापि अपिलार्थीने त्याप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-११-२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयाव्दारे अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब केल्याचे मान्य करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यानंतर अपिलार्थीस उप विभागीय अभियंता यांनी दिनांक १२-१२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली. तथापि प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि श्री. एस. आर. पवार व श्री. एन. एम. शिंदे हे दोन त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, मुख्य अभियंता यांनी त्यांच्या परिपत्रक क्रमांक ५७५ व्दारे त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना त्यांच्या कर्मचा-यांच्या प्रतिनियुक्तीवर नेमणूका न करण्याचे आदेश देऊन देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्याचे पालन केले नसल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली, असे त्यांना वाटते. तसेच या प्रकरणी त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे देखील त्यांनी आयोगासमोर सांगितले.

जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्या अर्जास

उपविभाग व मंडळ स्तरावरुन अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस रुपये २२ व रुपये ३६४ इतके माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०८-२००८ व ०२-०९-२००८ रोजीच्या पत्रामध्ये अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे या शुल्काचा तपशील अपिलार्थीस पुरविला आहे. परंतु अपिलार्थीने मात्र या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला नाही. तसेच सुनावणीच्या वेळी, व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः कधी उपस्थित राहिले, यासंदर्भात त्यांच्याकडे काही पुरावा आहे काय असे त्यांना विचारले असता, त्याचे अपिलार्थीने नकारार्थी उत्तर दिलेले आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीस सशुल्क माहिती देय असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर टाळल्याचे आयोगास आढळून आले नाही. त्यामुळे अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाली हा त्यांचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे ज्या स्थितीत माहिती उपलब्ध आहे त्या स्थितीत त्यांनी ती अपिलार्थीस पुरविली असल्याचे दिसून येत आहे. परंतु या प्रकरणी अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, मुख्य अभियंता यांचे परिपत्रक क्रमांक ५७५ मधील सूचनांचे पालन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेले नाही त्यामुळे त्यांना प्राप्त झालेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे. अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग अमान्य करत असून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती व या माहितीमधील परिपत्रकाच्या आधारे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने करावयाची कार्यवाही या दोनही बाबी भिन्न स्वरुपाच्या आहेत. अपिलार्थीस जर जन माहिती अधिकारी यांनी, मुख्य अभियंता यांच्या परिपत्रक क्रमांक

५७५ च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही न करण्याबाबत त्यांचे काही आक्षेप असतील तर त्यांनी, या आक्षेपाचे निराकरण संबंधित मुख्य अभियंता यांच्याकडून स्वतंत्रपणे वेगळ्या अर्जाव्दारे करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरते या प्रकरणाकडे पाहावयाचे झाल्यास, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे ज्या स्थितीत उपलब्ध होती त्या स्थितीत ती, त्यांना विनामूल्य पुरविली आहे. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एम. ए. खदीर पिता एम. ए. करीम, ओरिऐंटल मेकॅनिकल वर्कशॉप, मध्यवर्ती जकात नाक्याजवळ, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५११

निर्णय दिनांक ०२-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव,<br>रा. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>शासकीय ग्रामीण उप जिल्हा रुग्णालय, उदगीर, तालुका<br>उदगीर, जिल्हा लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय,<br>उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : भांडारपाल, शासकीय ग्रामीण उप जिल्हा रुग्णालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे दंडनीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २०-०४-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली असून प्राप्त माहितीबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्राचा संदर्भ जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील पत्र क्रमांक ७१८, दिनांक १७-०४-२००९ असा दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्राचे अवलोकन केले असता सदरचे पत्र या प्रकरणाशी संदर्भित अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील केलेल्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाशी संबंधित आहे. त्यामुळे या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस आता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०३-२००९ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक २०-०४-२००९ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता व विशेषतः अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी मागणी केलेली प्रचंड व्याप्तीची माहिती विनामूल्य पुरविली असल्यामुळे, अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्यात यावी ही विनंती, आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, रा. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल, शासकीय ग्रामीण उप जिल्हा रुग्णालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५१२

निर्णय दिनांक ०२-०२-२०१०

१ श्री. बालाजी बळीराम बंडे, : अपिलार्थी

मु. पो. मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग,

मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

जिल्हा परिषद, बांधकाम विभाग (दक्षिण), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पूर्णपणे माहिती दिली नाही तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या निर्णयामध्ये अपिलार्थीस त्यांनी भरलेले शुल्क परत करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सदरचे शुल्क परत केले नाही व दिनांक ११-०१-२०१० रोजी अर्धवट माहिती दिली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०१-२००७ ते ११-०८-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण नऊ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६४४ इतके त्यांना चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा मुखेड येथे भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १०-०९-२००८ रोजी सदर बँकेत शुल्काचा भरणा केला व चलनाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केली. तथापि शुल्क भरुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस एका आठवड्याच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०१-२००९ रोजी व त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात दिनांक ११-०१-२०१० रोजी काही माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००९ रोजी व दिनांक ११-०१-२०१० रोजी मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात

काही माहिती पुरविली आहे. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती पुरविलेली नाही. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, मुद्दा क्रमांक ४ मधील कार्यारंभ आदेश व मोजमाप पुस्तिकांच्या झेरॉक्स प्रती, मुद्दा क्रमांक ७ मधील कामाच्या अंदाजपत्रकाच्या व कार्यारंभ आदेशाच्या प्रती व मुद्दा क्रमांक ८ व ९ या मुद्दयांवरील संपूर्ण माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून येणे बाकी आहे. उर्वरित मुद्दयांवरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर व अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने प्राप्त झाली आहे. या प्रकरणी त्यांना विनामूल्य माहिती देय असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना भरलेल्या शुल्काचा परतावा अद्यापपावेतो केला नाही. या सर्व प्रकरणामध्ये अपिलार्थीस सुमारे १००० रुपयाचे आर्थिक नुकसान झाले असून याशिवाय वेगळा मनःस्तापही झालेला आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस त्यांना या प्रकरणाशी संबंधित नुकसानभरपाई म्हणून १००० रुपये इतकी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावी व त्यांनी माहितीपोटी भरलेले शुल्क त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून परत मिळावे आणि उर्वरित माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी असे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांना आयोगासमोर कोणताही युक्तिवाद करता आला नाही. या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे त्यांना आयोगास दाखविता आली नाहीत परंतु अपिलार्थीस या प्रकरणी अद्यापपावेतो द्यावयाची माहिती ते सात दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवतील, असे त्यांनी आयोगास अवगत करुन दिले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रत्यक्षात दिनांक २२-०१-२००९ रोजी म्हणजेच, अधिनियमाव्दारे विहित केलेली माहिती देण्याची

मुदत व्यपगत झाल्यानंतर, दिली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काचा तपशील दिलेला नाही, जो त्यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस देणे आवश्यक आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती दिलेली आहे. अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अद्यापपावेतो अपिलार्थीस परत केलेले नाही आणि अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ अंशतः, मुद्दा क्रमांक ४ अंशतः, मुद्दा क्रमांक ७ अंशतः, व मुद्दा क्रमांक ८ व ९ या मुद्दयांवरील कोणतीही माहिती दिली नाही. अपिलार्थीस आज ही माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस आतापर्यंत द्यावयाची राहिलेली उर्वरित सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. त्यामुळे अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी स्विकारलेले माहितीपोटीचे शुल्क रुपये ६४४ इतके त्यांना परत करावे लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या आदेशान्वये देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी भरणा केलेले शुल्क परत करण्याचे आदेश दिले होते. तरीही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्क परत न केल्यामुळे अपिलार्थीस या शुल्कावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्याज देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ६४४ इतके त्यांना दिनांक ०१-०२-२००९ रोजीपासून दिनांक ०२-०२-२०१० पर्यंतच्या कालावधीचे दर साल दर शेकडा १२ टक्के या व्याजाच्या दराने व्याजाच्या रकमेसह हे आदेश

निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. या मुदतीपेक्षा अपिलार्थीस शुल्क परत करण्यास जास्त वेळ लागला तर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १८ टक्के दराने व्याज द्यावे लागेल.

अपिलार्थीच्या, त्यांनी या प्रकरणातील नुकसानभरपाईपोटी एकूण १००० रुपयाच्या मागणी संदर्भात अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे सिध्द झाले असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही नुकसानभरपाई रोख रकमेच्या स्वरुपात अदा करावी लागेल. या प्रकरणी अपिलार्थीस मुखेड येथून औरंगाबाद येथे येण्याजाण्यासाठी, मुखेड ते नांदेड, नांदेड ते औरंगाबाद या प्रवासाच्या भाड्याच्या आणि दिवसभराच्या खर्चापोटी अपिलार्थीस एकूण ३५० रुपये इतकी नुकसानभरपाई देणे या प्रकरणी योग्य राहील, असे आयोगाचे मत आहे. सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (चार) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस ३५० रुपये इतकी रक्कम नुकसानभरपाईपोटी अदा करावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीने शुल्क भरुनही त्यांना न देणे, जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन न करणे, अशा प्रकारच्या कृतीव्दारे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, मुखेड यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ६४४ इतके त्यांना वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्याजासह परत करावे.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांना झालेल्या नुकसानभरपाईपोटी रुपये ३५० इतकी रक्कम अदा करावी.

५. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड (श्री. बी. जे. पवार, सध्या उप अभियंता, उपविभाग, वसमत जिल्हा हिंगोली या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बालाजी बळीराम बंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य, मु. पो. मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग (दक्षिण), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२५
निर्णय दिनांक: ०३-०२-२०१०

१. श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर

२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शहर पोलीस उपअधीक्षक,लातूर
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकाऱ्याकडे मनिऑर्डरद्वारे रु.७२/- इतके शुल्क भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर मुदत संपूनही कोणतेही उत्तर न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीचा दि. २९.०७.२००८ रोजीचा अर्ज नेमका कोणत्या कारणाकरिता

पेडींग ठेवण्यात आला, या अर्जावर कोणते अधिकारी निर्णय घेणार त्यांचे नाव, उक्त अर्ज केव्हा निकाली काढणार याचा कालावधी द्यावा, अशाप्रकारच्या माहितीबरोबरच अपिलार्थीने त्यांच्या अर्जासंदर्भात चौकशी करणारे पोलीस अंमलदार श्री. कांबळे, श्री. पठाण यांनी अपिलार्थीने पूर्ण कागदपत्रे दाखविली असताना देखील त्यांचा प्लॉट पाहण्यास नकार दिला व त्यांना संरक्षण देण्याचे जाणूनबुजून टाळले. श्री. चेतन कोले,श्री. दिनेश बेंबडे,श्री.प्रवीण मदने (येळे) यांना व त्यांच्या सहायकांना ते बेकायदेशीर सहाय्य करीत असल्याची तक्रार करुन या प्रकरणात चौकशी करुन अपिलार्थीस पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशी जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दि. ०१.११.२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पाठविली. परंतु ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.११.२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१२.२००८ रोजी अपिलार्थीस, अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे, त्यांचे प्रथम अपील निकाली काढल्याचे कळविले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून मनीऑर्डरद्वारे

शुल्क स्वीकारुनही त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही. केवळ जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्या घराचे बांधकाम तसेच पडून राहिले. त्यांनी त्यांच्या मालकीच्या प्लॉटवर बांधकाम सुरु केले असता, त्यांना सोसायटी बांधकाम करु देत नाही म्हणून त्यांना पोलीस संरक्षणाची आवश्यकता होती. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित प्राप्त व्हावी, अशी त्यांनी आयोगास आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १०.११.२००८ व २५.११.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. न्यायालयाच्या आदेशाशिवाय ते अपिलार्थीस त्यांच्या अपेक्षेप्रमाणे पोलीस संरक्षण देऊ शकत नाहीत. कारण अपिलार्थीच्या बांधकामासंदर्भात सोसायटी व अपिलार्थी यांच्यामध्ये वाद आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा 'B' द्वारे अपिलार्थीने त्यांच्या "दि. २९.०७.२००८ रोजीच्या अर्जावर कोण निर्णय घेणार त्या अधिकाऱ्याचे नाव",एवढीच माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने आणि या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अमूर्त स्वरुपात आणि भविष्यकाळातील माहिती मागविली असल्याने, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. तसेच या अर्जातील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी पोलीस संरक्षण देण्याची विनंती केली आहे. अशाप्रकारच्या विनंतीवर आदेश देणे, आयोगाच्या अधिकारितेच्या कक्षेत नाही.

अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वर नमूद केलेल्या मुद्दा 'B' शी संबंधित अंशतः माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.११.२००८ रोजी पाठविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, या मुद्यावर अपिलार्थीच्या प्रकरणाची तत्कालीन स्थिती स्पष्ट होत आहे. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविलेली दि. १०.११.२००८ व २५.११.२००८ रोजीची पत्रे प्राप्त झाली नाहीत, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तेव्हा अपिलार्थीस आता माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १०.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेली माहिती व दि. २५.११.२००८ रोजीच्या पत्राची प्रत, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या दि. ०१.१०.२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क कळविले आहे. तथापि अधिनियमातील कलम ७(३)(क)च्या तरतुदीप्रमाणे या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये पुरविलेला नाही. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहिती पाठविल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर करता आला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु. ७२/- इतके अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करण्यात यावे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा 'B' शी संबंधित माहिती, त्यांच्या दि. २५.११.२००८ रोजीच्या पत्राच्या आणि दि. १०.११.२००८ रोजी पाठविलेल्या माहितीच्या प्रतीसह त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा 'B' शी संबंधित माहिती त्यांच्या दि. २५.११.२००८ रोजीच्या पत्राच्या आणि दि. १०.११.२००८ रोजी पाठविलेल्या माहितीच्या प्रतीसह त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.७२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक: ०३-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी,श्रीकृष्णनगर, सम्राट चौक, लातूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शहर पोलीस उपअधीक्षक,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२६
निर्णय दिनांक: ०३-०२-२०१०

१. श्री. गुंडप्पा नागप्पा मुदकण्णा, : अपिलार्थी
रा. मुरुम,ता.उमरगा,जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, मुरुम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर अभियंता,
नगरपरिषद मुरुम, ता.उमरगा,
जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी,
नगरपरिषद, मुरुम,
ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही. त्यांना मुख्याधिकाऱ्याने प्रथम अपिलाच्या संदर्भात सुनावणीसाठी बोलाविले नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"(१) ५ वा वेतन आयोग फरक व वेतन निश्चिती फरकावरील व्याज मिळणेबाबत १.सप्टेंबर २००८ ते वाटप केलेल्या तारखेपर्यंत तसेच निवृत्तीवेतन, उपदान अंशराशीकरण, रजा रोखीकरणाची रक्कम किती? (२) वरीलप्रमाणे रकमा न देण्याचे कारण काय? १ सप्टेंबर २००६ पासून दि. ३१ मार्च २००७ पर्यंत व्याजासह रक्कम किती होते व दि. १ एप्रील २००७ पासून चक्रवाढव्याजासह किती रक्कम होते ती रक्कम एक मुस्त व्याजासह देण्याची माहिती मिळणेबाबत"

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाच्या तसा घेतला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे दि. ०४.११.२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी त्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली नसल्यामुळे त्यांनी दि. २४.११.२००८ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, मुरुम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज पाठविला. परंतु मुख्याधिकारी, नगर परिषद, मुरुम यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या सेवानिवृत्तीचे अनुषंगीक भत्ते व पाचव्या वेतन आयोगानुसार त्यांच्या वेतनातील फरक त्यांना व्याजासह मिळावा म्हणून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती मागविली होती.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस देय असलेला वेतनाचा फरक त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज करेपर्यंत निश्चित केला नव्हता, तथापि आता अपिलार्थीस देय असलेली सेवानिवृत्तीनंतरची देय रकमेची माहिती तयार केली असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती आयोगासमक्ष हस्तांतरित केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, प्रश्नार्थक स्वरुपाची असून या अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना माहिती तयार करुन ती अपिलार्थीस देण्याची विनंती केली होती. तसेच त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीस सेवानिवृत्ती वेतनाची रक्कम न देण्याचे कारण काय, असे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती देखील मागितली होती. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे मागणी केलेली माहिती आज रोजी आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झालेली आहे.

अपिलार्थीस आयोगाने,त्यांच्या वेतनविषयक थकबाकीवर मुरुम नगरपरिषदेने त्यांना व्याज द्यावे, अशा अर्थाचे आदेश पारित करणे अपेक्षित असल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि अशाप्रकारचे आदेश देण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०७.१०.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास श्री. व्हलदुरे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद,मुरुम,ता.उमरगा यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्याधिकारी, नगर परिषद, मुरुम यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, मुरुम यांना श्री. व्हलदुरे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद,मुरुम,ता.उमरगा यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: ०३-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गुडप्पा नागप्पा मुदकण्णा,रा. मुरुम,ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,नगरपरिषद, मुरुम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगरपरिषद, मुरुम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२७
निर्णय दिनांकः ०३-०२-२०१०

१. श्री. विजय गुलाब गेडाम, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
वेतनपथक (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, वेतनपथक, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे, पाचव्या वेतन आयोगाची प्रलंबित देयके पारित करण्यासाठी नंदनवन विद्या मंदिराला दिलेले पत्र आणि ११ जून १९९६ ते ११ जून, १९९७ ची रक्कम जमा न केल्याबाबत त्यांच्यावर वेतन पथकाने गुन्हा नोंदविला का? नोंदविल्यास तो कोणत्या स्वरुपाचा आहे,अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,औरंगाबाद यांच्याकडे दि. २२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दि. १९.०१.२००९ रोजी द्वितीय अपील केले. तथापि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी हे या प्रकरणी द्वितीय अपील अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा दि. १९.०१.२००९ रोजीचा द्वितीय अपील अर्ज अपिलार्थीस त्यांच्या दि. ०२.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे परत पाठविला. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील, "--------त्यांचवर वेतनपथकाने गुन्हा नोंदविला काय?" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस, ती माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने, देय होत नाही. मात्र या अर्जातील उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २७.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २७.०६.२००८ रोजीचा मूळ अर्ज जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वेतन पथकाकडे दि. २७.०६.२००८ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांद्वारे सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीच्या दि. २७.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याचे सिध्द होत आहे. अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीद्वारे या सर्वांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव निःसंशयपणे सिध्द करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली, अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना जिल्हा परिषद,प्राथमिक शिक्षण विभागातील वेतन पथकाचे जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक

कर्मचारी/अधिकारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: ०३-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय गुलाब गेडाम,द्वारा मोहन तायडेचा वाडा, आंबेडकर चौक, भिमनगर, भावसिंगपूरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, वेतनपथक, जिल्हा परिषद (प्राथमिक विभाग), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९२
निर्णय दिनांक: ०३-०२-२०१०

१. सौ. एस.पी.नैण, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण यांचे कार्यालय,नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक संचालक,
सामाजिक वनीकरण विभाग,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द केले असून सदर निर्णय नियमबाहय असल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित व्यापक व्याप्ती असलेली आर्थिक वर्ष २००१

ते २००८-०९ या कालावधीशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीचा दि. २४.०९.२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दि. ०६.१०.२००८ रोजी प्राप्त झाला व या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०५.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या स्तरावरील माहिती दिली व त्यांच्या कार्यक्षेत्रातील तालुका स्तरावरील सर्व जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी,नांदेड, भोकर, हदगाव,कंधार(लोहा), देगलूर,मुखेड,किनवट,माहूर (बिलोली वगळून) यांच्याकडील, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम नमूद करुन, संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे (बिलोली परिक्षेत्र वगळून) या शुल्काच्या रकमेचा भाग त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेल्या माहितीपोटीच्या या शुल्कामध्ये जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र बिलोली यांच्याकडून शुल्कासंबंधी माहिती अप्राप्त असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस बिलोलीशी संबंधित शुल्काचा तपशील कळविता आला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विनादिनांकाच्या आदेशाद्वारे निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील, माहिती अधिकारी यांच्या बाजूने काढण्यात येत आहे, असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ०५.११.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवूनही अपिलार्थीने या प्रकरणी या शुल्काचा भरणा केला नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०५.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सहायक जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, बिलोली वगळता सर्व परिक्षेत्राशी संबंधित आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस कळविले आहे. परंतु या शुल्काचा भरणा अपिलार्थीने अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदीप्रमाणे केलेला नाही. त्याचबरोबर या पत्रामध्ये असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी तथा सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,बिलोली यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम अपिलार्थीस किंवा जन माहिती अधिकाऱ्यास कळविलेली नाही, त्यामुळे आता जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण,परिक्षेत्र बिलोली यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्याच्या परिक्षेत्राशी संबंधित संपूर्ण माहिती अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल. त्यांना यापुढे असेही आदेशित करण्यात येत आहे की, सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण,परिक्षेत्र बिलोली यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांच्या परिक्षेत्राशी संबंधित संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०३-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण,द्वारा. मुख्य कार्यालय,अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ,रा. शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,सामाजिक वनीकरण विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र बिलोली, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,सामाजिक वनीकरण, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७१५
निर्णय दिनांक ०३/०२/२०१०

१ श्री. अनंत शामराव वाघमारे, : अपिलार्थी
रा.शिरसाळा, पो.अंभई, ता.सिल्लोड,
जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पांगरी,
ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, सिल्लोड, जि.औरंगाबाद

**निर्णय**

श्री. अनंत शामराव वाघमारे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०७.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २४.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०१.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** | **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०३/०२/२०१०** | **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनंत शामराव वाघमारे, मु.शिरसाळा, पो.अंभई, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७१६
निर्णय दिनांक ०३/०२/२०१०

१ श्री. वसंत माधवराव खरे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधिक्षक,
शासकीय मुलांचे वस्तीगृह, अंबड, जि.जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जालना

**निर्णय**

श्री. वसंत माधवराव खरे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २७.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २०.०९.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०५.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.२७.११.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ४५५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंत माधवराव खरे, समतानगर, घर क्र. ५-१७-३३, क्रांती चौक पोलीस कॉलनी, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८६
निर्णय दिनांक ०३/०२/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय महादेवराव सोनवणे,<br>रा. तुळजापूर, जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी,<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसचिव,<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे | | |

**निर्णय**

श्री. संजय महादेवराव सोनवणे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०२.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ३१.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, ‘ रायगड ’, राजे संभाजी नगर (प.), तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५१७

निर्णय दिनांक ०३-०२-२०१०

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, : अपिलार्थी

मु. होंडाळा, पो. दापका (राजा), ता. मुखेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

निवासी अपंग कार्यशाळा, उदगीर, जि. लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

समाजकल्याण अधिकारी, गट - अ, जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी प्रथम अपील करुन सुध्दा माहिती पोस्टाने मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी शाळेवर येऊन माहिती घेऊन जाण्यासाठी सांगितले असून पुढे अपिलार्थीस माहिती मिळाल्यावर नियमानुसार संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, निवासी अपंग कार्यशाळा, उदगीर यांच्याकडे 'आपल्या

शाळेची पूर्ण माहिती देणे बाबत' या विषयावर सन १९९७ ते २००५ या कालावधीशी संबंधित विस्तृत व्याप्ती असलेल्या माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीत शासनाकडून प्राप्त झालेला निधी, त्यावर केलेल्या खर्च पावत्याच्या झेरॉक्स प्रती, कर्मचाऱ्यांचा इयत्ता पहिलीचा प्रवेश निर्गम उतारा, या कालावधीतील कर्मचाऱ्यांच्या दैनिक हजेरी रजिस्टरची झेरॉक्स प्रत, शाळेचे ऑडिट रिपोर्ट, विद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती, समाज कल्याण अधिकारी, विभागीय समाजकल्याण अधिकारी, अपंग आयुक्त, पुणे यांनी तपासणी केलेल्या झेरॉक्स प्रती, कर्मचाऱ्यांच्या संच मान्यतेच्या झेरॉक्स प्रती, या कालावधीत विद्यार्थ्यांना परिपोषण आहार दिल्याची प्रत्येक महिन्यानुसार झेरॉक्स प्रत, विद्यार्थ्यांचे हजेरीपत्रक महिनानिहाय - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सांक्षांकित स्वरुपात व नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासोबत ग्रामविस्तार अधिकारी यांच्या प्रमाणपत्राची व कुटुंब प्रमाणपत्राची झेरॉक्त प्रत जोडली असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिनांक १५-१२-२००८ रोजी सुनावणी ठेवल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. तथापि ही सुनावणी होऊन त्यावर निर्णय झाला किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, गट -अ, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या प्रकरणी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

अपिलार्थीचे जर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या या निर्णयाने समाधान झाले नाही तर अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील - प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), ता. मुखेड, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, निवासी अपंग कार्यशाळा, उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट - अ, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२०

निर्णय दिनांक ०३-०२-२०१०

१ श्री. रामराजा नानासाहेब पंडित, : अपिलार्थी
द्वारा, पंडित जॉबवर्क सेंटर, कोर्टाशेजारी, भूम, तालुका भूम,
जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक, लातूर
विभाग, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक कार्यालय, लातूर विभाग, लातूर

जन अपिलीय अधिकारी : नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, लातूर विभाग, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथमतः अपूर्ण माहिती पुरविल्याने, जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांचा चुकीचा पत्ता कळविल्याने, जन अपिलीय अधिकारी यांना माहितीचे शुल्क वसूल करण्याचा अधिकार नसतांना पदाचा व अधिकाराचा गैरवापर करुन अपिलार्थीचे आर्थिक नुकसान करण्याच्या इराद्याने दुसऱ्यांदा माहिती देताना बेकायदेशीरपणे माहितीचे शुल्क वसुल केल्यामुळे व त्यांना मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे व तसेच अपिलार्थीने वारंवार प्रथम अपिलाच्या निर्णयाच्या प्रतीची मागणी करुनही खोडसाळपणे पत्रव्यवहार करुन अपिलाच्या निर्णयाची प्रत पुरविण्यासाठी टाळाटाळ केल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. कावळे, दुय्यम निबंधक, भूम, यांच्या विरुध्द त्यांनी लोकायुक्तांकडे केलेल्या तक्रारीसंदर्भात सन २००७ ते २००८ या कालावधीतीत काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे व टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मा. लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या कार्यालयातील तक्रार क्रमांक ११६६/२००८ च्या अनुषंगाने नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक, लातूर यांनी या तक्रारीसंदर्भात घेतलेल्या जाब जबाबाच्या व कार्यवाहीबाबतचा फाईलच्या संपूर्ण कागदपत्रांच्या प्रती, नोंदणी उपमहानिरीक्षक यांच्या कार्यालयात माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) खाली दाखल झालेल्या अपिलांची संख्या व त्यावरील निर्णयांच्या प्रती, श्री. रामराजा नानासाहेब पंडित यांच्या दिनांक ०८-०१-२००८ रोजी दुय्यम निबंधक, श्री. कावळे यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने नोंदणी उपमहानिरीक्षक यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतच्या फाईलच्या संपूर्ण कागदपत्राच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने ५०/- रुपयांची मनीऑर्डर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-१०-२००८ रोजी अपिलार्थीस एकूण २४ पृष्ठांची माहिती पुरविली. परंतु ही माहिती अपूर्ण व चुकीची वाटल्यावरुन त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०-१०-२००८ रोजी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी नोंदणी महानिरीक्षक हे प्रथम अपिलीय अधिकारी नसल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक यांच्याकडे पाठविला. सदर अर्ज नोंदणी उपमहानिरीक्षक यांना दिनांक २६-१०-२००९ रोजी प्राप्त झाला. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सदर अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील कार्यालयाच्या माहितीचे पृष्ठ एकूण १८०/- इतके असल्याचे अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थीने १८० पृष्ठांच्या माहितीकरता रु. ३६०/- टपाल खर्च रु. ५० इतकी मनीऑर्डर केल्यानंतर त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-१२-२००८ रोजी - मनीऑर्डर प्राप्त झालेल्या दिवशी - रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांना आयोगासमोर कोणताही युक्तिवाद करता आला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-१०-२००८ व २४-१२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली

आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या व जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या अनुक्रमे २४८ व १८० इतकी कळविली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक ०८-०९-२००८ रोजी प्राप्त झाल आहे. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहतीपोटीचे शुल्क रु. ५०/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने रु. ५०/- ची मनीऑर्डर केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक ०१-१०-२००८ रोजी काही माहिती पुरविली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये सुनावणी घेतली नाही व ते अपिलार्थीशी माहितीच्या पृष्ठाबाबत व माहितीबाबत पत्रव्यवहार करत राहिले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्या माहितीपोटीचे तपशीलवार शुल्क, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास कळविणे अभिप्रेत आहे. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीशी परस्पर केलेला पत्रव्यवहार हा अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. आयोगास पुढे असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०१-२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०२-२००९ रोजी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय दिला. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-१२-२००८ रोजी माहिती पुरविल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या प्रकरणी जर जन अपिलीय

अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) मधील तरतुदीमध्ये प्रथम अपिलाची सुनावणी घेतली असती तर अपिलार्थीस उर्वरित माहिती विनामूल्य प्राप्त होऊ शकली असती. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीनंतर करण्याचे सूचित केले आहे. मूळात जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या पत्रामध्ये, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील त्यांनी दिलेला नाही व यानंतर नोंदणी उपमहानिरीक्षकाच्या कार्यालयाने अपिलार्थीकडून परत जादाच्या शुल्काची रक्कम वसूल केली आहे. अशाप्रकारे या सर्व प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १९-०९-२००८ रोजीचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले पत्र अवैध होत आहे व परिणामी अपिलार्थी हे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य माहिती प्राप्त होण्यासाठी पात्र होत आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले एकूण शुल्क रु. ४१०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपिलाच्या निर्णयाची प्रत पुरविण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे म्हटले आहे. परंतु अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०२-२००९ रोजीचे आदेश अपिलार्थीस पाठविल्याचे आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधितांनी आयोगास दाखवून दिले आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या आक्षेपावर आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत. याच बरोबर अपिलार्थीने त्यांना माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविल्याचे नमूद केले आहे. तथापि त्यांच्या मूळ माहितीपैकी अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती मिळणे बाकी आहे, या संदर्भात त्यांनी आवश्यक तो खुलासा

आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही व तसेच हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाल्याचा त्यांचा मुद्दा, आयोग अमान्य करित आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, या माहितीच्या पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती न वाचता येण्याजोग्या अशा अस्पष्ट स्वरुपात त्यांनी अपिलार्थीस पुरविल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस यापूर्वी पुरविलेली माहिती परत त्यांना वाचता येईल इतक्या स्पष्ट स्वरुपात, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वाचनीय व स्पष्ट स्वरुपात, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्विकारलेले एकूण शुल्क रु. ४१०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामराजा नानासाहेब पंडित, द्वारा, पंडित जॉबवर्क सेंटर, कोर्टाशेजारी, भूम, तालुका भूम, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२१

निर्णय दिनांक ०३-०२-२०१०

१ श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, : अपिलार्थी
नगर परिषद शाळा क्रमांक ९, मंठाळे नगर,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उप संचालक कार्यालय,
लातूर विभाग, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उप संचालक कार्यालय,
लातूर विभाग, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक संचालक, शिक्षण उप संचालक कार्यालय,
लातूर विभाग, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. कैलाश माधवगीर गोस्वामी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०१-०२-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडील व्दितीय अपील मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, नगर परिषद शाळा क्रमांक ९, मंठाळे नगर, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, शिक्षण उप संचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उप संचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२२

निर्णय दिनांक ०३-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुळके सुभाष विठ्ठलराव,<br>नवीन वसाहत, हडोळती, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | सहायक अभियंता, महावितरण उपविभाग शिरुर (ता.), अहमदपूर, जिल्हा लातूर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, महावितरण, विभागीय कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे रोख दंडाची व शिस्तभंग-विषयक कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" सदरील भगवंत जिनींग प्रेसींग डीपीवरुन मला विज पुरवठा देणेत आलेला होता परंतू माझ्या एकट्याच विज जोडणी त्यावर होती पण मला कल्पना न देता गेली दहा वर्षापासून विज जोडणी खंडीत केली आहे म्हणून वेळोवेळी वरिष्ठ व आपल्या कार्यालयाकडे तोंडी व लेखी विनंती करुनही जोडणी न देण्याचे कारण काय ? विज जोडणी नसतांना माझेकडून २००६ पर्यंत विज बिलाचा भरणा करुन घेतले आहेत. परंतू विज जोडणी देणेसाठी पर्यायी व्यवस्था केली नाही. "

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि हे अपील त्यांनी परत सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग शिरुर ताजबंद, तालुका अहमदनगर, जिल्हा लातूर यांच्याकडे केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अशा प्रकारे जन माहिती व अपिलीय

अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, कायदेशीर सल्लागार, महावितरण, लातूर हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे श्री. के. जी. साखरे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या प्रमाणात विजेचा वापर केला आहे त्या प्रमाणात वीज बील पाठविले आहे. आता यासंदर्भात अपिलार्थीची कोणतीही तक्रार नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे दिसून येत आहे. या अर्जाव्दारे अपिलार्थीने " ............... वेळोवेळी वरिष्ठ व आपल्या कार्यालयाकडे तोंडी व लेखी विनंती करुनही जोडणी न देण्याचे कारण काय ? " अशा प्रकारची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिका-याने अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करणे इत:पत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीचे समर्थन स्पष्टीकरणाच्या स्वरुपात देणे अशा

प्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही मूळात अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती आता देय होत नाही.

या प्रकरणी आयोगास असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०९-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी श्री. कृष्णा मलय्या इनलोलू, तत्कालीन सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग शिरुर ताजबंद, तालुका अहमदनगर, जिल्हा लातूर (सध्या मंडळ कार्यालय नांदेड महावितरण येथे कार्यरत) यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वत:ला अधिनियमतील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांना संबंधीत जन माहिती अधिकारी श्री. कृष्णा मलय्या इनलोलू, तत्कालीन सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग शिरुर ताजबंद, तालुका अहमदनगर, जिल्हा लातूर (सध्या मंडळ कार्यालय महावितरण, नांदेड येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार देय नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांना संबंधीत जन माहिती अधिकारी श्री. कृष्णा मलय्या इनलोलू, तत्कालीन सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग शिरुर ताजबंद, तालुका अहमदनगर, जिल्हा लातूर (सध्या मंडळ कार्यालय महावितरण, नांदेड येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुळके सुभाष विठ्ठलराव, नवीन वसाहत, हडोळती, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण उपविभाग शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण, विभागीय कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२३

निर्णय दिनांक ०३-०२-२०१०

१ श्री. अनिल पंडितराव काळे, : अपिलार्थी
कनिष्ठ लिपीक,
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता तथा सचिव, शासकीय
निवासस्थान वाटप समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग,
लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ०७-११-२००८ रोजी अंशतः माहिती दिली होती व त्यानंतर अपिलामध्ये

मंजूर झालेल्या आदेशाची पुर्तता न करता काही कर्मचा-यांची नावे त्यांना पुरविण्यात आली आहेत परंतु सदर यादी पूर्णपणे दिलेली नाही म्हणून त्यांनी प्रथमतः केलेल्या मागणीची पुर्तता झाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, लातूर शहरातील शासकीय निवासस्थान प्रकार एक व दोन च्या शासकीय निवासस्थान वाटपाबाबत नोव्हेंबर २००७ ते नोव्हेंबर २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि प्राप्त माहितीवर आक्षेप असल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत त्यांच्या प्रथम अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ६ च्या संदर्भात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी यानंतर दिनांक ०२-०१-२००९ रोजी अपिलार्थीस उर्वरित माहिती दिली परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे जेवढी माहिती उपलब्ध होती तेवढी सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००८ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर दिनांक ०२-०१-२००९ रोजी पुरविली असून अपिलार्थीस आता कोणतीही माहिती देण्याचे, त्यांच्या मते बाकी नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे शासकीय कर्मचारी असून त्यांनी सचिव, शासकीय निवासस्थान वाटप समिती यांच्याकडे दिनांक ०५-१०-२००७ रोजी निवासस्थानाकरिता अर्ज केला होता. या अर्जास अनुसरुन निवास वाटप समितीतर्फे त्यांना आजपर्यंत एकूण चार वेळा निवासस्थान वाटप करण्यात आले होते. (दिनांक १२-०५-२००८, ०२-०६-२००८, २६-०८-२००८ व दिनांक १६-०३-२००९) तथापि अपिलार्थी या निवासस्थानात त्रुटी दर्शवून निवासस्थान बदलून देण्याची विनंती करत असत. या प्रकरणी अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांना केवळ त्रास देण्याचा उद्देश आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, विहित मुदतीत प्रतिसाद दिला असून अपिलार्थीची शंका दूर होण्यासाठी दिनांक ०२-०१-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे आणि अपिलार्थीच्या मते ही यादी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्णपणे दिली नाही आणि त्यांनी प्रथमतः केलेल्या मागणीची पुर्तता झालेली नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या विधानाच्या पृष्ठ्यर्थ कोणताही पुरावा त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही अथवा त्यांना मिळालेली माहिती ही कशा प्रकारे पूर्ण नाही याचे समर्थन करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती त्यांना उपलब्ध करुन देण्यासंदर्भात अधिनियमातील

तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये जर अपिलार्थीस अद्यापही काही शंका असतील तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडील या विषयाशी संबंधित अभिलेख्याची तपासणी करावी जेणेकरुन त्यांच्या शंकांचे निराकरण होऊ शकेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या विषयाशी संबंधित माहिती मागितली आहे त्या विषयाशी संबंधित अभिलेखे त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसापर्यंत अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त कालावधीमध्ये शासकीय कामकाजाच्या कोणत्याही दिवशी पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून या यादीची तपासणी करावी व त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिल पंडितराव काळे, कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२४

निर्णय दिनांक ०३-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. युसूफ एम. पठाण,<br>नॅशनल ओल्ड मोटार्स स्क्रॅप मर्चन्ट शॉप, तजमुल उस्ताद,<br>स्क्रॅप मार्केट, गल्ली, गौसपूरा, लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, जयहिंद प्राथमिक विद्यालय, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व उर्वरित माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधित सन १९९३ ते २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-१२-२००८ रोजी निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांचा हा कथित निर्णय म्हणजे त्यांनी अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांच्याबरोबर केलेल्या चर्चेचे इतिवृत्त असल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या कथित निर्णयानंतर दिनांक १६-१२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती-पैकी जेवढी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती तेवढी माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-१२-२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती दिलेली नाही. मुद्दा क्रमांक ३ शी संबंधीत फक्त सन १९९४, १९९९ सालाचे तपासणी अहवाल दिले आहेत.

यानंतरच्या उर्वरित वर्षाच्या तपासणी अहवालावर जन माहिती अधिकारी यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत. मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात त्रयस्थ पक्षाच्या कायम मान्यता असलेल्या आदेशाच्या प्रती पुरविण्यात आलेल्या नाहीत, मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित सन १९९७-९८ ते २००७-०८ या कालावधीतील वेतन अदा केलेल्या देयकाच्या प्रती अपिलर्थीने मागितल्या होत्या, यापैकी फक्त सन २००७-०८ एवढ्याच कालावधीशी संबंधित प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या आहेत. अपिलार्थीने एकूण मागितलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी पुरवावयाची उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी अशी त्यांनी आयोगास त्यांच्या विचाराधीन अपील अर्जामध्ये विनंती केली आहे. अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाची उर्वरित माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद न देऊन व विलंबाने अपूर्ण माहिती देण्याच्या त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याबद्दल अध्यक्ष, नेताजी सुभाषचंद्र शिक्षण संस्था लातूर संचलित जयहिंद प्राथमिक विद्यालय, लातूर यांना उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील अद्याप द्यावयाची उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अध्यक्ष, नेताजी सुभाषचंद्र शिक्षण संस्था लातूर संचलित जयहिंद प्राथमिक विद्यालय, लातूर यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. युसूफ एम. पठाण, नॅशनल ओल्ड मोटार्स स्क्रॅप मर्चन्ट शॉप, तजमुल उस्ताद, स्क्रॅप मार्केट, गल्ली, गौसपूरा, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जयहिंद प्राथमिक विद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, नेताजी सुभाषचंद्र शिक्षण संस्था लातूर संचलित जयहिंद प्राथमिक विद्यालय, प्रकाशनगर, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर /५१८

निर्णय दिनांक: ०३-०२-२०१०

१. श्री. सुभाष रामराव कदम, : अपिलार्थी
मु. पो. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली - ४३१ ७०५

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग,
नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्राचार्य, बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी
जन अपिलीय अधिकारी : सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड
त्रयस्थ पक्ष : श्रीमती मृदुला भास्करराव मोहोड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८-०१-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची आणि शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या संदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी यांनी दिनांक २५-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे येऊन माहिती पाहण्याचे व नियमानुसार आवश्यक ती फी भरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-१२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी सह संचालकांच्या अनुपस्थितीमुळे होऊ शकली नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात असल्यामुळे, जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण विभाग, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या

दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पाश्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन ३० दिवसाच्या आत आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः ०३-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष रामराव कदम, मु. पो. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली - ४३१ ७०५

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर /५१९

निर्णय दिनांक: ०३-०२-२०१०

१. श्री. राठोड रतन लक्ष्मण, : अपिलार्थी
रा. गोपाळपूर, ह.मु. चंपावती निवास, हनुमान मंदिर रोड, शाहुनगर, मु. पो. ता. जि. बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोपाळपूर, ता. धारुर, जि. बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेण्यासाठी तारीख वाढवून देणे, निर्णय प्रलंबित ठेवणे असे करुन निर्णय देण्याचे टाळले असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. संदेश बंडू माळेकर, श्री. सीताराम राठोड, श्री. नामदेव माळेकर व बाजीराव मुंडे यांच्या प्लॉटचा पी. टी. आर. व त्यांनी ग्रामपंचायतीला घरपट्टी भरणा केल्यासंदर्भात काही माहिती व इतर विषयावर काही माहिती टपालाद्वारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०२-११-२००८ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेणे इष्ट राहिल, असे आयोगास वाटते. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०२-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पाश्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांक: ०३-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राठोड रतन लक्ष्मण, चंपावती निवास, हनुमान मंदिर रोड, शाहुनगर, मु. पो. ता. जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोपाळपूर, ता. धारुर, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३१
निर्णय दिनांक: ०४-०२-२०१०

१. श्री. निलेश सत्यवान म्हसे पाटील, अहमदनगर : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
अहमदनगर. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.११.२००९ रोजी प्राप्त झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात आदेश होऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५-०९ या चार वर्षातील विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००७-०९ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे पूर्ण केलेल्या,अपूर्ण व चालू असलेल्या कामाच्या संदर्भात कामाचे नाव, अंदाजपत्रकीय रक्कम, कार्यारंभ आदेशाचा दिनांक, कामाचा कालावधी , ठेकेदाराचे नाव, संस्थेचे नाव, काम पूर्ण की अपूर्ण, कामाची कामनिहाय सद्यस्थिती, वरील कालावधीत कामाचे दिलेल्या बीलाच्या कामनिहाय धनादेशांचा क्रमांक व दिनांक, संबंधित अधिकाऱ्यांची कामनिहाय नावे,नेमणूक, नगर शहरातून जाणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व रस्त्याच्या दुरुस्तीसाठी २००५ ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंत केलेल्या दिनांकापर्यंत झालेला वर्षनिहाय खर्च, कामाचे स्वरुप, जन माहिती अधिकारी यांच्या उपविभागांतर्गत उपविभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारे शासकीय कार्यालये, शासकीय वसाहती,इमारती यांच्या नुतनीकरण,डागडुजी, दुरुस्ती व इतर देखभाल याकरिता सन २००६ ते २००९ या कालावधीत झालेल्या खर्चाची कामनिहाय रक्कम व वर्षनिहाय माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना देय असलेली माहिती, उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,अहमदनगर यांच्याकडे उपलब्ध असल्यामुळे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे पाठविण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि यानंतर विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे दि. २४.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०८.२००९ रोजी आपला निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत सशुल्क

माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात स्वतः कधीही उपस्थित झाले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देऊ केली. तथापि माहितीचे मोठे स्वरुप पाहता, अपिलार्थीने ही माहिती दि. १२.११.२००९ रोजी पाहून आवश्यक त्या नोंदी घेतल्या असून, प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचे व या प्रकरणी त्यांची कोणतीही तक्रार नसल्याची कबूली त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्याच दिवशी लेखी स्वरुपात दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी, अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांना दि. १२.११.२००९ रोजी, या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांना उपलब्ध झाल्याबद्दल दिलेल्या या पत्राची प्रत आज रोजी आयोगास अवलोकनास्तव सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जोडलेला नाही. तसेच यासंदर्भात

आयोगास पुरावा दाखविण्यासाठी अथवा तोंडी स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी या घटनाक्रमामधील कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगासमोर सादर केला आहे. त्यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन उरलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: ०४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निलेश सत्यवान म्हसे पाटील, इरीगेशन कॉलनी, फकीरवाडा, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सा.बां.उपविभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३२
निर्णय दिनांक: ०४-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. सौ. शुभांगी प्रमोद पावसे,<br>रा.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहमदनगर.<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहमदनगर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर.
जन अपिलीय अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर.
त्रयस्थ पक्ष : श्री. पोटे व श्री. कुलकर्णी

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.११.२००९ रोजी प्राप्त झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊनही कोणतेही आदेश दिले गेले नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे

सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन १९८५ ते दि. १२.०८.२००९ या कालावधीतील, 'बदल्यांसाठी वेगवेगळे निकष लावण्यात आल्यासंबंधीची माहिती' या विषयावर एकूण तीन मुद्यांद्वारे रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, मुद्दा क्र. १ द्वारे - तालुका आरोग्य अधिकारी,श्री. पोटे हे श्रीगोंदा तालुक्यामध्ये सन १९८७ पासून कार्यरत आहेत. ते प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगाव येथे कार्यरत असताना त्यांची बदली सन २००५ मध्ये कुरकुंभ,ता. दौंड येथे झाली होती. त्यानंतर लगेचच एक वर्षातच त्यांची बदली तेथून परत प्रा.आ.केंद्र, काढळगाव याच प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्यात आली, याची कारणे व श्री. पोटे हे आरोग्य सेवेत एवढे तत्पर होते तर इतर प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांची बदली का करण्यात आली नाही? याचा खुलासा, मुद्दा क्र. २ द्वारे - श्री. एल.डी. कुलकर्णी हे सन १९८५ पासून श्रीगोंदा तालुक्यात कार्यरत आहेत, गेल्या २३ वर्षापासून ते एकाच तालुक्यात कसे, त्यांची बदली न होण्याबाबत कोणते निकष लावले, याची माहिती व मुद्दा क्र. ३ द्वारे - श्रीगोंदा तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वर्ग-३ संवर्गातील कर्मचारी, सन १९८८ सालापासून एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. सन १९८८ पासून शासन निर्णयानुसार विनंती/प्रशासकीय कारणावरुन बदल्या का करण्यात आल्या नाहीत, त्यांना त्याच मुख्यालयामध्ये कोणत्या शासन निर्णयानुसार ठेवण्यात आले, कर्मचाऱ्यांना वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी ठेवण्याचे प्रयोजन काय आहे, याबाबत अपिलार्थीने दि. २१.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कर्मचारीनिहाय जन माहिती अधिकारी यांच्याकडे सविस्तर माहिती सादर केली होती. त्या अर्जावर झालेली कार्यवाही - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे व प्रश्नार्थक मुद्यांना उत्तर देऊन शंकांचे निरसन करणे, अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.१२.२००९ रोजी आपला निर्णय पारित करुन अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर दि. २४.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर केला असून, या युक्तिवादाचा सारांश असा आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.१२.२००९ रोजी पाठविलेली माहिती ही एकमेकांशी विसंगत आहे. विसंगत माहिती पुरविल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी अपिलार्थीने या युक्तिवादामध्ये अखेरीस आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थी यांनी यापूर्वीही आयोगाकडे अशाचप्रकारची त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागितली होती. यावर आयोगाने अपिलार्थीस त्या अशाप्रकारची माहिती घेऊन कोणते व्यापक जनहित साध्य करु इच्छितात, असे विचारले असता, त्यांनी या प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी त्यांना अशाप्रकारची माहिती आवश्यक असल्याचा आयोगासमोर खुलासा केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, त्यांनी अपिलार्थीस दि. २४.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पाठविली आहे.

त्रयस्थ पक्ष श्री. कुलकर्णी यांनी असा युक्तिवाद केला की, ते मूळचे पुण्याचे रहिवाशी असून ते अहमदनगर जिल्हा परिषदेमध्ये सन दि.३०.०७.१९८५ पासून श्रीगोंदा पंचायत समिती येथे विस्तार अधिकारी व आता वैद्यकीय अधिकारी म्हणून मौ.पिंपळगाव पिसा येथे कार्यरत आहेत. ते अहमदनगर जिल्हा परिषदेत सेवेत आल्यापासून ज्या-ज्या वेळी साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होतो, त्या-त्या वेळी त्यांची, ज्या गावात रोगाची साथ पसरली आहे, त्या गावात बदली करण्यात येते. गेल्या २४ वर्षात अंदाजे दहा ते बारा वेळा त्यांच्या अशा बदल्या झालेल्या आहेत.अपिलार्थीसंदर्भात त्यांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, त्या नेहमी श्रीगोंदा पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील कार्यरत असलेल्या त्रयस्थ पक्षाविषयी वारंवार माहिती मागवत असतात. आतापर्यंत अपिलार्थीने त्यांच्याविषयी बऱ्याचवेळा माहिती मागविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना नियमित काम बाजूला ठेवून फक्त अपिलार्थीस माहिती देणे अशाप्रकारचे काम बऱ्याच वेळा करावे लागते. त्यामुळे ग्रामीण जनतेच्या आरोग्य विषयक सेवेवर अप्रत्यक्षपणे विपरीत परिणाम होत आहे. अशाप्रकारे माहिती मागवून अपिलार्थी त्यांच्या कार्यालयास वेठीस धरत असून, ही माहिती मागण्याचा त्यांचा हेतू चांगला नाही. ते स्वतः पुण्याचे स्थानिक असताना त्यांनी कुटुंबाच्या व्यवस्थेची पर्वा न करता अहमदनगर जिल्हयात मन लावून काम केले आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्हयास शासनाचा जिल्हा आरोग्य सेवेस द्वितीय क्रमांक मिळाला आहे.

त्रयस्थ पक्ष, श्री. पोटे यांनी असा युक्तिवाद केला की, ते अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सेवेमध्ये १९८७ पासून कार्यरत असून अद्यापपावेतो त्यांच्या पाच वेळा बदल्या झाल्या आहेत. अपिलार्थीच्या संदर्भात त्यांनी त्रयस्थ पक्ष श्री. कुलकर्णी यांच्या अभिप्रायाशी सहमती दर्शवून अपिलार्थीच्या वारंवार माहिती मागण्याच्या प्रवृत्तीस आयोगाने आळा घालावा, अशी त्यांनी

आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग करुन त्यांचे जगणे असहय केले आहे, असेही त्यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादाच्या अखेरीस अवगत केले.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील प्रशासकीय बाबींच्या संदर्भात खुलासा मागितला आहे. माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी घेतलेल्या प्रशासकीय निर्णयाच्या संदर्भातील माहितीसाठी खुलासे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती विचारणे आणि अर्जदाराच्या विनंतीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आपला खुलासा सादर करणे अशा प्रकारच्या प्रक्रियांचा यामध्ये समावेश नाही. या कारणास्तव अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने,त्रयस्थ पक्ष श्री. एल.डी. कुलकर्णी यांच्यासंदर्भात त्यांची बदली न होण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणते निकष लावले, यासंदर्भात मागणी केलेली माहिती मात्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. यासंदर्भात आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या या शासनस्तरावरुन होत असतात. त्यामुळे हे निकष शासनस्तरावर उपलब्ध होऊ शकतील. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जर अपिलार्थीच्या या मुद्यावरील माहिती शासन स्तरावर उपलब्ध आहे याची जर जन माहिती अधिकारी यांना कल्पना होती, तर त्यांनी अपिलार्थीचा दि. १२.०८.२००९ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत, त्या अर्जाची प्रत शासनस्तरावरील माहिती

अधिकाऱ्यास हस्तांतरित करुन त्याची प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदीनुसार गरजेचे होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही न केल्यामुळे त्यांना या मुद्यावरील माहिती आता शासनस्तरावरुन प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली, श्रीगोंदा तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वर्ग-३ संवर्गातील कर्मचारी वर्गाच्या बदल्या न करता, त्यांना तेथेच कोणत्या शासन निर्णयानुसार ठेवण्यात आले, याचीही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल व त्याचबरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१.०५.२००९ रोजी सादर केलेल्या पत्रावर त्यांच्या कार्यालयाने कोणती कार्यवाही केली, याची माहिती त्यांना अपिलार्थीस याचबरोबर द्यावी लागेल. अपिलार्थीच्या दि. २१.०५.२००९ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत जन माहिती अधिकारी यांनी संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व याविषयावर त्यांच्याकडील अभिलेख्यावरील उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती, ही होय.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांना देय असलेली माहिती याचे वरील परिच्छेदात केलेले विश्लेषण पाहता, अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ आणि ३ च्या संदर्भातील देय असलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय न देता त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कर्मचाऱ्यांचा सेवातपशील अपिलार्थीस दिलेला आहे.या माहितीमध्ये अपिलार्थीच्या दि. २१.०५.२००९ रोजीच्या पत्रावरील कार्यवाहीप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयाने केलेल्या पत्रव्यवहाराच्या व संबंधित टिपणीच्या प्रती, या माहितीचा समावेश नाही, तसेच बदल्या न

होण्यामागचे निकष कोणते, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली नाही, असे आढळून येत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.१२.२००९ रोजी पुरविलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी विसंगत असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब जिल्हा आरोग्य अधिकारी यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ आणि ३ च्या संदर्भातील देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः ०४-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. शुभांगी प्रमोद पावसे,रा.शिंपी गल्ली, मु.पो.ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३३
निर्णय दिनांकः ०४-०२-२०१०

१. श्री. संजय राधाकिसन वल्लाकटी, अहमदनगर : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक, सहकारी संस्था,जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कार्यालय,अहमदनगर.

त्रयस्थ पक्षः अंबिका यंत्रमाग सहकारी संस्था, अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडील प्रथम अपिलावरील सुनावणीच्यावेळी अंबिका यंत्रमाग वस्त्र उत्पादक औद्योगिक सहकारी संस्थेच्या चेअरमन यांनी तीस दिवसात माहिती देण्याचे मान्य करुनही

अद्यापपावेतो त्यांना संबंधित संस्थेकडून कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे त्रयस्थ पक्ष अंबिका यंत्रमाग वस्त्र उत्पादक औद्योगिक सहकारी संस्था या संस्थेविषयी एकूण ९ मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -संस्थेच्या संचालक व सभासदांची सविस्तर यादी, सदर संस्थेच्या नोंदणीकृत फाईलची संपूर्ण नक्कल, सदर संस्था स्थापन झाल्यापासून ते दि. ३१.०३.२००९ अखेर लेखा परिक्षण अहवाल, सदर संस्थेची दि. ३१.०३.२००९ अखेर वार्षिक माहिती, संचालकांनी स्वीकारलेल्या बंधपत्रकाची प्रत, संस्थेच्या निवडणूकीबाबतची माहिती, संस्था स्थापन झालेल्या वर्षापासून ते चालू वर्षापर्यंत वार्षिक सभेचे इतिवृत्त, संस्था स्थापन झालेल्या वर्षापासून ते चालू वर्षापर्यंत संचालक मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त, सदर संस्थेस कर्ज, अनुदान किंवा इतर कुठल्याही प्रकारचे अर्थसहाय्य मिळाले असल्यास त्याची सविस्तर माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा अर्ज त्रयस्थ पक्ष तथा अंबिका यंत्रमाग वस्त्र उत्पादक औद्योगिक सहकारी संस्था या संस्थेच्या सचिवांकडे पाठविला व अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. तथापि यानंतरही संस्थेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०७.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जिल्हा उपनिबंधक यांनी दि. १०.०८.२००९ रोजी निर्णय

देऊन अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे त्रयस्थ पक्षास सूचित केले. परंतु यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना संबंधित संस्थेकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या संस्थेस अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविण्याचे त्यांच्या दि. १५.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये व जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १०.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले होते.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १५.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्रयस्थ पक्षाच्या या विधानावर अपिलार्थीने त्यांना अद्यापपोवतो ही माहिती प्राप्त झाली नसल्याचा आयोगासमोर पुनरुच्चार केला.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागितली आहे, तो त्रयस्थ पक्ष म्हणजे एक सहकारी संस्था असून मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७ मध्ये श्री. बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स,लि.रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या

तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्था या माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येबाहेरील असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे मूळात जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित संस्थेकडे देऊन,अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे संस्थेस सूचित करण्याची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची कृती सर्वथा चुकीची व गैर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे अशाप्रकारच्या संस्थांची नोंदणी करण्याकरिता शासनाने प्राधिकृत केलेले कार्यालय आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या मुद्यांपैकी मुद्दा क्र. ४ व ६ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती अपिलार्थीने अत्यंत मोघम स्वरुपात मागितली आहे. मुद्दा क्र. ४ व ६ द्वारे अपिलार्थीने अनुक्रमे, 'संस्थेची वार्षिक माहिती' व 'संस्थेच्या निवडणूकीबाबतची माहिती', असा मोघम उल्लेख करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती अपेक्षित केली आहे ती माहिती ही, विशिष्ट अशा स्वरुपाची नसल्यामुळे अथवा या मुद्यांवर अपिलार्थीस नेमकी कोणत्या मुद्यावरील माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नसल्यामुळे या मुद्यांचे मोघम स्वरुप सिध्द होत आहे. अशाप्रकारची मोघम स्वरुपातील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. उर्वरित सातही मुद्यांवरील माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ही माहिती उघड करण्यास त्रयस्थ पक्षाचा कोणताही आक्षेप असणे अपेक्षित नाही. ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० च्या तरतुदीअंतर्गत होत असलेल्या

संस्थांच्या नोंदणी प्रक्रियेअंतर्गत त्यांच्या कार्यालयाकडे या संस्थेची नोंदणी झाल्यानंतर जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही अथवा सर्व मुद्यांवरील माहिती, सहकार कायद्यानुसार त्रयस्थ पक्षाने नियमितपणे जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे सादर करणे त्यांना अनिवार्य असेल तर जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती त्यांच्या कार्यालयातून अथवा महाराष्ट्र सहकार अधिनियम.१९६० मधील कलम ७९ नुसार त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी आणि ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच २० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयास सादर करणे संबंधित सहकारी संस्थेस अनिवार्य नाही अशी माहिती, अपिलार्थीस देण्याकरिता संबंधित संस्था जे शुल्क आकारेल त्या शुल्काची आकारणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस करुन त्यानंतर अपिलार्थीस ही माहिती हस्तांतरित करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे वीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर**
**दिनांकः ०४-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय राधाकिसन वल्लाकटी,४०८३, चित्रा टॉकीजमागे, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३४
निर्णय दिनांक: ०४-०२-२०१०

१. श्री. विलास सखाराम साठे, : अपिलार्थी
रा. अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर.
त्रयस्थ पक्ष : रेणूका शिक्षण प्रसारक मंडळ,
एम.आय.डी.सी.नागापूर,अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये शिक्षणाधिकारी

(माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे, रेणूका शिक्षण प्रसारक मंडळ, एम.आय.डी.सी.नागापूर,अहमदनगर या संस्थेला जानेवारी, १९९७ ते दि. ३१ डिसेंबर, २००८ पर्यंत शासनाकडून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत व त्यांच्या अखत्यारीत असलेल्या इतर कार्यालयामार्फत, वेतनेतर अनुदानापोटी वेळोवेळी अदा केलेल्या रकमेबाबतची तारखांसह साक्षांकित स्वरुपात माहिती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी असल्याने त्यांच्याकडून माहिती घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले व या पत्राची प्रत मुख्याध्यापक,रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालय,नागापूर यांना दिली. तथापि यानंतर कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने दि. ३०.०९.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर निर्णय न झाल्याने व आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत आणि जन अपिलीय अधिकारी व संबंधित संस्थेचे सचिव तथा शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा कथित दि. ३०.०९.२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. यावर आयोगाने, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कथित प्रथम अपील अर्जाची प्रत व त्यावरील शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाने दिलेली कथित पोच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना दाखविली असता, त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्याने सदरचा

अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास खात्रीपूर्वक सांगितले व तसेच अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवरील पोचसही त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही कर्मचाऱ्याची नाही, असेही त्यांनी आयोगास अवगत केले.

त्रयस्थ पक्ष सचिव, रेणूका शिक्षण प्रसारक मंडळ (रामराव चव्हाण माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री.गोरक्षनाथ रंगनाथ घाडगे) यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २८.०१.२०१० रोजी पोस्टाने पाठविली आहे. त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचे आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाने अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे मिळतीजुळती असल्याचे आयोगास आढळून आले आहे.

जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्षाच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, सर्व उपस्थितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित संस्थेने आवश्यक ती माहिती, आता त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज सादर केल्यानंतर, पुरविली आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे त्यांचा या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्ज, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार, सादर केलेला नाही. अशाप्रकारे आयोगाकडे द्वितीय अपील करताना अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदींचा भंग केला असल्यामुळे अपिलार्थीचा आयोगाकडे केलेला द्वितीय अपील अर्जच अवैध होत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक: ०४-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलास सखाराम साठे,रा.म्हसोबा गेट, विद्या कॉलनी, नगर-कल्याण रोड, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३५
निर्णय दिनांकः ०४-०२-२०१०

१. श्री. किरण नाथा वैरागर, : अपिलार्थी
रा.घोडेगाव, ता.नेवासा,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,
सार्व. बांधकाम उपविभाग,
पंचायत समिती नेवासा,जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
पंचायत समिती नेवासा,जि.अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता,
जि.प.(सा. बां.) उपविभाग,
नेवासा,जि. अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उपअभियंता,
जि.प. (सा. बां.) उपविभाग,
नेवासा,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००९ रोजी प्राप्त झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेच्या संदर्भात सन २००४-०५ ते २००५-०६ या कालावधीतील काही माहिती एकूण दहा मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ९००/- इतके त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा दि. १२.०८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. तथापि शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार उपअभियंता,जि.प. सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नेवासा यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि संबंधित उपअभियंता यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे व अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आता दि. २७.०१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असून ही माहिती अपूर्ण आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपूर्ण

माहिती पाठविल्याचे आयोगासमोर कबूल केले व उर्वरित माहिती आठ दिवसांच्या आत अपिलार्थीस पुरविण्याचे सर्व संबंधितांना आश्वासित केले. यासंदर्भात त्यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहितीशी संबंधित हजेरीपत्रके त्यांच्या कार्यालयात इतके दिवस त्यांना सापडत नव्हते, परंतु आता ती सापडली असून त्या प्रती ते अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली होती. 'व्यक्तिशः' माहिती मागितल्यानंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २४.०८.२००९ रोजी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले, त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३१.०८.२००९ पर्यंत माहिती देण्याचे लेखी आश्वासन दिले. यानंतर अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात परत दि. ०१.०९.२००९ रोजी हजर राहिल्यानंतर अपिलार्थीस दि. ०५.०९.२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी आश्वासन दिले. यानंतर अपिलार्थीने मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता यांच्याकडे दि. ०५.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु संबंधित उपअभियंत्याने या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांनी अपील दाखल केल्यानंतर कोणताही निर्णय दिला नाही. या टप्प्यावर उपअभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग,नेवासा यांची ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शविते. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित उपअभियंता यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचे येथे सूचविण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जर त्यांनी सुनावणी घेतली असती तर, अपिलार्थीस आयोगाकडे द्वितीय अपील करण्याची कदाचित गरज पडली नसती. यानंतर जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस दि. २७.०१.२०१० रोजी काही माहिती पुरविली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण आहे, हे जन माहिती अधिकारी यांनी देखील त्यांच्या युक्तिवादामध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२, ४ व ९ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिलेली प्रश्नार्थक माहिती, मुद्दा क्र. ८ व १० मधील, अनुक्रमे 'एक मिस्त्री,एका तालुक्यामध्ये किती वर्षे सेवा करु शकतो, मिस्त्रीची बदली होत नाही काय?' व 'रोहयोमध्ये पूर्ण झालेल्या कामावर कार्यकारी अभियंता यांच्या भेटी झाल्या आहे काय? या अंशतः भागाशी संबंधित माहिती, ती जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण व खुलासे अपेक्षित करणारी व माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, व पर्यायाने अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याचे सिध्द होत असल्याने ती माहिती,अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांवरील माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो न दिलेली व वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ३१.०७.२००९ व दि. २४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती देण्याचे लेखी स्वरुपात आश्वासित करुनही आणि विशेषतः अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही अपिलार्थीस अद्यापपावेतो संपूर्ण माहिती न देऊन आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्याकरिता वेळोवेळी पाठपुरावा करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, याचाच अर्थ अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन

माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी टाळाटाळ केली आहे, असा होतो. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. निबे एल.एन) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या कार्यालयात माहितीपोटी भरलेले शुल्क रु.९००/- इतके त्यांना आता परत करावे लागेल. सदर शुल्क त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत परत करावे, असे त्यांना पुढे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अद्यापावेतो द्यावयाची राहीलेली देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.९००/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत परत करावे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. निबे एल.एन.) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार

यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक: ०४-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण नाथा वैरागर,रा.मु.पो.घोडेगाव, ता.नेवासा,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद (सा. बां.) उपविभाग,नेवासा, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद (सा. बां.) उपविभाग, नेवासा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३६
निर्णय दिनांक: ०४-०२-२०१०

१. श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, : अपिलार्थी
रा.कोळपेवाडी, ता.कोपरगाव,
जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत कोळपेवाडी,
ता.कोपरगाव,जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कोपरगाव,जि. अहमदनगर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (कृषि),
पंचायत समिती कोपरगाव,जि.अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : सौ. शारदा बाळासाहेब कोळपे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीचा निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही व त्यांना उशिराने व अपूर्ण माहिती प्राप्त झाली. प्राप्त माहिती सत्य नाही असे त्यांना वाटले असल्यावरुन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "दि.०२.०८.२००८ ई फेरफार नं. १४७७ गट नं. २७७ पैकी क्षेत्र ०.०२ आर. ग्रामपंचायत कोळपेवाडी बक्षीसपत्रासह" यासंदर्भात जुलै व ऑगस्ट,२००८ या कालावधीतील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सौ. शारदा बाळासाहेब कोळपे यांनी ग्राम पंचायतीस बक्षिसपत्राद्वारे दिलेल्या भूखंडाबद्दल क्षेत्रनिहाय मोबदला म्हणून त्यांना ग्रामपंचायतीने किती रक्कम दिली आहे, बक्षीसपत्र करुन देण्याच्या कालावधीमध्ये सौ. शारदा कोळपे या सरपंच या पदावर कार्यरत होत्या किंवा नाही, बक्षीसपत्र करुन देताना वा घेताना मोबदला किंवा बाजारभावाप्रमाणे रक्कम देणे बंधनकारक आहे किंवा कसे व सदर बक्षीसपत्र करुन घेण्यापूर्वी ग्रामपंचायत, कोळपेवाडी यांनी या जागेबाबत केलेला ठराव, मोबदला घेण्याबाबतचा ठराव, रक्कम रोख अथवा चेकद्वारे अदा केली याबाबतची माहिती, इतिवृत्ताच्या फोटोप्रती, कोणत्या बँकेत रक्कम अदा केली व या व्यवहारास वरिष्ठांच्या अथवा शासनाच्या परवानगी बाबतची माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३६/- व पोस्टेज खर्च रु.२५/- इतका खर्च त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या शुल्काचा अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे आवश्यक असलेला संपूर्ण तपशील दिलेला आहे. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे भरणा न करता दि. ०३.०९.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केल्यानंतर दि.

२४.०९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु.३६/- इतक्या रकमेचा भरणा करुन, ही माहिती त्यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत केली. यानंतर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भात अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हा निर्णय अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशामध्ये नमूद केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस सदर आदेश पारित होण्यापूर्वीच दि. २४.०९.२००९ रोजी पुरविली होती. अपिलार्थीस त्यांनी, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर, त्यांना संपूर्ण माहिती सशुल्क उपलब्ध करुन दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०९.२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः हस्तांतरित केलेली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.०८.२००९ रोजी तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थीने टपालाद्वारे माहिती मागवूनही दि. २४.०९.२००९ रोजी फक्त माहितीपोटीच्या पृष्ठांचे शुल्क भरल्यामुळे त्यांनी ती माहिती टपालाद्वारे न पाठविता व्यक्तिशः हस्तांतरित केली. जन माहती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे

आयोगास आढळून येत आहे. परंतु ही माहिती अपूर्ण व असत्य असल्याचे अपिलार्थीस का वाटत आहे, याचा खुलासा अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही किंवा याचा तोंडी खुलासा करण्यासाठी ते आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात, संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. रंगनाथ गेणू जोशी,ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, कोळपेवाडी,ता.कोपरगाव,जि.अहमदनगर यांनी सदर प्रकरण, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींनुसार योग्य तऱ्हेने हाताळून, दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेची नोंद आयोग या निर्णयामध्ये विशेष करुन घेत आहे. त्यांच्या या प्रशंसनीय कामाबद्दलची नोंद संबंधित गट विकास अधिकारी यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: ०४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे,रा.मु.पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत कोळपेवाडी, ता. कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती, कोपरगाव,जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी,पंचायत समिती, कोपरगाव,जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३७
निर्णय दिनांक: ०४-०२-२०१०

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतिफ, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा शासकीय रुग्णालय,अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा शासकीय रुग्णालय,अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर
त्रयस्थ पक्ष : श्री. संजय ठोंबरे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०५.२००९ रोजी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष,जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. संजय ठोंबरे यांची सेवाविषयक व वैयक्तिक

माहिती, जिल्हा सामान्य रुग्णालय,अहमदनगर व सावेडी हॉस्पीटलच्या कामकाजाविषयी व न्यायालयीन प्रकरणाविषयी काही माहिती अशी एकूण १२ मुद्यांद्वारे (अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद मुद्यांना क्रमांक न देता केवळ (*) चिन्हांकित केलेले असल्याचे दिसून येत आहे.)काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले.यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्रथमतः दि. ०९.०४.२००९ रोजी व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०४.२००९ रोजी निर्णय दिल्यानंतर काही माहिती दि. ०८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिली. तथापि प्राप्त माहितीतील काही माहिती दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी एकूण दोन मुद्यांच्या संदर्भात दि. ०८.०५.२००९ रोजी दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व याचबरोबर आपले लेखी निवेदन आयोगास सादर केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा दि.२७.०२.२००९ रोजीचा अर्ज मूळात त्यांच्या कार्यालयास दि. ०५.०३.२००९ रोजी प्राप्त झाला असून यासंदर्भात त्यांनी दि. ०९.०४.२००९ रोजी प्रथमतः माहिती दिली होती तथापि त्यापूर्वीच

अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०४.२००९ रोजी अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत पुनश्च् माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशानुसार त्यांनी अपिलार्थीस दि. ०८.०५.२००९ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दोन मुद्यांवर दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. या दोन मुद्यांपैकी - अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जानेवारी,०९ ते फेब्रुवारी, ०९ या कालावधीच्या दरम्यान जिल्हा शल्य चिकित्सक,अहमदनगर यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर एखाद्या प्रकरणात हजर राहण्यासाठी नोटीस आली आहे काय? आली असल्यास त्या नोटीसची प्रत द्यावी, या एका मुद्यावर माहिती अपेक्षित होती. या मुद्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्यातील पहिला प्रश्नार्थक भाग,'------- प्रकरणात न्यायालयात हजर राहण्यासाठी नोटीस आली आहे काय?' याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय असणार नाही. कारण अशाप्रकारची माहिती ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. परंतु या मुद्यातील दुसरा भाग, -'मा.उच्च न्यायालयाच्या नोटीसची प्रत'- ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती आयोगाने मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी मा. न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या समन्सची प्रत आयोगास दाखविली. तथापि या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी न्यायालयाची वेगळी कागदपत्रे पुरविल्याचे आयोगास प्रत्यक्ष तपासणीत आढळून आले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आज रोजी आयोगास दाखविलेल्या समन्सची प्रत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस ज्या दुसऱ्या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आहे, असे त्यांचे म्हणणे आहे, तो मुद्दा, "आपल्या कार्यालयात दि. ०१.०१.२००९ ते २६.०२.२००९ दरम्यान नाशिक आरोग्य उपसंचालकाचे माझ्याबाबत पत्र आले आहे काय? आल्यास कोणत्या दिवशी व त्या पत्रावर काय कार्यवाही केली, याबाबत सविस्तर माहिती"-असा आहे. यासंदर्भात देखील आयोगाचे अभिप्राय वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे लागू होत आहेत. या मुद्यामधील 'उपसंचालकांचे पत्र कार्यालयास प्राप्त झाले होते काय', या भागाची माहिती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र उपसंचालकांचे अपिलार्थीविषयी कोणत्या दिवशी पत्र प्राप्त झाले व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपिलार्थीस देय होत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, हे पत्र म्हणजे अपिलार्थीने केलेल्या तक्रारीवर उपसंचालकांनी नेमणूक केलेल्या चौकशी अधिकाऱ्याच्या नेमणूकीचे पत्र आहे, असे त्यांनी आयोगास सांगितले. या पत्रावर त्यांच्या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही, त्यामुळे उपसंचालकांच्या अपिलार्थीविषयी प्राप्त झालेल्या या मुद्याशी संबंधित पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, अशाप्रकारची माहिती त्यांनी अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि अशाप्रकारची माहिती त्यांनी या मुद्यांवर अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी एका मुद्यावर चुकीची व दुसऱ्या मुद्यावर कोणतीही माहिती न दिल्याने, ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेले दोन मुद्दे व या दोन मुद्यांवरील अपिलार्थीस देय असलेली माहिती याचे वरील परिच्छेदात केलेले विश्लेषण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या पहिल्या मुद्याच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाकडून त्यांना जानेवारी,०९ ते फेब्रुवारी, ०९ या कालावधीमधील प्राप्त झालेल्या समन्सची प्रत व आरोग्य उपसंचालक,नाशिक यांच्याकडून दि. ०१.०१.२००९ ते २६.०२.२००९ या दरम्यान प्राप्त झालेल्या पत्राच्या प्राप्तीचा दिनांक व या पत्रावर त्यांनी काय कार्यवाही केली, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील दोन मुद्यावर हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य माहिती पुरवावी.

३. जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः ०४-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतिफ,घ.नं.१०/८, गजानन हौसींग सोसायटी, जुना मुकूंदनगर, औरंगाबाद रोड, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३८
निर्णय दिनांक: ०४-०२-२०१०

१. श्री. बाळासाहेब देवराव यादव, : अपिलार्थी
रा. बहिरोबावाडी,ता.कर्जत,
जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अभियंता शाखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,कर्जत, जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,कर्जत, जि.अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कर्जत उपविभाग, ता.कर्जत, जि.अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, त्यांच्या अर्जावर कार्यवाही केली नाही व वीज चोरीस सहकार्य केले, सात वर्षापासून वीज चोरी होत असूनही त्यासंदर्भात कार्यालयाने दंड वसूल केला नाही. त्यामुळे त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'उपसा सिंचनाची परवानगी रद्द केल्याने वीज पुरवठा बंद केल्याबाबत' या विषयावर एकूण दोन मुद्यावर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"उपसा सिंचन विहीरीवरील शेतीपंपाचे कनेक्शन बंद करणेबाबत दि. A१-१८५ व A१-३२६ उपविभागीय दंडाधिकारी यांचे पत्र क्र.४/८५३ दि.२४/९/२००२ दि.५/८/२००९ रोजीचा अर्ज बाबत आपल्या कार्यालयाने उपसा जलसिंचन विज पुरवठा बंद केला असून सदर आकडे टाकून विज चालु करुन घेतल्या बाबत आपल्या कार्यालयाने काय कारवाई केली त्याबाबत माहिती मिळावी

२) सदर ७ वर्ष विज आकडे टाकुन वापली त्याबाबत कोणती कारवाई करणार व ती कोणाची जबाबदारी आहे याची मला माहिती मिळावी."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाच्या तसा घेतला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कर्जत यांच्याकडे दि. २३.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर संबंधित कार्यकारी अभियंता यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व तत्कालीन आणि सध्याचे जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांना आयोगासमोर कोणताही युक्तिवाद करता आला नाही अथवा या प्रकरणाच्या संदर्भात कोणतीही कागदपत्रे आयोगासमोर सादर करता आली नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या दोन मुद्यावरील माहितीपैकी अपिलार्थीस मुद्दा क्र. २ विषयी कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांचयाकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही भविष्यकाळातील आहे, त्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मध्ये उपविभागीय दंडाधिकारी यांचे पत्र दि. २४.०९.२००२ व दि. ०५.०८.२००९ रोजीच्या अपिलार्थीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने काय कार्यवाही केली, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस ही माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागली असती, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. केवळ अपिलार्थीस माहिती न देण्याचा त्यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव, हेच एकमेव कारण अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न होण्यासाठी असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्वत:ला या प्रकरणी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांना

यासंदर्भात त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुरेपूर संधी देण्यात आली असतानाही त्यांना अपिलार्थीस माहिती न देण्याचे कोणतेही समर्थनीय कारण आयोगासमोर स्पष्ट करता आले नाही. सबब संबंधित जन माहिती अधिकारी श्री. डी.एम.कमतगी (सध्या कर्जत उपविभाग येथे कार्यरत) यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी माहे एप्रिल, २०१० पासून जास्तीत जास्त दहा हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात खालील लेखाशीर्षाखाली करण्यात यावा.

लेखाशीर्ष :- **"००७० इतर प्रशासनिक सेवा,६० इतर सेवा,८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कर्जत,जि.अहमदनगर यांनी उपरोक्त शास्तीचा भरणा संबंधित जन माहिती अधिकारी हे माहे एप्रिल, २०१० पासून जास्तीत जास्त दहा हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात नियमितपणे करतील असे पहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी श्री. नामदेव सखाराम निघुते यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात या प्रकरणी असे आढळून येत आहे की, या प्रकरणाशी संबंधित कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,मर्यादित कर्जत यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन आपल्या बेजबाबदार कार्यशैलीचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य

विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी श्री. दयानंद मल्लीकार्जुन कमतगी यांना एकूण रु.२५,०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कर्जत,जि.अहमदनगर यांनी उपरोक्त शास्तीचा भरणा संबंधित जन माहिती अधिकारी हे माहे एप्रिल, २०१० पासून जास्तीत जास्त दहा हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात नियमितपणे करतील असे पहावे.

**अहमदनगर**
**दिनांकः 	०४-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब देवराव यादव, मु.बहिरोबावाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,कर्जत उपविभाग, ता.कर्जत,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,कर्जत, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपकोषागार अधिकारी, कर्जत, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पुर्व), मुंबई - ५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१९७
निर्णय दिनांक: ०४-०२-२०१०

१. श्री. अे. के.आनंद : अपिलार्थी
रा.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
न्यू लॉ कॉलेज, अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी,
न्यू लॉ कॉलेज, अहमदनगर
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : प्राचार्य, न्यू लॉ कॉलेज, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ विषयी अनादर दाखवल्याने आणि संबंधित संस्थेच्या उदासीन प्रतिसादामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०७.२००८रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीसंदर्भात आणि त्रयस्थ पक्ष,श्री.उदयकुमार रेणावीकर यांच्यासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जर टी.सी.(Transfer Certificate) ची मूळ प्रत हरवली असेल तर द्वितीय प्रत कशी प्राप्त करावी, याकरिता कोणती पध्दत वापरावी, या करिता लागणारा अंदाजित खर्च व वेळ, त्रयस्थ पक्ष श्री. उदयकुमार दत्तात्रय रेणावीकर हे न्यू लॉ कॉलेज,अहमदनगर येथे १९८८-९३ या कालावधीमध्ये शिकत होते का, कॉलेजच्या रजिस्टरप्रमाणे त्यांची जन्मतारीख आणि त्यांची बी.एस.एल.-१९९१, डी.एल.एल.आणि एल.डब्ल्यू १९९२ आणि एल.एल.बी.१९९३ या पुणे विद्यापिठाने घेतलेल्या परीक्षेमध्ये शैक्षणिक कामगिरी कशी होती? - या मुद्यांचा समावेश होता. या मुद्यांवर अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याचे नमूद करुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार न्यू लॉ कॉलेज,अहमदनगरच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर निर्णय न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी व प्रभारी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांना असे आढळून आले आहे की, या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कशाप्रकारे माहिती हवी आहे याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती व्यक्तिशः हवी की पोस्टाद्वारे याचा उल्लेख त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये केला नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती कशाप्रकारे हवी आहे, याचा खुलासा विचारला. याचबरोबर अपिलार्थीने श्री. रेणावीकर या त्रयस्थ पक्षाच्यासंदर्भात मोघम स्वरुपात माहिती मागितली

असल्याचे त्यांना आढळून आल्याने त्यांनी अपिलार्थीकडे परत त्यांना निश्चितपणे श्री. रेणावीकर यांची शैक्षणिक कामगिरी म्हणजे कशाप्रकारची माहिती अपेक्षित आहे याचा खुलासा करण्याची विनंती केली. तथापि या पत्रास अपिलार्थीने प्रतिसाद दिलेला नाही. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रातील कथित दि. १४.०८.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कॉलेजमध्ये प्राप्त न झाल्याने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. अपिलार्थीस त्यांनी कधीही माहिती नाकारलेली नाही, याउलट अपिलार्थीने मोघम स्वरुपाची माहिती विचारली असता त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली निश्चित माहिती पुरविण्याच्या दृष्टीने व अपिलार्थीस कोणत्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे, हे अपिलार्थीस विचारले असता, त्यांच्या या पत्रास अपिलार्थीकडून कोणताही प्रतिसाद न दिला गेल्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व जन माहिती तथा प्रभारी जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती ही, अपूर्ण स्वरुपात मागितली आहे. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीस ही माहिती कोणत्या माध्यमाद्वारे अपेक्षित आहे, याचा खुलासा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला नाही. तसेच त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोघम आहे. अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये त्यांच्या दि. १४.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत सादर केली आहे, तो प्रथम अपील अर्ज प्रत्यक्षात संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केल्याचा कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही. हे पाहता, अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागताना अर्जदाराने जी निश्चित स्वरुपाची विहित पध्दत

पाळावयाची असते, त्या पध्दतीचे पालन योग्य प्रकारे केले नाही आणि अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीने माहिती अधिकार अधिनियमातील प्रत्येक टप्प्यावरील विहित तरतुदीचा भंग झाला असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ०४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ए.के.आनंद, वर्षा स्टोअर्सच्या बाजूला, कार्पोरेशन रोड, अहमदनगर-४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, न्यू लॉ कॉलेज, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य न्यू लॉ कॉलेज, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१९८
निर्णय दिनांक: ०४-०२-२०१०

१. श्री. केदार अशोक पारखे, : अपिलार्थी
रा.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१०.२००८ रोजी मुंबई कार्यालयास प्राप्त झालेले व औरंगाबाद खंडपीठाकडे दि.११.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे व या माहितीची त्यांना आज आवश्यकता

नसल्यामुळे ते विचाराधीन अपील मागे घेत आहेत, असे आयोगास अवगत केले व तसे लेखी पत्र त्यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी सादर केले.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२१९८/०८, दि.११.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः ०४-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केदार अशोक पारखे, ब्लॉक नं.११ पेटी स्टाफ लाईन, किल्ल्याजवळ, कॅम्प, अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७२
निर्णय दिनांकः ०४-०२-२०१०

१. सौ. सुनिता बाळासाहेब सानप, : अपिलार्थी
रा. लोणी बु., ता.राहाता, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, राहाता, जि.अहमदनगर.

जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०९.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत माहती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०५.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांनी लोकशाही दिनामध्ये टोकन क्र.१३८ दि. ०४.०४.२००५ व टोकन क्र. ५६/०५ दि. ०७.११.२००५ द्वारे केलेल्या अर्जावर जन माहती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण वृत्तांत याची नक्कल व प्रलंबित असल्याबद्दलचा खुलासा, अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. या अर्जासोबत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केली आहेत.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०७.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०७.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय दिला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपेक्षित असलेला कोणताही निर्णय न देता त्यांनी सर्व संबंधितांच्या बरोबर घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त या पत्रासोबत सादर केले आहे. तथापि या प्रतिसादाने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी या अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने लोकशाही दिनामध्ये केलेल्या तक्रारीचे त्यांच्या स्तरावर आता निराकरण झाले असून यासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दि. ३१.०५.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, आज रोजी सोबत आणलेली आहे व ही माहिती ते अपिलार्थीस तात्काळ देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे व ते ही माहिती अपिलार्थीस तात्काळ देण्यास तयार आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती म्हणजेच अपिलार्थीचे संदर्भित तक्रार अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून, ते दि. ३१.०५.२००६ पर्यंत त्यांनी या तक्रार अर्जासंदर्भात सर्व संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि यासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यावर तयार करण्यात आलेल्या टिपण्यांच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३१.०५.२००६ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, वरील निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय

असलेली, संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत, विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ०४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुनिता बाळासाहेब सानप,रा. लोणी बु. ता.राहाता, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, राहाता, जि.अहमदनगर जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७४४
निर्णय दिनांक: ०८-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०७.११.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ११.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी

घेऊन आपले आदेश दि. ०७.०१.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘सार्वजनिक प्राधिकरण’ या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. ०७.०१.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित

करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.७४४/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. ०७.०१.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७४५
निर्णय दिनांक: ०८-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१०.११.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ११.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी

घेऊन आपले आदेश दि. ०७.०१.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. ०७.०१.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित

करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.७४५/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. ०७.०१.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१३
निर्णय दिनांक: ०८-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. संजय प्रकाश निंबाळकर,<br>रा.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. कार्यकारी संचालक,<br>तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,<br>ढोकी, ता.जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक सहसंचालक (साखर),<br>नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०३.०९.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितानी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी

घेऊन आपले आदेश दि. १७.११.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. तथापि यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘सार्वजनिक प्राधिकरण’ या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन,

माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२१३/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१४
निर्णय दिनांक: ०८-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०१.०९.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी

घेऊन आपले आदेश दि. १७.११.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. तथापि यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे करण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन,

माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२१४/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१५
निर्णय दिनांक: ०८-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०८.०९.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी

घेऊन आपले आदेश दि. १७.११.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन,

माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२१५/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१६
निर्णय दिनांक: ०८-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. संजय प्रकाश निंबाळकर,<br>रा.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. कार्यकारी संचालक,<br>तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,<br>ढोकी, ता.जि. उस्मानाबाद<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक सहसंचालक (साखर),<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२५.०७.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०८.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १३.१०.२००८

रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. तथापि अर्धवट माहिती दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील

फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२१६/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१७
निर्णय दिनांक: ०८-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१५.०९.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितानी दि.१०.१०.२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर

प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १७.११.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘सार्वजनिक प्राधिकरण’ या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन,

माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२१७/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१८
निर्णय दिनांक: ०८-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२३.०९.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितानी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी

घेऊन आपले आदेश दि. १७.११.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी यांना आदेशित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन,

माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२१८/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. १७.११.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ६११/२००९ व ६१२/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६११ व ६१२

निर्णय दिनांक ०८-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. उस्मानशहा इब्राहिमशहा अन्वीकर,<br>ग.न. २०, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | पशुधन पर्यवेक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद |

**निर्णय**

**अपिल क्रमांक ६११/२००९**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकाऱ्याने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणीसाठी बोलावले असता, प्रत्यक्षात त्यांनी

सुनावणी घेण्यासाठी नाकारले आहे त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी तथा पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे शहरातील कत्तलखान्याविषयक काही माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व पर्यायाने अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य पशुसंवर्धन अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच

३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

अपिलार्थीचे या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**निर्णय**

**<u>अपील क्रमांक ६१२/२००९</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकाऱ्याने यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणीसाठी बोलावले असता, प्रत्यक्षात त्यांनी सुनावणी घेण्यासाठी नाकारले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०१-२००९ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे शहरातील कत्तलखानेविषयक काही माहिती व्यक्तिशः मागविली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य पशुसंवर्धन अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

अपिलार्थीचे या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उस्मानशहा इब्राहिमशहा अन्वीकर, ग.न. २०, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा पशुधन पर्यवेक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६१३

निर्णय दिनांक ०८-०२-२०१०

१ श्री. किसन निवृत्ती भोसले, : अपिलार्थी

मु. पो. मोरंडी मोहल्ला, जुना जालना, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जालना

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याने संबंधित माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही आयोगाने आदेशित करावी व ज्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या होऊन त्यांना कार्यमुक्त करण्यात आलेले नाही त्यांची यादी व कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती अद्यापपावेतो मिळाली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जालना जिल्ह्यातील काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या त्यांची यादी, कर्मचाऱ्यांचे पदनाम, बदली कोठून कोठे झाली, अद्यापपावेतो कार्यमुक्त न केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी आणि प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांची कोठून कोठे प्रतिनियुक्ती झाली याची दिनांकासह माहिती, अशा प्रकाराची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २०/- इतके चलनाद्वारे बँकेत भरण्याचे सूचित केले. याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २३-०९-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ३०-०९-००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००९ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस सुनावणीच्या दिवशीच विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००८ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने व प्राप्त माहिती चुकीची असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही आदेशित करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ३१-०९-२००८ रोजी सशुल्क माहिती पुरविली असून, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००८ रोजी पुरविण्यात आली आहे. अपिलार्थी-पासून त्यांनी कोणतीही माहिती हेतुतः दडवून ठेवलेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः पुरविलेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो कोणा कोणाला कार्यमुक्त केले नाही, या मुद्यावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर दिलेली आहे. याचा अर्थ त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क स्वीकारुन अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २०/- इतके त्यांना परत करावे लागेल.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून ती हस्तगत करुन घेणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. या मुद्यावर अपिलार्थीस त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी उपस्थित राहिले

व या संदर्भात त्यांच्याकडे काही सबळ पुरावा आहे काय, अशी आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थीने आयोगाच्या प्रश्नास नकारार्थी उत्तर दिले. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी कधीही संपर्क साधला नसल्याचे सिध्द होत आहे व तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे विचारलेल्या माहितीचे (कुणा कुणाला अद्याप कार्यमुक्त केले नाही?) स्वरुप पाहता, ही माहिती त्यांना अपिलार्थीपासून हेतूपुरस्सर किंवा कोणत्याही असद्‌हतूने दडविण्याचे कारण संभवत नाही. त्याच बरोबर प्राप्त माहिती चुकीची असल्याचे अपिलार्थी हे आयोगासमोर सिध्द करु शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे. अपिलार्थीने आज सुनावणीच्या वेळी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केले आहे. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती ही त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किसन निवृत्ती भोसले, मु. पो. मोरंडी मोहल्ला, जुना जालना, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६१४

निर्णय दिनांक ०८-०२-२०१०

१ श्री. किसन निवृत्ती भोसले, : अपिलार्थी

मु. पो. मोरंडी मोहल्ला, जुना जालना, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग,

जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने व तसेच त्यांना उशिरा माहिती दिल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने दंडात्मक कार्यवाही करावी. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०९-२००८ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक ०४-०९-२००८ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे जालना 'जिल्ह्यातील सन २००८ मध्ये बदल्या करण्यात आलेल्या शिक्षकांची माहिती' या विषयावर काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - बदली झालेल्या शिक्षकांची यादी / बदली कोठून कोठे झाली, बदली झाली परंतु कार्यमुक्त करण्यात आलेले नाही अशा शिक्षकांची यादी व प्रतिनियुक्तीवर असलेल्या शिक्षकांची कोठून कोठे बदली झाली त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या दिनांकासह माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहितीकरिता आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने रु. २८/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात दिनांक ०१-१०-२००८ रोजी चलनाद्वारे केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-१०-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित

माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली. त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून द्यावयाची राहिलेली मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य द्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही गट शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे, त्यांनी दिनांक २३-०९-२००८ रोजी त्यांच्या अधिपत्त्याखालील आठ गट शिक्षणाधिकाऱ्यांना अपिलार्थीस ही माहिती परस्पर देण्याचे सूचित केले होते. तथापि गट शिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीस वेळेत माहिती पुरविली नाही. त्यामुळे अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक ०२-०९-२००८ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक ०४-०९-२००८ रोजी प्राप्त झाला, त्यामध्ये अपिलार्थीने एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. त्या अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्त्याखालील गट शिक्षणाधिकाऱ्यांना दिनांक ०९-०९-२००८

रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे पाठविणे अभिप्रेत होते. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरच ही कार्यवाही करण्यासाठी एकूण १४ दिवसाचा विलंब जन माहिती अधिकारी यांना लागला. जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही त्यांच्या नियंत्रणाखालील गट शिक्षणाधिकाऱ्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती दिली नाही. परिणामी अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरीता वंचित राहिले आहेत. अपिलार्थीस पूर्ण माहिती प्राप्त न होण्यासाठी या प्रकरणी अशाप्रकारे जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व गट शिक्षणाधिकारी, ज्यांनी अपिलार्थीस ही माहिती, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे आल्यापासून ३० दिवसाच्या आत पुरविणे त्यांना क्रमप्राप्त होते, असे सर्व गट शिक्षणाधिकारी जबाबदार असल्याचे आयोगास आढळून आले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकाऱ्यास अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सर्व सहायक यांना देखिल माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त होण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व गट शिक्षणाधिकारी हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून आले आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सर्व संबंधित गट शिक्षणाधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांच्या कार्यक्षेत्रातील या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ती चुकीची व दिशाभूल करणारी नसल्यामुळे, अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली हा आक्षेप, आयोग फेटाळून लावत आहे. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविल्याचा हा त्यांचा आक्षेप या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीस आता उर्वरित माहिती पुरविण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किसन निवृत्ती भोसले, मु. पो. मोरंडी मोहल्ला, जुना जालना, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६१५

निर्णय दिनांक ०८-०२-२०१०

१ श्री. नरेंद्रकुमार अमृतलाल दक्षिणी, : अपिलार्थी
रा. रुखमीनीनगर, नं. (६), गोकूळ अपार्टमेंट, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक निबंधक,
सहकारी संस्था, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक निबंधक,
सहकारी संस्था, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासक, प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : प्रशासक, प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सेलू

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सेलू यांच्या संदर्भात एकूण २१ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे संबंधित संस्थेस पाठविली व संस्थेस अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले. या नंतर संस्थेने जन माहिती अधिकारी यांना दिनांक १७-०२-२००९ रोजी काही माहिती सादर केली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती यानंतर हस्तांतरीत केली. (दिनांकाचा पत्रव्यवहारात उल्लेख नाही) तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील उपविधीची प्रत, मुद्दा क्रमांक ३, ४, ८, १०, १२, १८ व २१ या मुद्दयांचा समावेश नव्हता. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००९ रोजी निर्णय देऊन प्रशासक, प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सेलू या संस्थेस अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आणि प्रशासक यांनी तसे सुनावणीचे वेळी मान्यही केले असल्याचे आढळून येत आहे. परंतु पुढे प्रशासकाने मान्य करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांना आयोगासमोर कोणताही युक्तिवाद करता आला नाही. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे अपूर्ण आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस अद्यापही वरील परिच्छेदात नमूद केलेल्या मुद्दावरील माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त झाली नसल्याचे आढळून येत आहे. यासंदर्भात सहायक निबंधक, सहकारी संस्था, सेलू यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ चा वापर करुन अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली संपूर्ण माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याची व्यवस्था करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील अद्याप द्यावयाची राहिलेली उर्वरित संपूर्ण माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याची व्यवस्था करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नरेंद्रकुमार अमृतलाल दक्षिणी, रा. रुखमीनीनगर, नं. (६), गोकूळ अपार्टमेंट, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६१६

निर्णय दिनांक ०८-०२-२०१०

१ श्री. सुभाष दामोदर देशमुख, : अपिलार्थी
प्लॉट नं. ६२, शिवदत्त सहकारी गृहनिर्माण संस्था,
सिडको, एन ८, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निबंधक,
सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : राजमाता जिजाऊ सहकारी गृहनिर्माण संस्था
गारखेडा, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने राजमाता जिजाऊ सहकारी गृहनिर्माण संस्था गारखेडा, औरंगाबाद या संस्थेतील करोडो रुपयाच्या भूखंडाच्या घोटाळयासंदर्भातील चौकशी अहवालाच्या प्रतीची मागणी केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये तालुका निबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद, औरंगाबाद यांच्याकडे राजमाता जिजाऊ सहकारी गृहनिर्माण संस्था गारखेडा, औरंगाबाद यांच्यासंदर्भात काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती.

तालुका निबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत त्यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे संबंधित संस्थेकडे पाठवून अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे संस्थेस सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि संस्थेने अपिलार्थीस माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०३-२००७ रोजी आदेश पारीत केले. प्रथम सुनावणीच्या दिवशी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थितीत देण्यात आल्याने जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी अपिलार्थीचे अपील या निर्णयाव्दारे निकाली काढले. परंतु यानंतरही अपिलार्थीने दिनांक २२-०८-२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तालुका उप निबंधक सहकारी संस्था तालुका औरंगाबाद यांनी वरील वस्तुस्थितीशी सुसंगत युक्तिवाद केला. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांच्या प्रथम

अपील सुनावणी वेळी दिनांक ०९-०३-२००७ रोजी हस्तांतरीत केली असून अपिलार्थीने त्यावेळी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावर समाधान व्यक्त केले आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीचे असे अभिप्राय देणारे पत्र आयोगास सादर केले. यावरुन अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना समाधानकारकरित्या दिनांक ०९-०३-२००७ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाल्याचे दिसून येते. परंतु अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील सादर करतांना त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत आयोगास सादर केली आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या अर्जावर प्रथम अपील करण्याची मुदत यानंतर ९० दिवसांनी म्हणजेच दिनांक ३१-०३-२००७ रोजी व्यपगत होते. परंतु त्यांनी अपील मात्र अधिनियमाव्दारे प्रथम अपील करण्याचा विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिनांक १२-११-२००७ रोजी केल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारे संबंधित अपिलार्थीचे प्रथम अपील देखील कालबाह्य ठरल्यामुळे आणि विशेषतः अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ०९-०३-२००७ रोजी प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील, अपिलार्थीने आयोगाकडे चुकीची कागदपत्रे सादर केल्यामुळे फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष दामोदर देशमुख, प्लॉट नं. ६२, शिवदत्त सहकारी गृहनिर्माण संस्था,

सिडको, एन ८, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६१७

निर्णय दिनांक ०८-०२-२०१०

१ श्री. अशोक शंकरराव धनेधर, : अपिलार्थी
प्रियदर्शनी इंदिरानगर, गारखेडा, वॉर्ड क्रमांक ८६,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
उप निबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप निबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद,
औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : सचिव, नूतन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना विनामूल्य देण्याचे संबंधित संस्थेला आदेशित करण्यात यावे अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये उप निबंधक,

सहकारी संस्था औरंगाबाद यांच्याकडे नूतन सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्याकडील दिनांक १०-०१-१९५८ ते १९-०१-१९७१ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नूतन सहकारी गृहनिर्माण संस्थेने एकूण किती जमीन संपादित करुन किती घरे बांधली, जमीन कोणाकडून, केव्हा व किती किंमतीमध्ये विकत घेतली, सदर गृहनिर्माण संस्थेने जमिनीवर पाडलेल्या प्लॉटची व बांधकाम केलेल्या घरांची संख्या, सदर जमीन खाजगी आहे काय, जमीन सहकारी सेल असेल तर जिल्हाधिका-याकडून परवानगी घेतल्याचा दिनांक - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या सचिवास पाठविली व त्याची प्रत अपिलार्थीस दिली आणि नूतन सहकारी गृहनिर्माण संस्था यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०३-२००८ रोजी निर्णय देऊन संबंधित गृहनिर्माण संस्थेस अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संबंधित संस्थेने कोणतीही माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी संबंधित संस्थेस अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे सूचित करुनही त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस आयोगाने संस्थेला त्यांना माहिती देण्याचे सूचित करणे अपेक्षित आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी त्यांच्याकडील रिट पिटीशन क्रमांक ३६४८/२००७, दिनांक ०२-०३-२००९ रोजी श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्यादित, रिसोड, जिल्हा वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दिलेला निर्णय पाहता माहिती अधिकार अधिनियम २००५ मूळात या संस्थेस लागू होत नाही. त्यामुळे या संस्थेस अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेश आयोग या प्रकरणी पारीत करत नाही. तथापि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९ च्या तरतुदीप्रमाणे तालुका उप निबंधक सहकारी संस्था यांना संस्थेकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचे अधिकार आहेत. तेव्हा तालुका उप निबंधक सहकारी संस्था तालुका औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी संबधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. तालुका उप निबंधक सहकारी संस्था तालुका औरंगाबाद यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागणी संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक शंकरराव धनेधर, प्रियदर्शनी इंदिरानगर, गारखेडा, वॉर्ड क्रमांक ८६, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, उप निबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६१८

निर्णय दिनांक ०८-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. सुरेखा चंपतराव पाटील,<br>रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड - ०५ | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,<br>हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर,<br>तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ३०-०१-२००३ ते २००७ पर्यंतच्या कालावधीमधील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -

त्यांच्या कार्यालयास दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत शासनाकडून प्राप्त झालेला निधी, काम करण्याचे ठिकाण, वस्त्यांची नावे, झालेला खर्च, शिल्लक रक्कम, अंदाजपत्रकाच्या सत्यप्रती, बाराव्या वित्त आयोगांतर्गत करण्यात आलेल्या कामांची यादी, मंजूर रक्कम, खर्च व शिल्लक रक्कम - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्याप-पावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांना अपेक्षित असलेली माहिती संबधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य पुरवावी अशी त्यांची अपेक्षा आहे.

अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद तर दिला नाहीच परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००९ रोजी निर्णय देऊनही त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती पुरविली नाही. अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती पुरविली नसल्याच्या त्यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे, अपिलार्थीस त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचा युक्तिवाद मान्य करण्यात येत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या आदेशास कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सुरेखा चंपतराव पाटील, रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड - ०५.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४७
निर्णय दिनांक: ०९-०२-२०१०

१. श्री. मो. मोईन खान पठाण, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्यकार्यकारी अधिकारी (पं.),
जिल्हा परिषद, नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद,
नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी तथा अधीक्षक,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदतीत निर्णय न दिल्यामुळे व नियमबाहय भाष्य केल्यामुळे व अपिलार्थीस अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे आयोगाकडे विचाराधीन अपील केले असून, या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या कालावधीत संपूर्ण स्वच्छता अभियानाअंतर्गत करण्यात आलेल्या वाहन- इंधनखर्चासंदर्भात एकूण सहा मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावरदेखील कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. ०३.०३.२००९ रोजी दिली असून या प्रकरणी अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे दि. २३.०२.२००९ रोजी अर्ज पाठविल्यानंतर अपिलार्थीस दि. ०३.०३.२००९ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे कोणतेही आदेश नाहीत. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत (दि. १६.१२.२००८ अगर तत्पूर्वी) कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ

अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी श्री. बी.एम.वाघमारे, कक्ष अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी/अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड श्री. बी.एम.वाघमारे यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी/अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड श्री. बी.एम.वाघमारे यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. मोईन खान पठाण,द्वारा राम संगनवार, ओम निवास, प्र.नि.हा. जवळ, कैलासनगर, नांदेड-४३१६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी तथा अधीक्षक,पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५४८
निर्णय दिनांक: ०९-०२-२०१०

१. श्री. काझी म.असगरुल आबेदीन म.मजीदोद्दीन, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वक्फ मंडळ महाराष्ट्र
राज्य,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक,
जिल्हा वक्फ बोर्ड,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती आता प्राप्त झाल्याने ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे त्यांचे दि.०९.०२.२०१० रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर केले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील मागे घेतले असल्याचे नमूद केल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ५४८/०९, दि. २४.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०९-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. काझी म.असगरुल आबेदीन म.मजीदोद्दीन,घ.नं.१९/११३, हनुमान मंदिराजवळ, नगरपालिका प्रा.शाळेच्या बाजूला, लेबर कॉलनी,नांदेड -४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,जिल्हा वक्फ बोर्ड,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५४९
निर्णय दिनांक: ०९-०२-२०१०

१. श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अंजुमन इशाते तालीम संस्था, औरंगाबाद संचलित शाळांच्या संबंधात त्यांनी संदर्भित केलेल्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या तक्रार अर्जावर चौकशी केली असल्यास, चौकशी

अहवालाची झेरॉक्स प्रत व संबंधितांच्यावर कारवाई करण्यात आली असल्यास यासंबंधीची माहिती, व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दि. १०.१०.२००८ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने केलेल्या तक्रार अर्जावर चौकशी करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना दि. ०९.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले असल्याचे अपिलार्थीस कळविले व या माहितीकरिता शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांच्याकडे दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सुनावणीचे इतिवृत्त पाठविले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी या प्रकरणी कोणताही विशिष्ट निर्णय दिला असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अशाप्रकारे अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या सर्व अर्जांवर एकत्रितपणे निर्णय घेऊन या प्रकरणाशी संबंधित माहिती दि. २२.०५.२००८ रोजी दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्यापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीच्या सर्व अर्जांवर एकत्रितपणे सुनावणी घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त आयोगास दाखविले व या इतिवृत्तावर अपिलार्थीने स्वाक्षरी केल्याचे आयोगास दाखविले. तथापि यावरुन अपिलार्थीच्या दि. ०६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा स्पष्ट बोध आयोगास होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या चौकशी अहवालाची झेरॉक्स प्रत व संबंधितांच्यावर केलेली कार्यवाही यासंदर्भात अपिलार्थीस सात दिवसांच्या आत स्पष्टपणे कळविण्यात येईल, असे शिक्षण उपसंचालक यांनी आयोगासमोर मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०६.१०.२००८ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जामधील दोन मुद्यांवर स्पष्ट स्वरुपातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे दोन मुद्यांवरील स्पष्ट स्वरुपातील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद,प्लॉट नं.४०, द्वारा अब्दुल मजीद,न्यु एस. टी. कॉलनी, कटकटगेट, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक,शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५५०
निर्णय दिनांक: ०९-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. जीवन सुभानराव बसवदे,<br>रा.काटकळंबा, ता.कंधार, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा वक्फ अधिकारी,<br>जिल्हा वक्फ कार्यालय,नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांनी त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित कोणतीही माहिती अद्यापपावेतो दिली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांचे पत्र क्र. ४२४, दि. ०७.०२.१९९६ च्या संदर्भातील संपूर्ण संचिकेतील पृष्ठांच्या नोटशीटसह प्रतींची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्यास दि. १३.०१.२००९ रोजी पत्र लिहिले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २९.१२.२००८ रोजीच्या सुनावणीचा संदर्भ देऊन अपिलार्थीस दि. ०५.०१.२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते, याचे स्मरण दिले. जन अपिलीय अधिकारी यांचे हे पत्र म्हणजे प्रथम अपिलावर निर्णय कसा असू नये, याचे एक उत्तम उदाहरण आहे, असे म्हटल्यास ते फारसे वावगे ठरणार नाही. परंतु या पत्रानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी माहितीची मागणी करतेवेळी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड या पदावर श्री. अय्युब खान नावाचे अधिकारी कार्यरत होते. ते सध्या जिल्हा वक्फ अधिकारी, परभणी या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने ज्या नस्तीच्या प्रतींची माहिती मागविली आहे, ती नस्ती त्यांनी अभिलेख्यात शोध घेऊनही त्यांना प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस ते ही माहिती पुरवू शकले नाहीत. तथापि ही माहिती ते संबंधित नस्तीचा नव्याने शोध घेऊन पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज तरी उपलब्ध नाही. अपिलार्थीने ज्या नस्तीच्या प्रतींची जन माहिती अधिकाऱ्याकडे मागणी केली आहे, ती नस्ती गहाळ झाली आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी संबंधित नस्तीचा हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत शोध घ्यावा व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवावी. जर या कालावधीमध्ये ही नस्ती गहाळ झाल्याच्या अंतिम निष्कर्षाप्रत जन माहिती अधिकारी आले तर ही नस्ती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी आवश्यकतेप्रमाणे फौजदारी अथवा प्रशासकीय स्वरुपाची कारवाई करावी व तसे अपिलार्थीस कळवावे.

या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी,श्री. अय्युब खान यांनी अपिलार्थीच्या दि.०१.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीन्वये, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना श्री. अय्युब खान, सध्या जिल्हा वक्फ अधिकारी, परभणी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित नस्तीचा शोध घेऊन हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. अय्युब खान (सध्या जिल्हा वक्फ अधिकारी,परभणी या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंग- विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक : ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जीवनराव सुभानराव बसवदे, मु.पो. काटकळंबा, ता.कंधार, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी,जिल्हा वक्फ कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२१
निर्णय दिनांक: ०९-०२-२०१०

१. श्री. माने सोनाजी रघुनाथ, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. अध्यक्ष, : प्रतिवादी
पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, हर्सूल,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२५.११.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था, हर्सूल, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२९.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ३०.०१.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्याचे अध्यक्ष, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था

मर्या., हर्सूल, औरंगाबाद यांना आदेशित केले. तथापि यानंतर माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित संस्थेचे अध्यक्ष अनुपस्थित व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra</u>**

**Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. ३०.०१.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.७२१/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. ३०.०१.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: ०९-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माने सोनाजी रघुनाथ, ४७, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था, हर्सूल, औरंगाबाद.

२. अध्यक्ष, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, हर्सूल, औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२२
निर्णय दिनांक ०९/०२/२०१०

१ श्री. मधुकर एस.देशपांडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

श्री. मधुकर एस. देशपांडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २१.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १७.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.०१.०९.२००८ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ८० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर एस. देशपांडे, प्लॉट नं. २२, सुदर्शन, श्रीरामनगर, जवाहर कॉलनी, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८७
निर्णय दिनांक: ०९-०२-२०१०

१. श्री. बाजीराव दामु साळुंके, : अपिलार्थी
रा.नंदुरबार

**विरुध्द**

१. सचिव, : प्रतिवादी
पौर्णिमा सहकारी गृहनिर्माण सोसायटी मर्या.,
देवपूर, धुळे

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०८.१०.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, पौर्णिमा सहकारी गृहनिर्माण सोसायटी मर्या., देवपूर, धुळे यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२१.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी त्यांच्या दि.१३.१२.२००७ रोजीच्या पत्राव्दारे संबंधित संस्थेच्या चेअरमन / सचिवास अपिलार्थीच्या दि. २१.११.२००७ च्या अर्जाची प्रत पाठवून त्यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे व या पत्राची प्रत अपिलार्थीस

अग्रेषित करुन त्यांना संस्थेकडे आवश्यक ती फी भरुन माहिती घेण्याचे सूचित केले. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याचे व माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित संस्थेचे सचिव व उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे  हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

"**It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a**

**Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२१८७/०८ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाजीराव दामु साळुंके, लोकमान्य कॉलनी, प्लॉट नं.१२, शनि मंदिर रोड, नंदुरबार, ता.जि.नंदुरबार.

२. सचिव, पौर्णिमा सहकारी गृहनिर्माण सोसायटी मर्या., देवपूर, धुळे, जि.धुळे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७६
निर्णय दिनांक: ०९-०२-२०१०

१. श्री. सुरेश साळवे, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१. चेअरमन / सेक्रेटरी, : प्रतिवादी
श्री. गजानन मजुर सहकारी संस्था मर्या., तपोवन,
ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, कन्नड, जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२५.०४.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे चेअरमन / सेक्रेटरी, श्री. गजानन मजुर सहकारी संस्था मर्यादित, तपोवन, ता.कन्नड, जि. औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड, जि. औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२९.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड, जि. औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दि. २२.०६.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सशुल्क व

नियमानुसार पुरविण्याचे चेअरमन, श्री. गजानन मजुर सहकारी संस्था मर्या., तपोवन, ता.कन्नड जि. औरंगाबाद यांना आदेशित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०९.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित संस्थेचे चेअरमन / सेक्रेटरी व सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड, जि.औरंगाबाद हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित मजूर सहकारी संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative</u>**

**Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable.”**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार “सार्वजनिक प्राधिकरण” असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित संस्थेस लागू होत नसल्याने, सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड, जि. औरंगाबाद यांचे दि. २२.०६.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२८७६/०७ फेटाळण्यात येत आहे.

२. सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड, जि. औरंगाबाद यांचे दि. २२.०६.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश साळवे, प्रगती कॉलनी, मनपा शाळेजवळ, मकई गेट रोड, औरंगाबाद.

२. चेअरमन / सेक्रेटरी, श्री. गजानन मजुर सहकारी संस्था मर्या., तपोवन, ता.कन्नड, जि. औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड, जि. औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५४४

निर्णय दिनांक ०९-०२-२०१०

१ श्री. संजय सुखदेव गायकवाड, : अपिलार्थी

मु. दहिवडी, पो. काटी, ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,

वडगांव (देव), ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,

जि. उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना दिनांक ०६-१२-२००८ पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव (देव), श्री. सिताराम लक्ष्मण राऊत यांनी अपिलार्थी श्री. संजय सुखदेव गायकवाड यांचे आयोगास उद्देशून दिनांक ०६-०२-२०१० रोजी लिहिलेले पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली असल्याची कबूली दिली आहे व अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील निकाली काढावे अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात एकूण १६ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. या अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक १० वगळता त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती आवश्यक आहे त्या संदर्भात "मार्च ०८" असे नमूद केले आहे. "मार्च ०८" पर्यंत अपिलार्थीस कोणत्या कालावधी-पासूनची माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच अवैध असल्याचे सिध्द होत आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०६-०२-२०१० रोजी माहिती दिल्याचे पत्र, अपिलार्थीस माहिती मिळाल्याच्या त्यांच्या पोचसहीसह त्यांनी आयोगास दाखवले, यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे अनुमान काढण्यात येऊन, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ५४४/२००९, दिनांक २०-०२-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय सुखदेव गायकवाड, मु. दहिवडी, पो. काटी, ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव (देव), ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५४५

निर्णय दिनांक ०९-०२-२०१०

१ श्री. कानगुले राजीव नागनाथ, : अपिलार्थी
द्वारा, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गोकुंदा, ता
किनवट, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था (गोकुंदा), किनवट, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण सस्था, किनवट, जि. नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : गट निर्देशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, किनवट, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या वेतनातील थकबाकीच्या संदर्भात दिनांक ०१-०२-२००८ ते ३०-१०-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, किनवट यांच्याकडे दिनांक ०८-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ५ व ६ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस दिनांक १५-०१-२००९ पूर्वी देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. या संदर्भात त्यांनी असे स्पष्ट केले आहे की, त्यांनी दिनांक ०८-०९-२००६ रोजी त्यांच्या वेतनातील फरकासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणताही अर्ज केला नसताना त्यांनी अपिलार्थीने दिनांक ०८-०९-२००६ रोजी वेतन फरकासाठी अर्ज केल्याचे दाखविले आहे. त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले आहे की, यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००८ ते ०५-११-२००८ या कालावधीमध्ये एकूण ५ वेळा अर्ज केले होते. या अर्जावर जन माहिती

अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती कार्यवाही केली, अशी माहिती त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ द्वारे विचारली होती परंतु ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली नाही. ही माहिती त्यांना जन माहिती अधिकरी यांच्याकडून त्वरीत प्राप्त होणे अपेक्षित आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली असून, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्याकडे ४/- रु. इतके शुल्क भरणे आवश्यक होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती न पुरविण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना आयोगास स्पष्ट करता आले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही बऱ्याच प्रमाणात संमिश्र स्वरुपाची असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये 'त्यांच्या पगाराच्या थकबाकीची रक्कम न काढण्याचे कारण व नादेय व विवरणपत्र मागवण्याचा उद्देश काय असतो ' अशाप्रकारची जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलचे कारण, स्पष्टीकरण अपेक्षित करणारी, माहिती विचारली आहे. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे अपिलार्थीने 'त्यांच्या दिनांक २०-१२-१९९७ ते १२-१२-१९९९ या कालावधीतील नोंदी त्यांच्या मूळ सेवापुस्तीकेत घेतल्या आहेत का? असतील तर त्यांच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात', अशाप्रकारची माहिती मागविली आहे. या संदर्भात

अपिलार्थीस त्यांच्या मूळ सेवापुस्तीकेतील दिनांक २०-१२-१९९७ ते १२-१२-१९९९ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने घेतलेल्या नोंदी एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे त्यांच्या दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे ४ रु. इतक्या शुल्काची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी वेगळ्या पत्राद्वारे, या शुल्काच्या संपूर्ण तपशीलासह, अर्जदारास अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत, कळविणे अभिप्रेत आहे. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतानाच मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात ४/- रु. इतक्या शुल्काची मागणी केल्याचे दिसून येत आहे. यामध्ये शुल्काचा तपशील नसल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील त्यांच्या सेवापुस्तीकेतील दिनांक २०-१२-१९९७ ते १२-१२-१९९९ या कालावधीतील नोंदी असलेल्या पृष्ठांच्या प्रती त्यांना विनामूल्य द्याव्या लागतील. मुद्दा क्रमांक ३ द्वारे अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळात दिनांक ०८-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेतनाचे फरक अदा करण्यासंदर्भात कोणताही अर्ज केला नव्हता. तरीही सदर अर्ज अपिलार्थीने केल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्रान्वये का दाखविले अशी आयोगाने विचारणा केली असता, त्यावर जन माहिती अधिकारी यांना कोणतेही उत्तर देता आले नाही. तसेच या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-०२-२००८ ते ०५-११-२००८ या कालावधीतील अर्जासंदर्भात अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिल्याचा त्यांचा मुद्दा येथे सिध्द होत आहे. या मुद्यांच्या संदर्भात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्याकडे, त्यांच्या वेतनाच्या

फरकाची रक्कम भरण्यासाठी ज्या ज्या वेळी अर्ज केला त्या त्या वेळी या अर्जातील मुद्यांसंदर्भात त्यांनी वेगवेगळ्या प्राधिकरणाशी दिनांक १०-११-२००८ पर्यंत केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती व त्यांच्या कार्यालयाच्या या विषयाच्या अभिलेख्यांवरील टिपण्यांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे अपिलार्थीने 'प्राचार्यानी वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन मागितले आहे का? असल्यास प्रत द्यावी' अशी माहिती मागितली आहे. तथापि या संदर्भात जन माहिती अधिकारी व प्राचार्यांनी आयोगासमोर असे खुलासे केले आहेत की, त्यांनी अशाप्रकारचे कोणतेही मार्गदर्शन त्यांच्या वरिष्ठांकडे मागितलेले नाही. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशी माहिती दिली आहे की, "फरकाच्या रक्कम प्रकरणाबाबत वरिष्ठ कार्यालयाशी या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४७० दिनांक १५-०४-२००८ अन्वये माहितीस्तव कळविण्यात आलेले आहे." जन माहिती अधिकारी यांच्याच दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, प्राचार्यांच्या वरिष्ठांकडून कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन मागितले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी "अशाप्रकारचे कोणतेही मार्गदर्शन त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडून मागितलेले नाही" अशी माहिती अपिलार्थीस देणे गरजेचे होते. त्यामुळे या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्णतः चुकीची माहिती दिली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ द्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शासन निर्णय क्रमांक टी. एस. ए. / १००३ /३२८७/ ल्य शी - ४/ दिनांक १७-०१-२००४ नुसार आदेशाची प्रत देणे अप्रक्षित होते. परंतु या मुद्यावर अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जातील त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे जसेच्या तसे लिहून अपिलार्थीस माहिती दिल्याचे भासविले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ७ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून भविष्यकाळातील माहिती

मागविली असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रत्यक्षात पुरविलेली माहिती आणि अपिलार्थीस देय असलेली माहिती यांचे वरील परिच्छेदामध्ये केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की त्यांनी, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील अशंतः माहिती - सेवापुस्तीकेच्या विहित कालावधीमधील झेरॉक्स प्रती, मुद्दा क्रमांक ३ व ४ मधील मार्गदर्शन पत्राच्या प्रती उपलब्ध असल्यास त्या पत्राची प्रत, मुद्दा क्रमांक ५ मधील शासनाच्या दिनांक १७-०१-२००४ रोजीच्या आदेशाची प्रत या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना करुनही संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्यामुळे, संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब उप संचालक, तंत्र शिक्षण, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. शेख जलील शेख गुलाब, गट निर्देशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, किनवट, जि. नांदेड यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वर निर्णयामध्ये मुद्देनिहाय स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. उप संचालक, तंत्र शिक्षण, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. शेख जलील शेख गुलाब, गट निर्देशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, किनवट यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कानगुले राजीव नागनाथ, द्वारा, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा गट निर्देशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण सस्था, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, भडकल गेटजवळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५४६

निर्णय दिनांक ०९-०२-२०१०

१ श्री. मलंग अब्दुल रहेमान मो. इस्माईल, : अपिलार्थी
रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर - ४१३५१७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प
विभाग क्र. १, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.१, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. इबादुर रहेमान म. इस्माईल मलंग

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २३-१२-२००८ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती

अधिकारी यांनी त्यांना मुद्देनिहाय माहिती न देता अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना न्याय न देता जन माहिती अधिकारी यांची बाजू घेऊन त्यांचा प्रथम अपील अर्ज फेटाळला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी  यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. इबादूर रहेमान म. इस्माईल मलंग यांच्या जातीच्या संदर्भात एकूण ४ मद्यांद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

" (१) आपल्या कार्यालयाचे अनुरेखक नामे इबादूर रहेमान म. इस्माईल मलंग यांनी दि. १८-०७-२००६ रोजी आपल्या कार्यालयात लिहून दिलेले पत्र सदर अर्जासोबत जोडले असून सदर पत्रामध्ये असे नमूद आहे की, "मि "जुल्हा" या जातीचा नाही. सेवा पटात झालेली नोंद मला मान्य नाही. तरी आपण कार्यकारी अभियंता अधिकारी असून दिनांक २९-०८-२००६ रोजी माहिती दिली की  म. इबादूर रहेमान म. इस्माईल मलंग (अनुरेखक) जुल्हा जातीचे आहे (सोबत पत्र जोडले आहे) तरी एम.आय. मलंग "जुल्हा" जातीचे नसताना आपण अधिकारी असून M.I.Malang जुल्हा जातीचे आहे म्हणून खोटी माहिती का दिली याची माहिती देण्यात यावी. (२)  अनुरेखक M.I.Malang "जूल्हा" जातीचे नसताना त्यांच्या सेवापटात "जुल्हा" जातीची नोंद का घेतली याची माहिती देण्यात यावी.  (३)  M.I.Malang अनुरेखक यांच्या सेवापटात "जुल्हा" जातीची नोंद घेण्यामागे तूमचा हेतू काय होते याची माहिती देण्यात यावी. (४)  अनुरेखक एम.आय.मलंग यांची आपण परवाणगी न घेता लेखी अर्ज न घेता व "जुल्हा" जातीचा पुरावा न घेता त्यांच्या सेवापटात "जुल्हा" जातीची खोटी नोंद घेण्यामागे तूमची काय गरज होती, फायदा होता याची माहिती देण्यात यावी. "

(टीप :- अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतलेला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २१-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील माहिती या संज्ञेत मोडत नसल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ११-११-२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या जातीसंदर्भात काही माहिती हवी आहे. ही माहिती त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक अशा स्वरुपाची आहे. परंतु तिचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या अर्जामधील चारही मुद्यांद्वारे त्यांची स्पष्टीकरणे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

२ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे खुलासे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दल अथवा एखाद्या निर्णयाबद्दल अर्जदारास त्यांचे स्पष्टीकरण देणे अशाप्रकरची प्रक्रिया मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे साहजिकच ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय असणार नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २३-१२-२००८ रोजी दिलेल्या निर्णय आयोगास योग्य वाटतो. या निर्णयाविरुध्दच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मलंग अब्दुल रहेमान मो. इस्माईल, रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - ४१३५१७

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र. १, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५५१

निर्णय दिनांक ०९-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जोंधळे नामदेव शंकरराव,<br>रा. ब्लॉक नं. २९/२ एन डी-४१, सिडको,<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपसंचालक,<br>क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये किती कर्मचारी आहेत व त्यांना नेमून दिलेली कामे, त्यांच्या कार्यालयातर्फे गेल्या तीन वर्षात किती

क्रीडा मंडळ, व्यायामशाळा, सेवाभावी संस्था व विविध क्रीडा संघटना यांना किती अनुदान देण्यात आले त्याचा तपशील, या कार्यालयास शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाचा तपशील आणि दिनांक ०१-०१-२००७ ते ३१-१२-२००७ या कालावधीमध्ये किती संस्थांना व क्रीडा मंडळ व व्यायामशाळांना किती अनुदान देण्यात आले - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांच्याकडे दिनांक १९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०२-२००९ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांनी दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले होते. त्यांच्याकडील अपिलार्थीच्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी देखील संबंधित जन माहिती अधिकारी श्री. अशोक गिरी हे अनुपस्थित राहिले. जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना सध्या शासनाकडून निलंबीत करण्यात आले आहे. सध्याचे

जन माहिती अधिकारी श्री. गुलाब राठोड यांना दिनांक १४-०१-२०१० रोजीच्या पत्राव्दारे पूर्वसूचना देऊनही ते आज रोजी सुनावणीसाठी गैरहजर आहेत. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांनी दिनांक १०-०२-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेश दिले त्यावेळी श्री. गुलाब राठोड नावाचे अधिकारी जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड या पदावर कार्यरत होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ नुसार देय होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी श्री. अशोक गिरी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०२-२००९ रोजी निर्णय देऊनही श्री. गुलाब राठोड या जिल्हा क्रीडा अधिका-याने जन अपिलीय अधिका-याच्या निर्णयाचे कोणतेही पालन केले नाही व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले आहे. श्री. अशोक गिरी व श्री. गुलाब राठोड या दोनही अधिका-यांना अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी कोणतेही समर्थनीय कारण उपलब्ध असावे अशी कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेऊन या दोनही अधिका-यांनी स्वत:ला त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अशोक गिरी व सध्याचे जन माहिती अधिकारी श्री. गुलाब राठोड यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) प्रत्येकी इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा

असे आदेशित करण्यात येत आहे. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. आयोगाचे हे आदेश श्री. अशोक गिरी यांना हस्तांतरीत करण्याची संपूर्ण जबाबदारी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांची राहील असे त्यांना अवगत करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी श्री. गुलाब राठोड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अशोक गिरी व सध्याचे जन माहिती अधिकारी श्री. गुलाब राठोड यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणा-शिवाय त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) प्रत्येकी इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच

तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जोंधळे नामदेव शंकरराव, रा. ब्लॉक नं. २९/२ एन डी-४१, सिडको, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

३ तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड श्री. अशोक गिरी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर) (नोंदणीकृत टपालाव्दारे)

४ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५५२

निर्णय दिनांक ०९-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबुराव नामदेव गबाळे,<br>रा. भवानीनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, इतवारा उपविभाग,<br>नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक, नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती न दिल्याने व चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथील रजिस्टर गुन्हा क्रमांक २१६/०७ च्या संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या गुन्ह्याच्या तपासानंतर न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपाच्या संपूर्ण कागदपत्रासह झेरॉक्स सत्यप्रती व पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीणच्या पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक यांच्या अनुक्रमे दिनांक २०-०४-२००७ ते ३१-१०-२००८ व दिनांक २०-०४-२००७ ते १०-०९-२००८ पर्यंतच्या मंजूर आठवडा दैनंदिनीच्या झेरॉक्स प्रती, आणि पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. गोकावे व पोलीस उपनिरीक्षक श्री. मेकेवाड यांनी आरोपीशी संगनमत करुन तपासामध्ये पक्षपात केला आहे किंवा नाही याबाबत माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रति प्रतीस रुपये २ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याची विनंती केली. तथापि जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस हे पत्र नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविले नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील संबंधित कोणतीही घडामोडी अवगत झाली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्याच दिवशी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस ही माहिती दिनांक १७-०२-२००९ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाली व प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील देय माहिती दिनांक १७-०२-२००९ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस न्यायालयाकडून हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती अशा प्रकारे न्यायालयाकडून परस्पर प्राप्त करुन घेण्याचे सूचित करण्याची कृती चुकीची आहे. या मुद्दयावर त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे न्यायालयाकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधितांकडे पाच दिवसात पाठविणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती न करता अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती न्यायालयाकडून परस्पर हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. परिणामी अपिलार्थीस या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती देण्याच्या संदर्भात, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग केला असल्यामुळे, आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना स्वतः न्यायालयाकडून हस्तगत करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पोलीस स्टेशन

नांदेड ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक व उप पोलीस निरीक्षक यांच्या आठवडा डायरीच्या प्रती संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, या आठवडा डाय-या सीआरपीसी कलम १७२ च्या तरतुदीचा हवाला देऊन ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येत नसल्याचे स्पष्ट केले आहे. या मुद्दयासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २२ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

' या अधिनियमाच्या तरतुदी या, शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा १९) यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमा-खेरीज कोणत्याही अन्य कायद्याच्या आधारे अंमलात असणा-या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, अंमलात येतील. '

ही तरतूद पाहता अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य आहे की नाही हे प्रथम तपासावे लागेल. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) व ९ व्दारे या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही नागरिकाला काही माहिती पुरविण्याचे आबंधन असणार नाही, हे स्पष्ट केले आहे. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भात मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उघड केल्याने जर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) व ९ च्या तरतुदीस छेद जात नसेल तर ही माहिती त्यांना अपिलार्थीस उघड करता येईल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीणचे तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. गोकावे व पोलीस उप निरीक्षक श्री. मेकेवाड यांनी तपासणीत पक्षपात केला आहे किंवा कसे या अशा प्रकारचे अभिप्राय मागविले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये " माहिती " या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केलेली आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या

मुद्दा क्रमांक ४ व्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलची कारणे, खुलासे अथवा अभिप्राय अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती देय होत नाही.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती व त्यांना देय असलेली माहिती यांचे वरील परिच्छेदामध्ये केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण माहिती व मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती, जर अधिनियमातील कलम ८ (१) व ९ च्या तरतुदीस बाधा येत नसेल तर, ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०४-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागविली आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद देखील नोंदणीकृत टपालाव्दारे देणे भाग होते. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे पत्रावर क्रमांक टाकून तयार करुन ठेवली परंतु अपिलार्थीस ती दूरध्वनीव्दारे त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले, ही जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक २२-१२-२००८ रोजीचे पत्र हे रजिस्टर्ड टपालाने पाठविणे त्यांना अनिवार्य होते. परंतु अशा प्रकारची कोणतीही कृती न करता त्यांनी अपिलार्थीने हे पत्र त्यांच्याकडून घेऊन जावे असे अपेक्षित केले. सदरचे पत्र त्यांनी पोस्टाव्दारे अपिलार्थीस पाठविले

नाही. अशा प्रकारच्या त्यांच्या अनियमिततेबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती, जर ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) व ९ च्या तरतुदीस बाधा येत नसेल तर ती अपिलार्थीस, वरील क्रमांक २ मध्ये विहित केलेल्या कालावधीत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबुराव नामदेव गबाळे, रा. भवानीनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, इतवारा उपविभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, इतवारा उपविभाग, नांदेड श्री. राजकुमार अं. शिंदे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : पोलीस अधीक्षक, नांदेड)

४ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५५३

निर्णय दिनांक ०९-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अनिल विठ्ठलराव खामकर,<br>रा. विष्णुपुरी,<br>तालुका जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>आस्थापना विभाग,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कुलसचिव,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, विष्णुपुरी येथील श्री. संभाजी दिगंबर हंबर्डे या त्यांच्याकडील कर्मचा-याच्या किंवा त्यांच्या वडिलाच्या नावावर असलेल्या गट नंबर ६८ मधील किती क्षेत्रफळ जमीन विद्यापीठासाठी संपादित केलेली आहे, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मौजे विष्णुपुरी येथील गट नंबर ६८ मधील विद्यापीठासाठी संपादित केलेल्या एकूण ०.८० हेक्टरचा तपशील पुरविला. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०२-२००९ रोजी, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती परत पुरवून, अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्या-प्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. परंतु ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी अथवा त्यांच्या कार्यालयाशी कधीही व्यक्तिशः संपर्क साधला नाही. त्यामुळे ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात आयोगास असे अवगत केले की, त्यांनी विद्यापीठाने संपादित केलेल्या जमिनीचा संपूर्ण मोबदला भूसंपादन अधिकारी यांच्याकडे अदा केला आहे. भूसंपादनाच्या रकमेचे वाटप संबंधित भूसंपादन अधिका-याच्या मार्फत झालेले आहे. त्यांनी

आयोगास असेही अवगत केले की, गट नंबर ६८ मधील विद्यापीठाच्या संपादित केलेल्या ०.८० हेक्टर क्षेत्रफळाच्या जमिनीचे एकूण ९ मालक असून त्यामध्ये दिगंबर डुबाजी हंबर्डे यांचा समावेश आहे. या ०.८० हेक्टर जमिनीपैकी प्रत्येक मालकाचे क्षेत्र किती आहे अशा प्रकारची अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या जमिनीच्या क्षेत्राची माहिती मागितली आहे. या जमिनीचे क्षेत्र ०.८० हेक्टर इतके असून या जमिनीचे एकूण ९ मालक आहेत. ०.८० हेक्टरपैकी प्रत्येक मालकाचे क्षेत्र किती आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे काहीही माहिती उपलब्ध नाही आणि या क्षेत्राचे संपादन केल्यापोटी विद्यापीठाने भूसंपादन अधिका-याकडे या क्षेत्राची किंमत अदा केली आहे. या जमिनीच्या संपादनाच्या पोटीच्या रकमेचे वाटप भूसंपादन अधिका-यामार्फत केले असल्याने त्यांच्याकडे संबंधित ९ मालकांना, त्यांच्या मालकीच्या क्षेत्रफळाच्या प्रमाणात किती रक्कम अदा केली गेली आहे, याची माहिती जन माहिती अधिकारी यांना भूसंपादन अधिका-याकडे मिळेल. भूसंपादन अधिकारी यांच्याकडे प्रत्येक पोटहिश्याच्या मालकीच्या हक्काच्या क्षेत्रफळाची नोंद निश्चितपणे असणार. त्यामुळे संबंधित भूसंपादन अधिका-याकडून ही माहिती घेऊन ती अपिलार्थीस द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे. मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीच्या अनुषंगाने या अर्जाची प्रत या प्रकरणाशी संबंधित माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे आहे त्यांच्याकडे अर्ज प्राप्तीपासून पाच दिवसाच्या आत पाठविणे जन माहिती अधिकारी यांना येथे अनिवार्य होते. परंतु त्यांनी अशा प्रकारची कृती न केल्यामुळे आता त्यांना अपिलार्थीस माहिती पुरवावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांनी, या परिच्छेदामध्ये वर सूचित केल्याप्रमाणे, ही माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून प्राप्त

करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिल विठ्ठलराव खामकर, रा. विष्णुपुरी, तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५५४

निर्णय दिनांक ०९-०२-२०१०

१ श्री. एम. ए. खदीर पिता एम. ए. करीम, : अपिलार्थी
रा. ओरिएंटल मेकॅनिकल वर्कशॉप, मध्यवर्ती जकात
नाक्याजवळ, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-१०-२००८ रोजी प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण, दिशाभूल करणारी व

खोटी असल्यामुळे व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कळमनुरी उपविभागाअंतर्गत झालेल्या कामांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक ०१-०३-२००७ ते ३०-०४-२००८ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या इमारत दुरुस्तीच्या व मूळ कामाच्या वेगवेगळ्या शिर्षाअंतर्गत झालेल्या कामाच्या अंदाजपत्रकाच्या तांत्रिक मान्यतेच्या प्रती, अंदाजपत्रकाच्या प्रती, मोजमाप पुस्तिकेच्या प्रती आणि सी. सी. च्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागवूनही अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झाली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी शेवटी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पोस्टाने पाठविली. तथापि अपिलार्थीने ही माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर आठ दिवसाच्या आत, त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून हस्तगत करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानुसार कार्यवाही न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०२-२०१० रोजी औरंगाबाद  येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी  यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती.  परंतु व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी त्यांच्या कार्यालयामध्ये ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत.  त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १०-१०-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली.  जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी व्यक्तिशः कधीही उपस्थित झालेले नाहीत.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी कळमनुरी उपविभागातील कामांच्या मोजमाप पुस्तिकाच्या प्रती अद्यापपावेतो अपिलार्थीस देणे बाकी आहे.  या मोजमाप पुस्तिका त्यांच्याकडे आता तयार असून या प्रती अपिलार्थीस ते देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे.  परंतु ही माहिती त्यांना अपूर्ण, दिशाभूल करणारी व खोटी का वाटते याचे स्पष्टीकरण त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही.  आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना अद्यापपावेतो मोजमाप पुस्तिकेच्या प्रती देणे बाकी असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला आहे.  हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहिती अपूर्ण स्वरुपात मिळाली हे अपिलार्थीचे म्हणणे,

काही प्रमाणात सिध्द होते. या मुद्दयावर देखील आयोगाचे असे भाष्य आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी अपिलार्थीची होती. ती जबाबदारी अपिलार्थीने कशा प्रकारे पार पाडली हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अभावी कळण्यास मार्ग नाही. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन अपिलार्थीने ही जबाबदारी बरोबर पार पाडली नाही अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क हस्तगत करुन घ्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस द्यावयाची, उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे असे अभिप्राय नोंदविले आहेत. तथापि या अभिप्रायापृष्ठ्यर्थ त्यांनी कोणतीही कागदपत्रे आयोगाकडे सादर केली नसल्यामुळे व तसेच या मुद्दयावर तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे त्यांचा हा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरविण्याची व्यवस्था करावी.

**औरंगाबाद**						**( वि. बा. बोरगे )**

**दिनांक	०९-०२-२०१०**				**राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. एम. ए. खदीर पिता एम. ए. करीम, रा. ओरिएंटल मेकॅनिकल वर्कशॉप, मध्यवर्ती जकात नाक्याजवळ, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर /५४३

निर्णय दिनांकः ०९-०२-२०१०

१. श्री. दत्ता प्रभू रोंगे, : अपिलार्थी
मु.पो. मुरुड अकोला, ता.जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,
मुरुड अकोला, जि.लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस पूर्णपणे माहिती देण्याचे सूचित केले असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी आजतागायत माहिती पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. यावरुन असे स्पष्ट होत आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे संगनमत व हातमिळवणी झाली असल्यामुळे

त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व अपिलार्थीस योग्य व अद्ययावत माहिती देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित, सन २००६-२००८ या कालावधीतील, एकूण चार मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत गालेगावरोड ते अनंत कुलकर्णी, अनंत कुलकर्णी ते अशोक बाळापूरे, बाबूराव पांढरे ते बाळकिशन घोडके हे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम कोणत्या योजनेखाली केले आहे, त्या कामाच्या अंदाजपत्रकाची माहिती, या कामाविषयी ग्रामसभा घेतली आहे की नाही, जर घेतली असेल तर त्याच्या प्रोसिडींग बुकातील नोंदीची प्रत, सन २००६-०७ व २००७-०८ पर्यंत आर्थिक वर्षातील नळपट्टी व घरपट्टीची जमा झालेली रक्कम, जमा-खर्चाची बँकेतील व्यवहाराविषयी पासबुकातील नोंदीची प्रत, मुंबई ग्रामपंचायत नियम १९६० कलम ३८ प्रमाणे अभिलेख्यांचे वर्गीकरण,परिक्षण व नाशन, अन्वये वर्ग-अ बाबत सन २००६-०७, २००७-०८ या आर्थिक वर्षातील अभिलेखांच्या नोंदीची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.१०.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने ज्या कामांच्याविषयी माहिती मागितली आहे, त्या कामांची तपासणी करण्याचे विस्तार अधिकाऱ्यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी या निर्णयामध्ये कोणतेही भाष्य केले

नाही. अशाप्रकारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दि. २०.१०.२००८ व ०४.१२.२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.१०.२००८ व ०४.१२.२००८ रोजी काही माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोच माहिती अधिकारी यांना आयोगास दाखवता आली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी ग्रामपंचायत, मुरुड अकोला ही ग्रामपंचायत लहान असल्यामुळे येथे अभिलेख्यांचे वर्गीकरण अद्यापपर्यंत करण्यात आलेले नाही, असे आयोगास अवगत केले. त्यामुळे या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता तसे कळविणे भाग आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी का वाटत आहे, याचे स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तथापि त्यांनी या माहितीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.११.२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये त्यांचे आक्षेप नोंदविले आहेत. या आक्षेपाचे निराकरण करणे, हे आयोगाच्या कार्यकक्षेमध्ये नाही. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, 'आवश्यक असलेली माहिती ' या सदराखाली

दर्शविलेली माहिती ही त्यांच्या यासंदर्भातील मूळ अर्जातील माहितीपेक्षा वेगळी आहे. त्यांच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.१०.२००८ व ०४.१२.२०८ रोजी माहिती दिली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविताना सर्वसाधारण कार्यालयीन कार्यपध्दतीप्रमाणे अपिलार्थीस उद्देशून पत्र व त्यासोबत माहितीची कागदपत्रे अशाप्रकारे Covering Letter पाठविलेले नसल्याचे आढळून आले. तथापि अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २०.१०.२००८ रोजी माहिती पुरविल्याचे त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २०.१०.२००८ रोजी माहिती प्राप्त झाल्याची धारणा दृढ होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.१२.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे असे आयोगास अवगत केले आहे. तथापि या संदर्भातील सबळ पुरावा त्या आयोगास दाखवू शकल्या नाहीत. आज रोजी त्यांच्याकडे ही माहिती तयार आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोष्टाने व विनामूल्य पाठवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोष्टाद्वारे व विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०९-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्ता प्रभू रोंगे, मु.पो. मुरुड अकोला, ता.जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मुरुड अकोला, ता. जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५५९
निर्णय दिनांक: १०-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. बाणोत धर्मा मेहरबान,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक (अंगुली मुद्रा),<br>पुणे. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक (का. व सु.),<br>पुणे. | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : | संचालक /पोलीस अधीक्षक (अंगुली मुद्रा),गुन्हा अन्वेषण विभाग, म.रा.पुणे |
| जन अपिलीय अधिकारी : | पोलीस अधीक्षक (प्रशासन/तं.सं.),गुन्हा अन्वेषण विभाग, म.रा.पुणे |
| त्रयस्थ पक्ष : | श्री. ए.एम.पोटे व<br>श्री. आर.एम.चांदवीलकर |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. १०.०२.२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने, ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे नमूद कले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, सदर अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ५५९/०९, दि. १७.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाणोत धर्मा मेहरबान,५०, वसंतनगर, जवाहर कॉलनी, त्रिमुर्ती चौकाजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा संचालक/पोलीस अधीक्षक (अंगुली मुद्रा),गुन्हा अन्वेषण विभाग, म.रा.पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक (प्रशासन/तं.सं.),गुन्हा अन्वेषण विभाग, म.रा.पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६०
निर्णय दिनांक: १०-०२-२०१०

१. श्री. विक्रांत विजयकुमार जाधव, : अपिलार्थी
तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता, जिल्हा परिषद
ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, तुळजापूर,
जि.उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपअभियंता, जिल्हा परिषद
ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, तुळजापूर,
जि.उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्रामपंचायत ढेकरी, ता. तुळजापूर,
जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने,त्यांना जन माहिती अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा, ढेकरी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांनी माहिती देण्यासाठी ४२ दिवसांचा कालावधी घेतल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० नुसार शास्ती लावावी, यासाठी त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये उपअभियंता, जि.प.ग्रामीण पाणीपुरवठा,उपविभाग, तुळजापूर यांच्याकडे, मौ. ढेकरी, ता.तुळजापूर येथे चालू असलेल्या ग्राम पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रकाच्या प्रती, अशी माहिती मागितली होती.तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी परत उपअभियंता यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी उपअभियंता यांनी दि. १२.११.२००८ रोजी घेतली. परंतु यासंदर्भात कोणताही निर्णय पारित केला नाही. त्यांचा दि. १२.११.२००८ रोजीचा कथित निर्णय म्हणजे कोणत्याही अपिलावर कशाप्रकारे निर्णय असू नये, याचे उत्तम उदाहरण आहे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, त्याच दिवशी पाणी पुरवठा समितीच्या अध्यक्षांकडून प्राप्त झ ाली. परंतु ही माहिती विलंबाने प्राप्त झाल्याने, संबंधित उपअभियंता यांच्यावर आयोगाने प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण ४२ दिवसांच्या विलंबाकरिता शास्ती लावण्याचे आदेश पारित करावेत म्हणून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा, मौ. ढेकरी, ता.तुळजापूर व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा, मौ. ढेकरी, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने उपअभियंता यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १२.११.२००८ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. यासंदर्भात अपिलार्थीने माहिती प्राप्त झाल्याच्या दिलेल्या लेखी कबूलीची सत्यप्रत त्यांनी आयोगासमोर अवलोकनास्तव

आज रोजी सादर केली. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पाणीपुरवठा समितीच्या अध्यक्षांकडून दि. १२.११.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा समिती, मौ.ढेकरी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने उपअभियंता, पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर यांच्याकडे जी माहिती मागितली आहे, ती माहिती उपअभियंता यांच्याकडे उपलब्ध असू शकणार नाही. कारण अपिलार्थीने ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात उपअभियंता यांच्याकडे माहिती मागितली आहे, ती योजना शासनाच्या इतर विकास योजनांप्रमाणे राबवावयाची नसून, या योजनेअंतर्गत करावयाची सर्व कामे ग्रामस्थांनी स्वतः त्यांच्यातर्फे नियुक्त केल्या गेलेल्या समितीमार्फत पार पाडावयाची आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती या समितीच्या अध्यक्षांच्या अथवा सचिवांच्याकडे उपलब्ध असते. हे अध्यक्ष व सचिव हे शासनाचे कोणतेही कर्मचारी नसतात, परंतु स्थानिक ग्रामस्थांमधून निवडलेल्या व्यक्ती असतात. उपअभियंता, पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर यांचा या समितीस तांत्रिक मार्गदर्शन करण्यापलीकडे कोणताही संबंध नाही. या पाणीपुरवठा समितीची सर्व माहिती लोकप्रतिनिधींकडे उपलब्ध असते. ही समिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारे 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. त्यामुळे अपिलार्थीस संबंधित अध्यक्ष,ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती,मौ.ढेकरी यांनी, त्यांना ४२ दिवसांच्या विलंबाने माहिती दिल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्याची अपिलार्थीची विनंती आयोग अमान्य करीत आहे व अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विक्रांत विजयकुमार जाधव,विपुल चष्मा घर, पुजारी मंगल कार्यालयाजवळ, धाराशिवरोड, तुळजापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत ढेकरी, ता. तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६१
निर्णय दिनांक: १०-०२-२०१०

१. श्री. आर.टी.पवार, : अपिलार्थी
रा.गंगापूर,जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
उपविभाग, गंगापूर, जि.औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता ग्रामीण विभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : मे. देवसिध्द कंपनी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी तटस्थपणे सुनावणी न घेता, त्यांच्या अधिपत्त्याखालील कनिष्ठ अभियंत्यास वाचविण्याच्या दृष्टीने व त्यांना पाठीशी घालण्याच्या हेतूने प्रेरित होऊन, प्रकरणात तटस्थपणे सुनावणी न घेता व त्यांचे म्हणणे ऐकून न घेता, त्यांनी एकतर्फी निर्णय घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्षाच्यासंदर्भातील दि. ०१.०१.२००७ ते दि.३१.१०.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५९ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्यावरुन त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे कार्यकारी अभियंता,ग्रामीण विभाग, म.रा.वि.वि.कं.लि.कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे दि. ११.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस उत्तर देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्राचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष आणि जन माहिती अधिकारी या सर्वांच्या युक्तिवादाचा विचार न करता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या पत्राद्वारे उत्तर देऊन त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत

आज रोजी सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या दि. ११.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्याची ही पध्दत बरोबर नाही. सबब त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या

दि. ११.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचे युक्तिवाद नोंदवून व त्यांच्याकडे दाखल करण्यात आलेली कागदपत्रे व सुनावणीच्या आधारे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.११.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सर्व संबंधितांचे युक्तिवाद नोंदवून तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आर.टी.पवार, मु.पो. नुतन कॉलनी,गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

उपविभाग,गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६२
निर्णय दिनांक: १०-०२-२०१०

१. श्री. सोमेश्वर वामनराव मोटे, : अपिलार्थी
रा.गेवराई, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, गेवराई, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, गेवराई, जि.बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
नगर परिषद, गेवराई,जि.बीड

**निर्णय**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे व त्यांनी दिशाभूल करणारी माहिती देऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दंड न केल्यामुळे अपिलार्थीवर अन्याय झाला. त्यामुळे संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना दोषी ठरवून त्यांना शास्ती व दंड लावण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीमध्ये, या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २२ च्या संदर्भात माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो दिलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दि. १८.१२.२००६ ते दि. ०९.०९.२००८ या कालावधीतील विविध मुद्यांवरील माहिती एकूण ४३ मुद्यांद्वारे विचारली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील ४३ मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने या माहितीवर १३ उपमुद्दे उपस्थित करुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील व अपील अर्जातील उपमुद्यांचीही माहिती देण्यात आल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये बांधकाम विभागाची माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना उशिर झाला, कारण या कालावधीमध्ये संबंधित कनिष्ठ अभियंता हे आजारी होते. माहिती उशिरा प्राप्त झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की,त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. १४.१०.२००८ रोजी माहिती दिली. या माहितीवर अपिलार्थीने उपस्थित केलेल्या १३ उपमुद्यांवरील माहिती अपिलार्थीस त्यांनी दि. १३.११.२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतूतः नाकारले नाही किंवा माहिती देण्यास टाळाटाळ केली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यसाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. १४.१०.२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि या माहितीपैकी मुद्दा क्र. २२,३० व ३४ या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे संबंधित प्राधिकरणांनी अपिलार्थीस प्रतिसाद देऊन, म्हाडा कार्यालयाने अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या मुद्यांवर माहिती अपेक्षित असल्याचे विचारले व सरकारी कामगार कार्यालय आणि जीवन विकास प्राधिकरणाने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती नगर परिषदेकडे प्रथमतः ती पुरवून नगर परिषदेमार्फत दि. २८.११.२००८ रोजी अपिलार्थीस पुरविली. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने माहिती देण्याचे टाळले आहे, असे निःसंशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्याचे आयोगास आढळून आले आहे. ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्यामुळे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(९) च्या तरतुदीप्रमाणे ही माहिती सुरुवातीस नाकारुही शकले असते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी याप्रमाणे माहिती न नाकारता, त्यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली. एवढेच नव्हेतर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जो भाग इतर सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित होता, त्यांच्याकडेही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत पाठवून संबंधित प्राधिकरणाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर ती अपिलार्थीस पुरविली आहे, हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी

यांनी हेतूपुरस्सर विलंब लावला असल्याचे या घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोगाकडे केली आहे. तथापि उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीचे प्रथम अपील दि. ०६.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. ०२.१२.२००८ रोजी म्हणजेच अधिनियमातील कलम १९(६) मधील विहित केलेल्या कालमर्यादेत सुनावणी ठेवली होती. तथापि या दिवशी अपिलार्थी सुनावणीस उपस्थित न राहू शकल्यामुळे अपिलार्थीस पुढील तारीख देण्यात आली व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी पुढील तारीख सोयीची नसल्यामुळे अंतिमतः दि. ०२.०१.२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय दिलेला आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्याचे हेतूपुरस्सर टाळले आहे, असे सिध्द होत नाही. याहीपेक्षा महत्त्वाचे असे आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे अधिकार आयोगास नाहीत. त्यामुळे अपिलार्थीची जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २२ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही, असे नमूद केले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र. २२ द्वारे मागणी केलेली माहिती ही म्हाडा कार्यालयाशी संबंधित होती. ती प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नव्हती. अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती म्हाडा कार्यालयास देण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या योजनेसंदर्भात माहिती हवी आहे, याचा अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केला नसल्यामुळे म्हाडा कार्यालयाने अपिलार्थीस दि. २०.१०.२००८ रोजी या संदर्भात स्पष्टीकरण देखील विचारले. परंतु सदरचे स्पष्टीकरण अपिलार्थीने म्हाडा कार्यालयास दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून आले नाही. यावरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २२ च्या संदर्भात माहिती त्यांना प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे.

अशाप्रकारे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील नमूद केलेले तीनही मुद्दे वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे निकाली निघत असल्यामुळे व अपिलार्थीची या तीनपैकी कोणत्याही मुद्यावरील विनंती आयोगाने मान्य न केल्यामुळे, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: १०-०२-२०१०** — **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सोमेश्वर वामनराव मोटे, मोटे गल्ली, गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद कार्यालय, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७५
निर्णय दिनांक: १०-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०२.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड

यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०२.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २०.०६.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील खारीज केले. या निर्णयाने व्यथित होऊन व माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. १०.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड  हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘सार्वजनिक प्राधिकरण’ या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने, माहिती

अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.७७५/०९ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७६
निर्णय दिनांकः १०-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०२.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड

यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०२.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २०.०६.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी (तेरणानगर) यांना आदेशित केले. तथापि यानंतर माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. १०.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड  हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. २०.०६.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.७७६/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. २०.०६.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः १०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७७
निर्णय दिनांक: १०-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१०.०१.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड

यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०३.०३.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी (तेरणानगर) यांना आदेशित केले. तथापि यानंतर माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. १०.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड  हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. ०३.०३.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.७७७/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. ०३.०३.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः १०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५५५

निर्णय दिनांक १०-०२-२०१०

१ श्री. सैय्यद मुबीन उद्दीन सैय्यद अलाउद्दीन, : अपिलार्थी
उप-संपादक, दै. खडकी समाचार, शॉप नं. ४, आमेर मार्केट,
जुनाबाजार, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मालमत्ता अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मालमत्ता अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, औरंगाबाद शहरातील जुबली पार्क येथील महानगरपालिका पाणी टाकी जवळील महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या जागेमधील किती कर्मचाऱ्यांना व केव्हापासून निवासस्थान देण्यात आलेले आहे, त्यात माजी नगरसेविका अल्का पाटील व

महानगरपालिका विभागाचे उपअभियंता श्री. खमर यांना निवासस्थान किंवा जागा देण्यात आलेली आहे का, जागा दिली असल्यास कोणत्या प्रकारे व नियमानुसार देण्यात आली आहे त्याचा तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने व परिणामी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाने परत मालमत्ता अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर मालमत्ता अधिकाऱ्याने काय कार्यवाही केली, हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण ३ मुद्यांवरील माहितीपैकी त्यातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित - अलका पाटील व श्री. खमर यांना जागा दिली आहे का?" ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली

माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अथवा मत मागणारी माहिती मागविणे व जन माहिती अधिकाऱ्याने अर्जदाराच्या प्रश्नावलीस उत्तर देऊन त्यांचे अभिप्राय अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रियांचा मूळात समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक २ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीबाहेरची व पर्यायाने तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणार नाही. मात्र उर्वरित मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती ही अधिनिय-मातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे जर अर्जदाराने व्यक्तिशः माहिती मागितली तर, ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी कधी संपर्क साधला होता, या संदर्भात कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जोडलेला नाही, अथवा या संदर्भात आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मध्यंतरीच्या काळात माहिती दिली किंवा कसे हे देखिल सर्व संबंधितांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याचे अनुमान काढून अपिलार्थीस माहिती देण्याच्या

दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सैय्यद मुबीन उद्दीन सैय्यद अलाउद्दीन, उप-संपादक, दै. खडकी समाचार, शॉप नं. ४, आमेर मार्केट, जुनाबाजार, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५५७

निर्णय दिनांक १०-०२-२०१०

१ श्री. उस्मानशहा हाजीसांडु शहा, : अपिलार्थी
रा. शरिफ कॉलनी, रोषण मस्जीद, गल्ली नं. ०९, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व
भटक्या जमाती महामंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व
भटक्या जमाती महामंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : व्यवस्थापक, वित्त व लेखा, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई - ४९

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००० ते २००८ पर्यंतच्या कालावधीत छप्परबंद समाजाच्या सुशिक्षित बेकारांना किती कर्ज दिले व किती प्रकरणे प्रलंबित आहेत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज त्यांनी जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ, औरंगाबाद यांना उद्देशून केलेला आहे. अपिलार्थीचा अर्ज जिल्हा व्यवस्थापकास दिनांक १३-०१-२००९ रोजी प्राप्त झाला आहे. यावर त्यांनी कोणतीही कार्यवाही अद्यापपावेतो केलेली नाही. या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे व्यवस्थापक (वित्त व लेखा), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ, मुंबई हे आहेत. त्यांना अद्यापपावेतो अपिलार्थीचा दिनांक १३-०१-२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त न झाल्याने ते अद्यापपावेतो सुनावणी घेऊ शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक (वित्त व लेखा), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ, मुंबई यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी, अपिलार्थीचा त्यांच्याकडे दिनांक १३-०१-

२००९ रोजी प्राप्त झालेला प्रथम अपील अर्ज त्या अर्जासोबतच्या सहपत्रासह हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत या प्रकरणी नियुक्त केले गेलेले जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम पाठवावा. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीचा दिनांक १३-०१-२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यापासून पुढील ३० दिवसाच्या आत व्यवस्थापक, वित्त व लेखा यांनी या अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील - प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उस्मानशहा हाजीसांडु शहा, रा. शरिफ कॉलनी, रोषण मस्जीद, गल्ली नं. ०९,

औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक, वित्त व लेखा, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जुहू सुप्रीम शॉपिंग सेंटर, १ ला माळा, गुलमोहर, क्रॉल रोड क्र. ९, जे. व्ही. पी. डी. स्कीम, विलेपार्ले (प.), मुंबई - ४०००४९ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर /५५८

निर्णय दिनांक: १०-०२-२०१०

१. श्री. भास्कर लक्ष्मणराव धस, : अपिलार्थी
   रा. प्लॉट नं. १५८, व्यंकटेशनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
   साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. जन अपिलीय अधिकारी तथा
   साखर आयुक्त, पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहसंचालक (विकास), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

जन अपिलीय अधिकारी : साखर संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-१२-२००८ व ०३-१२-२००८ रोजी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी

माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००६-२००७ व २००७-२००८ या कालावधीतील गाळपाविना शिल्लक ऊसाची नुकसान भरपाई मिळणेबाबत व गाळप हंगामामध्ये किमान वैद्यनिक ऊस दर देण्याबाबत एकूण १० मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दि. ०३-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत अर्थ शाखेशी व विकास शाखेशी संबंधित माहिती विनामूल्य देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०१-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आहे. त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन

माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी पुढे आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी नुकसान भरपाईची माहिती विचारली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अनुदानाची माहिती दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या १० मुद्यांवरील माहितीचे स्वरुप संमिश्र असे आहे. यामध्ये बहुतेक मुद्यांवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकड त्यांच्या कृतीबद्दलचे कारण व त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक अ. १ मधील, 'महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांच्या तक्रार अर्जाची संख्या', अ. ५ मधील, 'किती तक्रारीचे निराकरण करण्यात आले', ब. १ मधील, 'ऊस उत्पादकांच्या तक्रारीवर काय कार्यवाही करण्यात आली', ब.३ मधील, 'या कारखान्याने शेतकऱ्याला किमान वैद्यानिक दर दिलेला नाही तरीही त्यांना वाहतूक अनुदान, उतार घट अनुदान हे कोणत्या निकषावर देण्यात आले', आणि ब. ५ मधील, 'किमान वैद्यानिक दर दिला नसलेल्या साखर कारखान्यावर साखर आयुक्तालयाने काय कार्यवाही केली', एवढीच माहिती त्यांना देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्यांशिवाय इतर मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीस देय असलेल्या माहितीपैकी

त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ब. १ मधील अंशतः देय माहिती, मुद्दा क्रमांक ब. ५ मधील अंशतः देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ब. १ या मुद्यावरील माहिती त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक अ.५ मधील देय माहितीमध्ये समाविष्ट आहे आणि ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-१२-२००८ रोजी दिल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ब.३ द्वारे, '२००६ ते २००८ या कालावधीतील गाळप हंगामामध्ये सहकारी व खाजगी साखर कारखान्याने किमान वैद्यानिक दर न देता त्यांना वाहतूक अनुदान, उतार घट अनुदान ज्या निकषावर देण्यात आले त्या निकषाची माहिती', जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. या संदर्भात आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांना विचारणा केली असता, त्यांनी हे अनुदान शासनाकडून प्राप्त झालेल्या आदेशाप्रमाणे दिले असल्याचे आयोगास अवगत केले. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस या आदेशाच्या / परिपत्रकाच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ब. ५ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती काहीशी मोघम स्वरुपात असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'किमान वैद्यानिक दर न देणाऱ्या साखर कारखान्यांवर काय कार्यवाही करण्यात आली, याचा संपूर्ण तपशील देण्यात यावा', अशा प्रकारची माहिती मागितली होती. परंतु 'संपूर्ण तपशील' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे, हे त्यांनी या अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की त्यांनी अशा कारखान्यावर नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही केली असून, त्यांच्यावर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत त्यांच्या विरुध्द एफ.आय.आर. देखिल नोंदविला आहे व

या कारखान्यावर कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे या संदर्भात अपिलार्थीस माहिती देण्याकरता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी ज्या कथित दोषी कारखान्यावर कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत त्या सर्व आदेशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ब. ३ व ब. ५ शी संबंधित, वर स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती दिली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबद्दलचे कोणतेही स्पष्टीकरण व कारणमीमांसा प्राप्त न झाल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटत आहे. तथापि अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे, या अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देणे अभिप्रेत नसल्याने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आहे, हा त्यांचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ब.३ व ब.५ शी संबंधीत संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर लक्ष्मणराव धस, प्लॉट नं. १५८, व्यंकटेशनगर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक (विकास), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा साखर संचालक (अर्थ) साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६३

निर्णय दिनांक १०-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मो. मोईज खान पठाण,<br>व्दारा- राम संगनवार, " ओम निवास, " प्र. नि. हा.<br>शाळेजवळ, कैलासनगर, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय न दिल्यामुळे व अपिलार्थीस अपमानास्पद वागणूक

दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना त्यांच्या कार्यालयामार्फत दिनांक ०३-०३-२००९ रोजी देण्यात आली असून प्राप्त माहिती समाधानकारक असल्याचे अभिप्राय अपिलार्थीने त्यांच्याकडील पत्रावर दिलेले आहेत. या पत्राची झेरॉक्स प्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक ०३-०३-२००९ रोजी त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले आहे तसेच संबंधित जन माहिती अधिकारी हे आता शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मो. मोईज खान पठाण, व्दारा- राम संगनवार, " ओम निवास, " प्र. नि. हा. शाळेजवळ, कैलासनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६४

निर्णय दिनांक १०-०२-२०१०

१ श्री. महंमद अकबर महंमद नवाज, : अपिलार्थी
घर नं. ५-१-२६५, नगर गल्ली,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ११७१३/०८, दिनांक १० ऑक्टोबर २००८ ची प्रत व संबंधित श्री. महंमद इब्राहीम यांच्या कायम मुख्याध्यापक बाबत सादर केलेल्या दिनांक

२५-०८-२००८ रोजीच्या प्रस्तावाची प्रमाणित प्रत, " अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०२-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा निर्णय दिला नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतरही त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः कधी संपर्क साधला यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला नाही किंवा यासंदर्भात युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडील अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती आयोगाने तपासली असता, ही माहिती सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसापर्यंत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलाशी संबंधित त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपरोक्त कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी व्यक्तिशः संपर्क साधून ही माहिती त्यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महंमद अकबर महंमद नवाज, घर नं. ५-१-२६५, नगर गल्ली, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६५

निर्णय दिनांक १०-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील महेश रमेश,<br>जी-१/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर, उस्मानपुरा,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२०१० रोजी औरंगाबाद  येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असे लेखी दिले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०८-०२-२०१० रोजी या अपिलाशी संबंधित त्यांनी केलेल्या मूळ अर्जातील सर्व माहिती प्राप्त झाली असल्याने ते आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील क्रमांक ५६५/२००९ हे मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१.    अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**    **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक    १०-०२-२०१०**    **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१    श्री. पाटील महेश रमेश, जी-१/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२    जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३    जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६१

निर्णय दिनांक १०-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुरेश दिगंबर चौधरी,<br>रा. एन-११-ए-८/३, सुदर्शननगर, हडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. डी. चौधरी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०७-२००८ रोजी फेर नोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे शैक्षणिक वर्ष २००२ ते २००६ या कालावधीशी संबंधित माहिती खालील-प्रमाणे मागितली होती.

(अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे)

" जयभवानी विद्यालय विश्वभारती कॉलनी, औरंगाबाद येथे कार्यरत असलेले (विषय मराठी) श्री. डी. डी. चौधरी यांचे पदमंजूरी पूर्णवेळ, अर्धवेळ आपल्या टिपणी (नोटीग) दि. ३०-०४-२००३ नुसार श्रीमती ए. व्ही. पुजारी संस्कृत विषय अर्धवेळ पद मंजूरी घेतली आहे. व त्यांनी कुठलीही हरकत घेतली नाही. म्हणून श्री. डी. डी. चौधरी यांना शिल्लक व शासनाकडील पदमंजूरीसाठी पाठवलेले पद देण्यात आले नाही. म्हणून जेके माहिती आग्रास्तव देण्यात यावी. अर्जासोबत नोटीग प्रत जोडली आहे. "

अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०९-२००७ रोजी निर्णय देऊन श्री. डी. डी. चौधरी यांच्या प्रस्तावाची छायांकीत प्रत अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

उपस्थित संबंधितांचे युक्तिवाद ऐकून घेण्यात आले. या युक्तिवादांवरुन अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष श्री. डी. डी. चौधरी यांच्या विभागीय शिक्षण उप संचालक यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या त्यांच्या पद मान्यतेच्या प्रस्तावासंदर्भात माहिती अपेक्षित असल्याचे आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे त्याचा बोध होत नाही. अपिलार्थीस श्री. डी. डी. चौधरी या शिक्षकाच्या पद मान्यतेसंदर्भात सन २००२ ते २००६ या कालावधीतील माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, आज रोजी युक्तिवादात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली

संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश दिगंबर चौधरी, रा. एन-११-ए-८/३, सुदर्शननगर, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर /५५६

निर्णय दिनांक: १०-०२-२०१०

१. श्री. अंबुलगे रविंद्र शिवराज, : अपिलार्थी
रा. साधना निवास, एस.टी. कॉलनी, नळेगांव रोड,
उदगीर, जि. लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग),
जिल्हा परिषद, लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट व चुकीची माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तसेच त्यांनी या अपील अर्जामध्ये त्यांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग), जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांना दिलेल्या वैयक्तीक मान्यतेच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे संबंधित

संस्थेकडून पाठविलेला प्रस्ताव व परिशिष्ट "ड" यांच्या प्रतीची त्यांना आवश्यकता असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"आपल्या कार्यालयाकडून मिळालेल्या व मान्यता आदेश सोबत जोडत आहे व माझे मा. शाळा त्या लातूर येथे अपील क्रमांक ५४/०७ नुसार कोर्ट प्रकरण चालू आहे. यासाठी मला वै. मा. मिळण्यासाठी दिलेल्या नियुक्तीआदेश ब व मान्यतेच्या प्रस्तावाची आपल्याकडून सत्यप्रत करुन द्यावे ही विनंती."

(टीप :- अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे. )

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडील माहिती मागितली असताना देखिल मुख्याध्यापक, श्रीमती लक्ष्मीबाई प्राथमिक विद्यामंदिर, उदगीर यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज या पत्रासोबत पाठविला व याची प्रत अपिलर्थीस देऊन संबंधित मुख्याध्यापकांकडून ही माहिती घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले व अपिलार्थीचा अर्ज निकाली काढल्याचे त्यांना कळविले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०-११-२००८ रोजी शिक्षण उपसंचालक तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना अपिलार्थीस दिनांक ०५-०१-२००९ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि

यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये वैयक्तिक मान्यतेच्या प्रस्तावाच्या प्रतीची सत्यप्रत अशा प्रकारची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे मागितली होती. प्रत्येक शालेय संस्थेकडून त्यांनी नेमणूक दिलेल्या प्रत्येक शिक्षकाच्या नेमणूकीस वैयक्तिक मान्यता शिक्षणाधिकाऱ्यांचे कार्यालय नियमितपणे देत असते. वैयक्तिक मान्यतेचा प्रस्ताव संबंधित संस्थेकडून शिक्षणाधिकारी कार्यालयात प्राप्त होत असतो. याचा अर्थ अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शिक्षणाधिकारी कार्यालयाकडेच उपलब्ध असावयास हवी. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संचीकेच्या प्रती देखिल जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असावयास हव्या. परंतु या प्रकरणी शिक्षण खात्याच्या नेहमीच्या गैरसमजाच्या आधारे त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस सरळ पाठविण्याऐवजी त्यांनी अपिलार्थीस ही माहिती संबंधित शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापकांकडून घेण्याचे सूचित केले व अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढला. जेव्हा एखाद्या संस्थेने सादर केलेला वैयक्तिक मान्यतेचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी मान्य करतात त्यावेळी ही माहिती प्रत्यक्षात शिक्षणाधिकारी यांच्याकडेच उपलब्ध असावयास हवी. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीतील अद्यापपावेतो त्यांना द्यावयाची राहिलेली

माहिती शिक्षणाधिकारी यांना स्वतःला, त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस आता विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. ही अपिलार्थीची चूक आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००८ पर्यंत नेमणूकीची ज्या ज्या वर्षी वैयक्तिक मान्यता दिलेली आहे त्या त्या वर्षीच्या वैयक्तिक मान्यतेच्या संचीकेच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, कोणत्याही कार्यालयीन दिवाशी पूर्वनियोजीत वेळी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून त्यांच्या वैयक्तिक मान्यतेच्या संचीकेच्या प्रती तपासाव्यात व त्यावेळी त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त करुन घ्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः १०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंबुलगे रविंद्र शिवराज, रा. साधना निवास, एस.टी. कॉलनी, नळेगांव रोड, उदगीर, जि. लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९०
निर्णय दिनांक: ११-०२-२०१०

१. श्री. केशव एकनाथ कोल्हे, : अपिलार्थी
रा.वरुड बु., ता.जाफ्राबाद, जि.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु.,
ता.जाफ्राबाद, जि.जालना.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री शिवाजी विद्यालय, भारज बु., ता.जाफ्राबाद, जि.जालना यांच्याकडे सन २००५ ते २००८ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्या विद्यार्थ्यांना इयत्ता ५ वी ते ८ वी (सर्व तुकडयांसह) पुस्तकपेढी योजनेतील पुस्तके वाटप केली त्या विद्यार्थ्यांची व या कामासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी,नावासह - अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि जन माहिती

अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ३१.१२.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ०४.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. ०९.०२.२००९ पर्यंत माहिती देण्याचे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास सूचित केले. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांना, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगाच्या कार्यालयातून संपर्क साधला असता, अपिलार्थीने अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्राप्त झाली नसल्याचे अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि.०४.०२.२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दि. ०९.०२.२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या या निर्णयास अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी मान्यता दर्शविली होती.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देण्यासाठी दीर्घ कालावधी लागणे संभवत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, त्यांच्या या कृतीचे, कोणतेही समर्थन मूळात असू शकत नाही, अशी आयोगाची खात्री आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील दि. ०४.०२.२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देऊन अपिलार्थीस दि. ०९.०२.२००९ पर्यंत माहिती देण्याचे सूचित करुनही आजतागायत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री शिवाजी विद्यालय, भारज बु., ता.जाफ्राबाद, जि.जालना यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कळविण्याचा पर्याय अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे माहिती अधिकाऱ्यास आहे. तथापि या पर्यायाचा वापर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील झालेल्या दि.०४.०२.२००९ रोजीची सुनावणी होईपर्यंत देखील केल्याचे या प्रकरणी आढळून येत नाही. सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे कबूल केले, परंतु आजतागायत माहिती दिली नाही, याचाच दुसरा अर्थ म्हणजे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास हेतुपूरस्सर टाळाटाळ केली, असा होतो.

अपिलार्थीस माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब मुख्याध्यापक,श्री

शिवाजी विद्यालय, भारज बु., ता.जाफ्राबाद, जि. जालना यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून कोणत्याही कारणाशिवाय वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री शिवाजी विद्यालय, भारज बु.,ता.जाफ्राबाद, जि.जालना यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी संबंधित मुख्याध्यापक हे अपिलार्थीस या मुदतीत माहिती देतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना,हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री शिवाजी विद्यालय, भारज बु., ता.जाफ्राबाद, जि. जालना यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांक: ११-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केशव एकनाथ कोल्हे, मु.पो. वरुड बु.,द्वारा सपकाळ वायरमन यांचे घर, ता. जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु.,ता.जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९१
निर्णय दिनांकः ११-०२-२०१०

१. श्री. केशव एकनाथ कोल्हे, : अपिलार्थी
राा.वरुड बु., ता.जाफ्राबाद, जि.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु.,
ता.जाफ्राबाद, जि.जालना.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु., ता.जाफ्राबाद,जि.जालना यांच्याकडे शैक्षणिक वर्ष २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शैक्षणिक वर्ष २००५-०८

मधील शाळेच्या इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या शिक्षकांच्या नावासह दैनंदिन वेळापत्रकाच्या प्रती, शैक्षणिक वर्ष २००६-०७ इयत्ता १० वीची पर्यावरण विषयाची बोर्डाची ग्रेड लिस्ट यादी व शैक्षणिक वर्ष २००५ ते २००८ या कालावधीतील शिक्षक रजेवर असताना पर्यायी शिक्षकांच्या तासिका नियोजनाच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. २९.०१.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. २५.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे संबंधित मुख्याध्यापकास सूचित केले. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांना त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगाच्या कार्यालयातून संपर्क साधला असता, अपिलार्थीने अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नसल्याचे अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २५.०२.२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती आठ

दिवसांचे आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या या निर्णयास अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी मान्यता दर्शविली होती.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फारसे श्रम घ्यावे लागले असते, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील दि. २५.०२.२००९ रोजीच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती आठ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कळविण्याचा पर्याय अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे माहिती अधिकाऱ्यास आहे. तथापि या पर्यायाचा वापर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील झालेल्या दि.२५.०२.२००९ रोजीची सुनावणी होईपर्यंत देखील केल्याचे या प्रकरणी आढळून येत नाही. सुनावणीमध्ये अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले,परंतु आजतागायत माहिती दिली नाही. याचाच दुसरा अर्थ म्हणजे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केली, असा होतो. त्याचप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री शिवाजी विद्यालय, भारज बु., ता.जाफ्राबाद, जि. जालना यांनी अपिलार्थीस ही माहिती आयोगाकडील आजच्या सुनावणीच्या दिनांकापर्यंत दिलेली नसल्याचे स्पष्ट होत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती न देण्याची कृती म्हणजे,

अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट करणारी कृती, असे आयोग मानतो. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अशाप्रकारची मर्यादित स्वरुपाची माहिती प्राप्त होण्यासाठी दि. २५.०२.२००९ ते आजतागायत म्हणजेच आज दि.११.०२.२०१० रोजीच्या सुनावणीच्या दिनांकापर्यंत, एवढया प्रदीर्घ कालावधीसाठी अपिलार्थी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिलेले आहेत, असे दिसून येते. या विलंबाचे कोणतेही समर्थन मूळात असू शकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्याध्यापक, श्री शिवाजी विद्यालय, भारज बु., ता.जाफ्राबाद, जि. जालना यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती देण्याचे त्यांनी हेतुपूरस्सर टाळल्याने त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी हेतुपूरस्सर टाळल्याचे जन माहिती अधिकारी यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री शिवाजी विद्यालय, भारज बु.,ता.जाफ्राबाद, जि.जालना यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी संबंधित मुख्याध्यापक हे अपिलार्थीस या मुदतीत माहिती देतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना,हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री शिवाजी विद्यालय, भारज बु., ता.जाफ्राबाद, जि. जालना यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः ११-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केशव एकनाथ कोल्हे, मु.पो. वरुड बु.,द्वारा सपकाळ वायरमन यांचे घर, ता. जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री. शिवाजी विद्यालय, भारज बु.,ता.जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ६९२/०९ व ६९३/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९२ व ६९३
निर्णय दिनांकः ११-०२-२०१०

१. श्री. हरीभाऊ माधवराव तावरे, :अपिलार्थी
रा. चिकनगाव,ता.अंबड, जि.जालना.

**विरुध्द**

१. <u>अपील क्र.६९२/०९ :</u>

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,परतुर,<br>जि.जालना | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>परतुर,जि.जालना | :प्रतिवादी |
| प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : | कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,परतूर,<br>जि.जालना | |

२. <u>अपील क्र.६९३/०९ :</u>

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,घनसावंगी,<br>जि.जालना | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>घनसावंगी,जि.जालना |
| प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : | कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,घनसावंगी,<br>जि.जालना |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०३.२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, दोनही प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांची दि. ११.०२.२०१० रोजीची आयोगास उद्देशून लिहिलेली अपील क्र. ६९२/०९ व ६९३/०९ या दोनही अपिलांच्या संदर्भात दोन स्वतंत्र पत्रे सादर केली असून, या पत्रांमध्ये त्यांनी त्यांची विचाराधीन दोनही अपिले, ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांची उपरोक्त दोनही विचाराधीन अपिले मागे घेतली असल्यामुळे, ही दोनही अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ६९२/०९ व ६९३/०९, दि.२०.०३.२००९ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: ११-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरीभाऊ माधवराव तावरे,रा. चिकनगाव,ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,परतुर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतुर,जि.जालना यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,घनसावंगी,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २१८४/०८ व २१८५/०८

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८४ व २१८५
निर्णय दिनांकः ११-०२-२०१०

१. श्री. असदखान महेबुबखान, :अपिलार्थी
रा. अंजनखेड, माहूर,
जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तहसील कार्यालय, माहूर, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, माहूर,
जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : अपील क्र.२१८४/०८: श्री. साहेबखान पठाण
अपील क्र.२१८५/०८: श्री. उस्मानखान चाँदखान

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र. २१८४/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात दि. ०३.०२.२०१० रोजी फॅक्सद्वारे पाठविलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर करण्यात आली.

या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती तहसील कार्यालय, माहूर यांच्याकडून प्राप्त झाली आहे. याबाबत त्यांचे कोणतेही आक्षेप नाहीत. त्यामुळे ते विचाराधीन अपील क्र.२१८४/०८ मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन अपील मागे घेत असल्यामुळे अपील क्रमांक २१८४/०८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक २१८४/०८, दि.१६.१२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अपील क्र. २१८५/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष,श्री. उस्मानखान चाँदखान,स्वस्त धान्य दु.क्र. १४४ वाई ता.माहूर यांनी सन १९९९ ते २००८ पर्यंत बी.पी.एल. व अंत्योदय योजनेअंतर्गत शिधापत्रिका धारकांना वाटप केलेले एकूण धान्य, शिधापत्रिका धारकांचे नाव, कुपन क्रमांक, वाटप रजिस्टरची व स्टॉक रजिस्टरची नक्कल, संपूर्ण ग्रामीण योजनेअंतर्गत किती धान्य उचलले व किती वाटप केले त्या सर्व मजूरांची नावासह यादी - अशी माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.०९.२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्यामुळे सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, माहूर (दि. ३०.०६.२००८ रोजी व तदनंतर तीस दिवसांपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, माहूर (दि. ३०.०६.२००८ रोजी व तदनंतर तीस दिवसांपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ११-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. असदखान महेबुबखान,रा. अंजनखेड,ता.माहूर, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माहूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माहूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७८
निर्णय दिनांकः ११-०२-२०१०

१. श्री. उत्तम सोपान रानभरे, : अपिलार्थी
रा.परळी वैजनाथ, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अध्यक्ष / सचिव,
धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
परळी वैजनाथ, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, परळी वैजनाथ, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती देऊन कायद्याचा भंग केला असल्यामुळे त्यांना रु. २५,००/- इतका दंड करण्याची व त्यांना विनाविलंब विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२२.११.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष / सचिव, धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, परळी वैजनाथ यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या शाखाधिकाऱ्यांनी त्यांच्या दि. १२.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा., पुणे यांनी त्यांच्याकडील आदेश

क्र.अवंनि/केंमाअ/शा.प्रा.आ/२००६, दि.०८.०२.२००६ नुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकाना लागू होत नसल्याचे कळविल्याने अपिलार्थीस माहिती देता येणार नाही, असे कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, परळी वैजनाथ यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१२.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, परळी वैजनाथ, जि.बीड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०९.०२.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य देण्याचे सचिव, धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, परळी वैजनाथ, जि.बीड यांना आदेशित केले. तथापि अपिलीय अधिकाऱ्याने सुनावणी न घेतल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित संस्थेचे सचिव / अध्यक्ष व सहायक निबंधक , सहकारी संस्था, परळी वैजनाथ  हे सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित नागरी  सहकारी पतसंस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.

१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयाचा आधार घेऊन यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णयही तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

"**It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable.”**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार “सार्वजनिक प्राधिकरण” असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित संस्थेस लागू होत नसल्याने सहायक निबंधक, सहकारी संस्था, परळी वैजनाथ, जि.बीड यांचे दि.०९.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.७७८/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. सहायक निबंधक, सहकारी संस्था, परळी वैजनाथ, जि.बीड यांचे दि.०९.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ११-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उत्तम सोपान रानभरे, जिव्हेश्वर नगर, व्दारा-घट्टे यांचा वाडा, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड.

२. अध्यक्ष / सचिव, धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, परळी वैजनाथ, जि.बीड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, परळी वैजनाथ, जि.बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७९
निर्णय दिनांक: ११-०२-२०१०

१. श्री. तानाजीराव खंडेराव गायधनी, : अपिलार्थी
रा.पळसे, ता.जि. नाशिक.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नाशिक सहकारी साखर कारखाना लि.,
पळसे, ता.जि.नाशिक.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०९.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी, नाशिक सहकारी साखर कारखाना लि., पळसे, ता.जि.नाशिक यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जासंदर्भातील संपूर्ण माहिती संबंधितांनी मुदतीत दिली नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १५.११.२००८ रोजी प्रथम

अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १७.१२.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित दोन मुद्यांची माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे कार्यकारी संचालक, नाशिक सहकारी साखर कारखाना लि. पळसे, ता.जि.नाशिक यांना आदेशित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कर्मचारी अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक

सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.१७.१२.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.७७९/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.१७.१२.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ११-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तानाजीराव खंडेराव गायधनी, "सिताई", कृषीनगर, मु.पो.पळसे, ता.जि.नाशिक.

२. कार्यकारी संचालक, नाशिक सहकारी साखर कारखाना लि., पळसे, ता.जि.नाशिक.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), त्रिलोक चेंबर्स, लालटाकी रोड, हुतात्मा स्मारकाजवळ, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७८०
निर्णय दिनांक: ११-०२-२०१०

१. श्री. सुभाष साहेबराव नाकलगांवकर, : अपिलार्थी
रा.माजलगांव, जि.बीड

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
माजलगांव सहकारी साखर कारखाना लि.,
सुंदरनगर, पो.तेलगांव, ता.माजलगांव, जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२९.०५.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, माजलगांव सहकारी साखर कारखाना लि., सुंदरनगर, ता.माजलगांव, जि.बीड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.

०३.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०७.०८.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांना मुद्दा क्र. १,४ व ५ शी संबंधित माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, माजलगांव सहकारी साखर कारखाना मर्या., सुंदरनगर, ता.माजलगांव, जि.बीड यांना आदेशित केले. दरम्यानच्या काळात कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि. ०३.०८.२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती दिली. तथापि यानंतर प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद  हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांचे दि.०७.०८.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्र.७८०/०९ फेटाळण्यात येत आहे.

२) प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांचे दि.०७.०८.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ११-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष साहेबराव नाकलगांवकर, सम्राट अशोकनगर, माजलगांव, ता.माजलगांव, जि.बीड.

२. कार्यकारी संचालक, माजलगांव सहकारी साखर कारखाना लि., सुंदरनगर, पो.तेलगांव, ता.माजलगांव, जि.बीड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), क्रांतीचौक, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२३
निर्णय दिनांक: ११-०२-२०१०

१. श्री. अजय अर्जुनराव पाटील, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
नृसिंह सहकारी साखर कारखाना लि., लोहगांव,
ता.जि.परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावण्याची व कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१८.०७.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, नृसिंह सहकारी साखर कारखाना लि., लोहगांव, ता.जि.परभणी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्ज संबंधितांनी स्विकारण्यास नकार देऊन जाणीवपूर्वक माहिती देण्याचे नाकारले असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर),

नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १३.१०.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना तात्काळ माहिती देण्याचे कार्यकारी संचालक, नृसिंह सहकारी साखर कारखाना लि., लोहगांव, ता.जि.परभणी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्र्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि.१३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२२३/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि.१३.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ११-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजय अर्जुनराव पाटील, व्दारा-ॲड.अजित एम.देशमुख, गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, ता.जि.बीड.

२. कार्यकारी संचालक, नृसिंह सहकारी साखर कारखाना लि., लोहगांव, ता.जि. परभणी

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूलसमोर, टिळक नगर, नांदेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७७
निर्णय दिनांक: ११-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. प्रविण राजाराम लोधे,<br>रा.पिंपळवाड (निंकुभ), ता.चाळीसगांव,<br>जि.जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. कार्यकारी संचालक,<br>रावळगांव साखर कारखाना, रावळगांव,<br>ता.मालेगांव, जि. नाशिक | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>साखर आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर,<br>पुणे-५ | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयाकडे दि.२७.१२.२००७ रोजी नोंदविलेले व औरंगाबाद खंडपीठाकडे दि.२७.०३.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२६.०९.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, रावळगांव साखर कारखाना, रावळगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने साखर आयुक्त, पुणे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.३०.१०.२००७ रोजी प्रथम अपील

केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी तोंडी स्वरुपात निर्णय दिल्याचे व माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि.११.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित साखर कारखान्याचे प्रतिनिधी, साखर संचालक, पुणे व प्रादेशिक सहसंचालक (साखर) अहमदनगर हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण म्हणजे रावळगांव साखर कारखाना नावाची एक भागीदारी संस्था असून तिची नोंदणी कंपनी कायद्यांतर्गत केली गेली आहे. या संस्थेचे पूर्ण खाजगी स्वरुप पाहता ही संस्था माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या “सार्वजनिक प्राधिकरण” या शब्दाच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे स्पष्टपणे सिध्द होत आहे. अशाप्रकारच्या संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. परिणामी अपिलार्थीस संबंधित संस्थेकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार कोणतीही माहिती देय असणार नाही.

सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२८७७/०७ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ११-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रविण राजाराम लोधे, मु.पिंपळगांव (निंकुभ), पो.माळशेवगा, ता.चाळीसगांव, जि.जळगांव.

२. कार्यकारी संचालक, रावळगांव साखर कारखाना, रावळगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक.

३. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५.

४ प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८६

निर्णय दिनांक ११-०२-२०१०

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपिलार्थी
द्वारा, एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब
ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
लेखाधिकारी (शिक्षण), जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कनिष्ठ लेखापरीक्षक (शिक्षण), जालना
जन अपिलीय अधिकारी : लेखाधिकारी (शिक्षण), जालना
त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी, श्री. डुकरे नारायण निळुबा

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्यांना प्राप्त झालेली माहिती अर्धवट स्वरुपात प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी  यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष, मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, गोलापांगरी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २७-०१-२००६ व २०-०९-२००६ रोजी कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीच्या मान्यतेबाबत प्रस्ताव सादर केला होता. मुख्याध्यापकांच्या या प्रस्तावास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने ज्या संचिकेद्वारे व टिपणीद्वारे मान्यता देण्यात आली आहे त्या टिपणीच्या व संचिकेच्या प्रती आणि या शाळेच्या दिनांक ०१-०१-२००५ ते २५-०९-२००८ व ०१-०१-१९९० ते ३१-१२-१९९६ या कालावधीमध्ये केलेल्या लेखा परिक्षणाच्या अहवालाच्या आणि या संदर्भात शाळेने केलेल्या अनुपालन अहवालाच्या सांक्षांकित झेरॉक्त प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११०/- इतके त्यांना शासकीय कोषागारात जमा करण्याचे सूचित केले. अपिलार्थीने या शुल्काचा दिनांक ०३-११-२००८ रोजी भरणा केल्यानंतर अपिलार्थीस त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली.  तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६-११-२००८ रोजी शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित शिक्षण उपसंचालक यांनी नियमाप्रमाणे कोणताही निर्णय न दिल्याने आणि परिणामी अपिलार्थी अपेक्षित माहितीपासून

वंचित राहिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ५३ पृष्ठांची माहिती मिळाली असून, या माहितीमध्ये संबंधित शिक्षण संस्थेने त्यांच्या लेखा परिक्षणाचे अनुपालन केल्याचे अहवाल त्यांना प्राप्त झालेले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित शाळेने अद्यापपावेतो अपिलार्थीने संदर्भित केलेला लेखा परिक्षणाचा अनुपालन अहवाल त्यांच्या कार्यालयाकडे सादर न केल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकत नाहीत. या शाळेने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अद्यापपावेतो या लेखा परीक्षणाचा अहवाल सादर केलेला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित शाळेच्या लेखा परिक्षण अनुपालन अहवालाच्या झेरॉक्स प्रती मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गोलापांगरी यांच्याकडून घेण्यास सूचित केले होते. तथापि या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना संबंधित शाळेकडून नियंत्रक प्राधिकरण या नात्याने प्राप्त करता येते. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस परस्पर नेहरु विद्यालयाच्या मुख्याध्यापकांकडून अनुपालन अहवाल प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित

करण्याची त्यांची कृती सर्वस्वी चुकीची आहे. तेव्हा या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, द्वारा, एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लेखापरीक्षक (शिक्षण), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा लेखाधिकारी (शिक्षण), जालना यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८७

निर्णय दिनांक ११-०२-२०१०

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपिलार्थी
द्वारा, एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे
यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
नेहरु विद्यालय, गोलापांगरी, ता. जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने नेहरु विद्यालय, गोलापांगरी या शाळेतील कर्मचारी श्री. बी.बी. जिगे व इतर १४ कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेच्या छायांकित प्रतींची आणि श्री जी.के. राऊत कनिष्ठ लिपीक यांनी घेतलेल्या व दिलेल्या चार्जच्या सांक्षांकित झेरॉक्स प्रतीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी  यांच्याकडे, त्यांच्या शाळेतील कर्मचारी श्री. बी. बी. जिगे व इतर १४ कर्मचारी यांच्या सेवापुस्तिकेच्या सांक्षांकित झेरॉक्स प्रती आणि त्रयस्थ पक्ष श्री. जी. के. राऊत यांनी घेतलेल्या व दिलेल्या चार्जच्या सांक्षांकित झेरॉक्त प्रती, अशी दिनांक ०१-०१-२००३ ते ३१-१०-२००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती.  अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांच्या शाळेतील कर्मचाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तिका गहाळ झालेल्या आहेत आणि या प्रकरणी अपिलार्थी विरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे.  त्यामुळे अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे त्याच्या शाळेतील अपिलार्थीने मागणी केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत.  श्री. जी. के. राऊत, कनिष्ठ लिपीक यांनी घेतलेल्या व दिलेल्या पदभारासंदर्भात याच पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २४/- रु. इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व त्याप्रमाणे अपिलार्थीस श्री. जी. के. राऊत यांच्या पदभाराच्या संदर्भातील माहिती दिनांक २४-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिली.  तथापि प्राप्त माहिती अर्धवट असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक २८-०१-२००९ पूर्वी संपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे  सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिका मागितल्या आहेत त्या सेवापुस्तिका जतन करुन ठेवण्याचे काम अपिलार्थी यांच्याकडे, ते ज्यावेळी त्यांच्या शाळेत नोकरीस होते त्यावेळी त्यांच्यावर सोपविले होते. तथापि या प्रकरणी सेवापुस्तिका गहाळ झाल्याच्या आरोपावरुन अपिलार्थीविरुध्द त्यांनी फौजदारी गुन्हा नोंदविला आहे. आज अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी सेवापुस्तिकेच्या प्रती या भागाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. श्री. जी. के. राऊत यांच्या पदभारासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०१-२००९ रोजी व्यक्तिशः माहिती दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती त्यांना सशुल्क पुरविलेली आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या सेवापुस्तिकेच्या प्रती ही माहिती जन माहिती अधिकारी त्यांना पुरवू शकत नाहीत. त्या संदर्भात त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये समाधानकारक स्पष्टीकरण दिले आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेच्या प्रती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकणार नाहीत, असे अपिलार्थीच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, द्वारा, एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी, ता. जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८८
निर्णय दिनांक ११-०२-२०१०

१ श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, : अपिलार्थी
द्वारा, प्लॉट नं. ४०, अब्दुल माजीद, न्यु एस.टी.
कॉलनी, कट कट गेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद |
| | त्रयस्थ पक्ष | : | अंजुमन इशाते तालीम संचलित १) जिया - उल उलूम गर्ल्स हायस्कूल २) मौलाना आझाद हायस्कूल औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०१-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०८-०२-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांना प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांचे अपील खारीज करण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्याची केलेली विनंती आयोग मान्य करीत असून, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ६८८/२००९, दिनांक १२-०१-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, द्वारा, प्लॉट नं. ४०, अब्दुल माजीद, न्यु एस. टी. कॉलनी, कट कट गेट, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८९

निर्णय दिनांक ११-०२-२०१०

१ श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, : अपिलार्थी
प्लॉट नं. ४०, द्वारा, अब्दुल माजीद, न्यु. एस. टी.
कॉलनी कट कट गेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक
कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. कादरी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये सहायक शिक्षण संचालक तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे "डॉ. कादरी व शेख मोहंमद इलियास यांनी संगनमताने खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन, शेख मोहमंद इलियास या अपात्र उमेदवाराला कनिष्ठ प्राध्यापक पदी डॉ. कादरी यांनी नेमणूक देऊन सात वर्षात सुमारे १० लाख रुपये पगार उचलल्याबद्दल माहिती" या विषयावर सन १९९९ ते २००७ या कालावधीशी संबंधित माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीच्या दिनांक २८-०७-२००८ या तक्रार अर्जानुसार चौकशी करण्यात आली असल्यास त्या चौकशी अहवालाची झेरॉक्स सत्यप्रत, दिनांक ०८-०२-१९९९ ते १६-१०-२००७ या कालावधीत प्रतिवर्ष शेख मोहंमद इलियास यांना पगारापोटी देण्यात आलेल्या रकमेचा तपशील व संबंधितांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील तीन मुद्यांपैकी, मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस संबंधित शिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक यांच्याकडून देवविली आणि अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास अपिलार्थीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने संबंधितांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना एक महिन्यात देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देण्यापूर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील तीनही मुद्यांवरील माहिती आता उपलब्ध करुन दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील एकूण ३ मुद्यांपैकी, मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस दिनांक १५-०५-२००९ रोजी म्हणजे, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर, प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती देण्याचे उपसंचालकांनी मुख्याध्यापकास सूचित केले होते. तथापि या मुद्यावर अपिलार्थीस नेमकी कधी माहिती दिली गेली या संदर्भातील तपशील आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुनावणीच्या वेळी उपलब्ध नाही. अपिलार्थीस माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे शिक्षण उपसंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्यास ही माहिती विचारली असल्यामुळे, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस ही माहिती शिक्षण उपसंचालकाच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने दिली जाणे क्रमप्राप्त आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालाकडून अशाप्रकारे माहिती दिली गेलेली नाही. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी स्वतः जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी स्वतः होऊन संपर्क साधून त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून पूर्वनियोजित वेळी विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, प्लॉट नं. ४०, द्वारा, अब्दुल माजीद, न्यु. एस. टी. कॉलनी कट कट गेट, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.